# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०२३ / कार्तिक ४, १९४५ शके

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

१३३. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२१ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित १४३ निवेदनांपैकी ४८ निवेदने गुरुवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२३ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ९५ निवेदनांपैकी ३० निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

<u>याची प्रत :</u>

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री.रवींद्र धंगेकर, श्री.संजय जगताप, श्री.संग्राम थोपटे, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.अस्लम शेख, श्री.अमिन पटेल, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४६२ खालीलप्रमाणे आहे :-**

"माहे जुलै,२०२३ चा पावसाळा सुरु होताच घडत असलेल्या अपघातांच्या घटना, विशेषत: पुण्यामध्ये पावसाळा सुरु झाला की बांधकाम प्रकल्प, इमारती, टेकडया, ओढे-नाले यांच्या भोवतीच्या सीमाभिंती, संरक्षक भिंती कोसळण्याच्या घडत असलेल्या घटना, परिणामी लेबर कॅम्पमधील कामगार, त्याचबरोबर वस्त्या, सोसायट्यांमधील नागरिकांना जीव मुठीत घेउन वास्तव्य करावे लागणे, माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये कोंढवा येथे भिंत कोसळून १५ कामगार व त्यांच्या मुलांचा झालेला मृत्यूची घटना होत तोवर माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये आंबेगाव बुद्रुक येथे सीमाभिंत कोसळून आणखी सहा कामगारांचा झालेला मृत्यु, सन २०१९ मध्ये झालेल्या दुर्घटनेमध्ये तब्बल २१ जणांना जीव गमवावे लागणे, सातत्याने सीमाभिंती कोसळण्याच्या घटना घडत असतांनाही अद्यापी शहराच्या वेगवेगळया भागात लेबर कॅम्प, डोंगर उतार, टेकड्यांवरील घरांभोवती धोकादायक अवस्थेत असून नागरिकांच्या जीवाला धोका संभवत असणे, शहराच्या मध्यवर्ती भागासह उननगर ग्रामीण भागामध्ये मोठया प्रमाणात बांधकाम प्रकल्प ,पुर्नविकास प्रकल्प सुरु असणे, आणि बहुतांश ठिकाणी पत्राच्या शेडमध्ये लेबर कॅम्प अस्तित्वात असणे, त्यांना कोणत्याही प्रकारची सोयी-सुविधा पुरविण्यात न येणे, सीमाभिंती आणि संरक्षक भिंती कोसळून गेल्या कांही वर्षात घटना घडल्या होत्या तिच परिस्थिती अजूनही जैसे थे असणे, याकडे शासनाचे व प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असणे, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून नाल्याच्या कडेला, डोंगरउतारावर असणाऱ्या सीमाभिंती, इमारतीच्या संरक्षक भिंतीच्या सुरक्षिततेची पाहणी करण्याची आवश्यकता, त्याअनुषंगाने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका.""

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

माहे ऑगस्ट २०१९ मध्ये कोंढवा व माहे सप्टेंबर २०१९ मध्ये आंबेगाव येथे सिमाभिंत कोसळून कामगारांचा मृत्यु झाला होता, ही वस्तुस्थिती आहे. या घटनेनंतर पुणे महानगरपालिकेमार्फत प्रति वर्षी पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागामार्फत पावसाळया पूर्वी/पावसाळयामुळे/अतिवृष्टीमुळे जीवितहानी, वित्तहानी होऊ नये म्हणुन खबरदारी घेण्याकरीता संबधित विकसक/आर्कि./जागा मालक यांना खालील नमूद बाबींचे नियोजन व उपायोजना करणेबाबत शहर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडून कळविण्यात येते :-

- मिळकतीलगत धोकादायक सिमाभिंत/संरक्षक भिंत असल्यास, त्या भिंती विकसक यांच्या स्तरावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६४ (१) नुसार उतरवून घेणे, अथवा मान्यता प्राप्त स्ट्रक्चरल इंजिनीयर यांच्या मार्गदर्शनाखाली दुरुस्ती करण्यात येऊन, सदर भिंती धोकादायक नाहीत, याची विकसकांच्या स्तरावर खात्री करण्यात यावी. तसेच धोकादायक

भिंती / बांधकामे काढून टाकणे अथवा दुरुस्त करणे, धोका नष्ट करणे, याची जबाबदारी मालक / विकसक यांची राहील.

- यु.डी.सी.पी. आर. २०२० चे कलम २.२.१९ व २.८.१, २.१३, २.१४ नुसार भारतीय मानकानुसार योग्य ती गुणवत्ता राखून, योग्य ते बांधकाम साहित्य वापरून व सुरक्षेच्या उपायोजना करून बांधकाम करण्याची संपूर्ण जबाबदारी प्रकल्पाचे आर्कि. / ला. इंजिनिअर / सुपर वायझर व त्यांनी नेमलेल्या तत्सम तज्ञ परवानाधारक यांची राहील व त्यांचे पालन करणे विकसक/तज्ञ परवानाधारक यांना बंधनकारक राहील
- बांधकाम प्रकल्पामध्ये साठणाऱ्या पावसाच्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा करण्याचे नियोजन संबंधित विकसक/जागा मालक यांनी करणे आवश्यक आहे.
- मिळकतीमधील नाला प्रवाहास अडथळा निर्माण होणार नाही, अश्या पध्दतीने नाला साफ करून घेणे ही जबाबदारी विकसक/जागा मालक यांची आहे.
- मिळकतीमध्ये लेबर कॅम्प असल्यास, तो कोणत्याही धोकादायक ठिकाणी नाही व सदर लेबर कॅम्पसाठी आवश्यक सर्व सुरक्षेच्या उपाययोजना करण्याची जबाबदारी विकसक/जागा मालक यांची आहे.
- मिळकतीमधील लेबर कॅम्पमधील मंजुरांची नोंदणी कामगार कल्याण विभागाकडे करण्याची जबाबदारी संबंधित विकसक/जागा मालक यांची आहे.
- बांधकाम परवानगीचे काम सुर करण्याच्या दाखल्यावरील अट क्र. १९ नुसार लेबर कॅम्प मधील मंजुरासाठी स्वतंत्रपणे संडास व मुतारी तात्पुरत्या स्वरूपात बांधून देणे विकसकावर बंधनकारक आहे.
- महत्वाच्या विशेष सूचना अंतर्गत बांधकाम सुरु करण्याच्या परवान्यामध्ये सूचना क्रमांक १९ नुसार प्रकल्पाच्या सिमाभिंती या आर.सी.सी. स्वरूपात बांधणे विकसक/जागा मालक यांना बंधनकारक आहे.

वरील नियोजन व उपाययोजनांचे पालनाबाबत संबंधित भागातील इमारत निरीक्षक जागेवर जावून पाहणी करत आहेत. त्याचप्रमाणे संबधित विकसक यांना पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी योग्य ती खबरदारी घेणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे जागा पाहणीच्या वेळी धोकादायक वाटणारे व ज्या ठिकाणी जीवित हानी होऊ शकते त्याठिकाणी असलेले लेबर कॅम्प विकसक/जागा मालक यांचेकडून स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत.

याबाबत नियमित पाहणी करण्यात येत असून, संबंधितास त्याप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. प्रशासनाचे याबाबत कोणतेही दुर्लक्ष होत नाही, याबाबत खबरदारी घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे साईटवरील कामगारांना सुखसोई व सर्व सुरक्षिततेची साधने पुरविणेबाबतची संपूर्ण जबाबदारी विकसक यांची आहे. वरीलप्रमाणे उपाय योजना बांधकाम प्रकल्प, इमारती, टेकड्या, ओढे- नाले इ. च्या भोवती सिमाभिंती, संरक्षक भिंती बाबत नियोजन दरवर्षी करण्यात येते व या नियोजनानुसार संबंधित प्रकल्पाचे विकसक व तत्सम तज्ञ परवानाधारक यांचेकडून प्रत्यक्षात कार्यवाही करून घेण्यात येत असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

*****

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री.महेश लांडगे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ८३९ खालीलप्रमाणे आहे :-**

"पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या सुमारे २५ ते ३० लाख असून पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेता शहरातील नागरिकांना मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध व्हावे यासाठी राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी आंद्रा व भामा आसखेड प्रकल्पातून २६७ एमएलडी पाणी उपलब्ध करून देणेबाबत घेतलेला महत्वपूर्व निर्णय, त्याअनुषंगाने सध्या १०० एमएलडी पाणी पिंपरी-चिंचवड शहर वासियांना मिळालेले असणे, गेल्या १४ वर्षांपासून पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाचे काम रखडले असून सदरचा प्रकल्प त्वरित मार्गी लागल्यास पिंपरी-चिंचवड सारख्या औद्योगिक शहराचा सन २०३१ वर्षापर्यंत पाणी प्रश्न संपूर्णतः निकाली निघणार असणे, पवना धरणातून स्थानिक एमआयडीसीकरीता औद्योगिक वापरासाठी साधारणपणे १०० एमएलडी पाणी दिले जात असून शासनाच्या नवीन औद्योगिक धोरणानुसर शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून सदर पाणी औद्योगिक वापर करण्याची आवश्यकता, याकरीता शहरातील पाणी उपलब्धता व नियोजनाबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

पिंपरी चिंचवड शहरास पवना धरणातून ६.५५ टीएमसी म्हणजेच ५०८ द.ल.लि. प्रतिदिन, आंद्रा धरणातून १.३० टीएमसी म्हणजेच १०० द.ल.लि. प्रतिदिन आणि भामा आसखेड धरणातून २.१५ टीएमसी म्हणजेच १६७ द.ल.लि. प्रतिदिन असे एकूण १०.०० टीएमसी म्हणजेच ७७५ द.ल.लि. प्रतिदिन एवढे पाणी जलसंपदा विभागाकडून आरक्षित आहे.

सद्यस्थितीत पवना धरणातील ५१० द.ल.लि. प्रतिदिन, आंद्रा धरणातील ५० द.ल.लि. प्रतिदिन आणि एमआयडीसी कडून ३० द.ल.लि.प्रतिदिन असे एकूण ५९० द.ल.लि.प्रतिदिन इतका पाणीपुरवठा करणेत येत आहे.

पवना थेट पाईपलाईन प्रकल्पाचे काम जे.एन.एन.यु.आर.एम. योजने अंतर्गत सन २००८ साली हाती घेणेत आले होते. तथापि दि.०९/०८/२०११ रोजी उर्से टोल नाक्याजवळ शेतक-यांनी केलेल्या आंदोलनावेळी झालेल्या गोळीबार घटनेमुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करुन दि.१४/०८/२०११ च्या आदेशान्वये प्रकल्पाचे काम पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्याचे आदेश महानगरपालिकेस देण्यात आले होते. तेव्हापासून सदर प्रकल्पाचे काम बंद आहे.

भविष्यात वाढणारी सरासरी संभाव्य लोकसंख्या व पाण्याची गरज लक्षात घेऊन आंद्रा प्रकल्पांतर्गत पाण्याच्या वितरणासाठी चिखली येथे १०० द.ल.लि क्षमतेचा नवीन जलशुध्दीकरण केंद्राचे काम पुर्ण होऊन जलशुध्दीकरण केंद्र दि.१५ मे २०२३ पासून कार्यान्वित केले असून सद्यस्थितीत दररोज ५० द.ल.लि. इतका पाणीपुरवठा शहरासाठी करण्यात येत आहे.

भामा आसखेड धरण ते नवलाख उंब्रे येथील BPT पर्यंत १७०० मि.मी. व्यासाची उद्धरण जलवाहिनी (८.८ कि.मी.) व नवलाख उंब्रे BPT ते चिखली जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत १४०० मि.मी. व्यासाची गुरूत्व जलवाहिनी (१८ कि.मी.) टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

भामा आसखेड धरणाजवळ १६७ द.ल.लि. क्षमतेचे जॅकवेल व पंपिंग स्टेशन बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. नवलाख उंब्रे येथे BPT च्या कामाची निविदा नुकतीच प्रसिध्द करणेत आली आहे.

नवीन औद्योगिक धोरणानुसार शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुन:श्च वापर करण्यासाठी महानगरपालिकेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत असल्याचे आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १०१६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री. प्रशांत ठाकूर,श्री. समीर कुणावार, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. अमित साटम, श्री.महेश बालदी, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०१६ खालीलप्रमाणे आहे :-**

"पनवेल (जि.रायगड) शहरातील विज वाहक यंत्रणा अद्यापही जुन्या असून जवळपास ३ किलोमीटरच्या क्षेत्रातील विज वाहिन्या भुमीगत नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, नवी मुंबई विमानतळाजवळ असलेल्या पनवेल शहराच्या विज वाहिन्या भूमिगत नसल्यामुळे शहराचा विकास व सुशोभिकरण करण्यास अडचणी निर्माण होत असणे, विद्युत कंपनीने विज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेला निधी खर्च करण्यास कळविले असणे, परंतु पनवेल महानगरपालिकेकडे शहरातील सर्व वाहिन्या भूमीगत करण्यासाठी पुरेसा निधी नसणे, विज वाहिन्यांवर पक्षी बसून वीज वाहिन्या बंद पडत असणे, पावसाळयात शॉर्ट सर्किटमुळे विज पुरवठा वारंवार खंडीत होत असणे, २५ ते ३० वर्षांपूर्वी टाकण्यात आलेल्या विज वाहिन्या एकाच पोलवर उच्चदाब व लघुदाब अशा प्रकारात असल्यामुळे वीज कर्मचाऱ्यास ग्राहकांची तक्रार सोडविताना दोन्ही वाहिन्या बंद कराव्या लागत असल्यामुळे ग्राहकांना वीज पुरवठा सुरळीत होत नसणे, विज वाहिन्या भूमिगत करण्यासाठी पनवेल महानगरपालिका व स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे वारंवार विनंती केली असणे, परंतु विज वाहिन्या भूमीगत करण्यासाठी कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष, पनवेल शहरातील वीज वाहिन्या भूमीगत करण्यासाठी एमएमआरडीए मार्फत निधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**<u>मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>**

पनवेल महानगरपालिकेची स्थापना दिनांक २६.०९.२०१६ रोजी झाली असून महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ ११०.१६ चौ.मी. आहे. तसेच सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या साधारण १३ लाख आहे. मुंबई महानगरपालिका प्रदेशातील महत्त्वपुर्ण असलेल्या पनवेल महानगरपालिकेचे झपाट्याने नागरीकरण होत असून उच्च प्रतीच्या नागरी सोयीसुविधा नागरीकांना पुरविणे क्रमप्राप्त आहे.

पनवेल महानगरपालिकेने कळविल्यानुसार पनवेल शहर क्षेत्रातील उपरी विद्युतवाहिन्या जीर्ण अवस्थेत आहेत व त्यामध्ये सुधारणा करण्याची नितांत गरज आहे. तसेच येथील नागरीकांना सध्याच्या ओव्हरहेड लाईन्स व पोल तसेच आऊटडोर विद्युत उपकेंद्रामुळे विद्युत पुरवठा वारंवार बंद पडण्याचा त्रास सहन करावा लागतो. तसेच विशेषत: पावसाळ्यामध्ये बऱ्याच ठिकाणी अतिवृष्टीने ओव्हरहेड लाईन्समध्ये फॉल्ट उत्पन्न होतात व विद्युत पुरवठा बंद

पडण्याचे प्रमाण वाढते. महानगरपालिकेच्या क्षेत्रातील वीज वाहिन्या भूमिगत नसल्यामुळे शहराचा विकास व सुशोभिकरण करण्यास अडचणी निर्माण होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, सन २०१७ मध्ये तत्कालीन ऊर्जामंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विद्युत वाहिन्या भूमिगत करावयाची वांरवार मागणी करण्यात आली होती. तद्नुषंगाने महावितरण कंपनीने पनवेल महानगरपालिकेस विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासाठी रक्कम रु. १६८.८८ कोटी महानगरपालिकेमार्फत उभारल्यास पर्यवेक्षणाचे काम हाती घेण्यात येईल असे कळविले होते. सदर कामांसाठी अपेक्षित असलेला खर्च नवनिर्मित पनवेल महानगरपालिकेस करणे शक्य नाही, तथापि, सद्यस्थितीत वाढलेल्या विद्युतवाहिन्याच्या साहित्याच्या दरानुसार उपरोक्त प्रकल्प राबविण्यासाठी अंदाजित रु. २५०.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित असल्याचे पनवेल महानगरपालिकेने कळविले आहे.

दरम्यान शासन निर्णय दिनांक १०.११.२०२१ अन्वये कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प कोकण विभागातील रायगड व इतर जिल्ह्यामध्ये राबविण्यास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त प्रकल्पांतर्गत कोकण किणारपट्टीवरील शहरांमध्ये महावितरण कंपनीच्या ओव्हरहेड विद्युतवाहिन्या भूमिगत करणे व इतर कामे समाविष्ट आहेत. सदर प्रकल्पाकरीता रु. ३२२.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकल्पांतर्गत पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ओव्हरहेड विद्युतवाहिन्या भूमिगत करण्यासाठी रु. १८६.०० कोटीचे अंदाजपत्रक महावितरण कंपनीमार्फत तयार करण्यात आले आहे. तसेच इतर तत्सम कामांच्या खर्चाचा समावेश करुन एकत्रित रु. २५०.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव पनवेल महानगरपालिकेकडून शासनास माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये सादर करण्यात आला आहे.

प्रस्तुत लक्षवेधी सूचनेद्वारे पनवेल महानगरपालिका क्षेत्रात भूमिगत विद्युतवाहिन्या प्रकल्प राबविण्याकरीता एमएमआरडीएमार्फत निधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. उपरोक्त विषयाचे गांभीर्य विचारात घेता, ऊर्जा विभागास तातडीने कार्यवाही करुन सदरचे काम हाती घेण्याच्या सूचना देण्यात येतील. तसेच या संदर्भात पनवेल शहर क्षेत्रातील नागरीकांच्या सोयीच्या व सुरक्षिततेच्या दृष्टिने भूमिगत विद्युतवाहिन्या प्रकल्प समयबध्द पध्दतीने राबवून जलदगतीने पुर्ण करण्याच्या सूचना ऊर्जा विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात येतील.

******

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

**श्री. संजय जगताप, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्र. १४९८ पुढीलप्रमाणे आहे:-**

"हवेली (जि.पुणे) तालुक्यातील फुरसुंगी, उरुळीदेवाची, येवलेवाडी, उंड्री, पिसोळी, आंबेगाव खु व बुद्रुक व इतर अशी अकरा गावे २०१७ मध्ये पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्यात येणे, या समाविष्ट गावांपैकी मौजे फुरसुंगी, उरुळीदेवाची ही गावे पुणे शहरालगत व पुणे पंढरपूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९६५ लगत असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस नागरीकरण वाढत असणे, या समाविष्ट गावांपैकी ९५ टक्के भागांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठ्याची सोय नसणे, उर्वरित पाच टक्के भागात नळाद्वारे पाणीपुरवठा होत असणे, त्या ठिकाणी कमी दाबाने अनियमित अवेळी पाणीपुरवठा होणे, ज्या ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही तेथे टँकरद्वारे पाणीपुरवठा होणे, त्यामध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती व अफरातफर होणे, येथील फुरसुंगी व उरुळीदेवाची येते मनपाचा कचरा डेपो असल्याने पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत दूषित झालेले असणे, त्यामुळे या स्त्रोताद्वारे उपलब्ध होणारे पाणी आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक असणे, याशिवाय येथील गावांना पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या कालव्यात काही विकृत मनोवृत्ती अज्ञान व्यक्ती मृत प्राणी टाकत असल्याने या गावांना दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, त्यामुळे येथील नागरिक नळ पाणीपुरवठा व्हावा व पुरेसे व स्वच्छ पाणी मिळावे यासाठी सातत्याने आंदोलने करीत असतानाही शासन प्रशासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील नागरिकात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

सन २०१७ मध्ये सदर गावांचा समावेश पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये झालेला असून या गावांमध्ये नागरीकरण वाढत आहे ही वस्तुस्थिती आहे. यापैकी काही समाविष्ठ गावांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याची सोय नाही तसेच उर्वरित नळाद्वारे पाणीपुरवठा असणा-या भागामध्ये कमी दाबाने अनियमित व अवेळी पाणीपुरवठा होणे ही बाब अंशत: खरी आहे. ज्या ठिकाणी नळाद्वारे पाणीपुरवठा होत नाही अशा भागात रोटेशन पद्धतीने टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो. यामध्ये विसंगती व अफरातफर आढळून आलेली नाही. फुरसुंगी व उरुळी देवाची येथील पाण्याचे स्त्रोत दुषित होण्याचे पार्श्वभूमीवर नागरिकांना टँकरद्वारे शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येतो. काही विकृत मनोवृत्तीचे अज्ञात व्यक्ती मृत प्राणी टाकत असल्याची घटना यापूर्वी घडलेली आहे. या भागातील नागरिकांना दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होणार नाही व आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता पुणे महानगरपालिके मार्फत घेण्यात येत आहे.

कॅनॉल मधून नागरिकांना थेट पाणीपुरवठा करण्यात येत नाही. फुरसुंगी गावातील नागरिकांना कॅनॉल लगतच्या दोन विहिरीमार्फत तुकाई टेकडी येथील ५ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्रामार्फत शुद्ध पाणीपुरवठा करण्यात येतो. तसेच फुरसुंगी व उरुळी देवाची या गावांना सरासरी २०० खेपा टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो. फुरसुंगी व उरुळी देवाची

या गावांसाठी नळ पाणीपुरवठा व्हावा व पुरेसे व स्वच्छ पाणी मिळावे या करिता शासनामार्फत पाण्याच्या टाक्या व ३३ एमएलडी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र, तुकाई टेकडी येथे बांधण्याचे काम सुरु असून यातूनच फुरसुंगी व उरुळीदेवाची गावास पाणीपुरवठा करण्याचे नियोजित आहे.सदर जलशुद्धीकरण केंद्राचे काम व टाक्यांची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत आहेत. जलशुद्धीकरण केंद्राचे काम ९५ % , रॉ वॉटर लाईनचे काम १०० % व ११ टाक्यांपैकी ५ टाक्यांची कामे पूर्ण झाली असून ६ कामे सुरु आहेत. फुरसुंगी उरुळी देवाची या गावांव्यतिरिक्त इतर गावामध्ये १० % ते ९० % घरांना नळजोडाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो व उर्वरित घरांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

नवीन समाविष्ठ गावांसाठी पुढील ३० वर्षातील अंदाजीत लोकसंख्येसाठी विस्तृत प्रकल्प आराखडा करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर सल्लागार यांच्यामार्फत एकत्रित प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. सदर सर्व गावाना पुढील ३० वर्षांच्या कालावधीमध्ये भविष्यातील लोकसंख्या वाढ लक्षात घेता पुणे महानगरपालिकेकडून टप्याटप्याने गावनिहाय छोटे प्रकल्प राबवून उपलब्ध पाणीसाठ्या मधूनच सदर गावांना पाणीपुरवठा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. समाविष्ठ गावातील जुन्या हद्दीलगतच्या ज्या भागांना अस्तित्वातील वितरण व्यवस्थेमधून पाणीपुरवठा करणे शक्य आहे अशा भागांसाठी जलवितरण नलिका विकसित करण्याची कामे करण्यात येत आहेत. ११ गावांसाठी आजअखेर महसुली तरतूद रु.९०.४७ कोटी खर्च करण्यात आला असून सन २०२३-२४ मध्ये रु.२२.८४ कोटी महसुली तरतूद करण्यात आलेली आहे व भांडवली तरतूद रु. २२.९८ कोटी खर्च करण्यात आला असून सन २०२३-२४ मध्ये रु. ९३.७० कोटी भांडवली तरतूद करण्यात आलेली आहे. याप्रमाणे ११ नवीन गावांसाठी महसुली व भांडवली असा एकूण आज अखेरपर्यंत रक्कम रु. ११३.४५ कोटी एवढा खर्च झालेला आहे. तसेच मुख्यमंत्री पेयजल योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे रु. ३१.०६ कोटी वर्ग करण्यात आलेले आहे.

*****

लक्षवेधी सूचना क्र. १५६०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**श्री.सुरेश (राजूमामा) भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १५६० खालीलप्रमाणे आहे :-**

"वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात शहरात सांडपाणी आणि घनकचरा प्रकल्प राबविण्यात अपयशी ठरलेल्या महापालिकेला राष्ट्रीय हरित लवादाने प्रति महिना १० लाख इतका दंड ठोठावलेला असणे, एकूण १७० कोटी रुपये दंड एक महिन्याच्या आत भरण्याचे निर्देश देऊनही अद्याप महापालिकेने दंडाची रक्कम अदा न केल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच निदर्शनास येणे, त्याचबरोबर दंडाच्या रकमेतून सांडपाणी प्रकल्प सुरु करण्याचे निर्देशही देण्यात येणे, वसई-विरार महापालिका हद्दीतील क्षेत्रात १२ सांडपाणी प्रकल्प (एसटीपी) प्रस्तावित असताना केवळ एकच सांडपाणी प्रकल्प सुरु असणे, सदर सुरु असलेला एकमेव घनकचरा प्रकल्प बंद असणे, हरित लवादाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात येणे, या समितीच्या पाहाणीत १ लाख २१ हजार टन इतका कचरा प्रक्रिया न करता क्षेपणभूमीवर जमा असल्याचे आढळून येणे, शहरात सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच हे पाणी थेट समुद्रात सोडण्यात येत असल्याने अरबी समुद्र, वसई व वैतरणा खाडी प्रदूषित होत असल्याची हरित लवादाने दखल घेणे, यासंदर्भात पर्यावरणवादी कार्यकर्ते चरणभट यांनी महापालिके विरोधात केंद्रीय हरित लवादाने दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी याचिका दाखल करण्यात येणे, दंड रक्कम महापालिकेने एक महिन्यात भरणा करावी, अन्यथा महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्याचे सक्त आदेश हरित लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला देण्यात येणे, प्रदूषण नियंत्रणावर लवादाच्या आदेशाचे पालन न करता आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरु न करणाऱ्या महापालिकेने पर्यावरणा सारख्या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास येणे, संबंधित अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई न होणे, यामुळे शहरातील करदाता जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार प्रदुषणास प्रतिबंध व नियंत्रण कायदा, १९७४ कलम ३३ (अ) मधील तरतुदीनुसार प्रतिदिन रु. १०.५० लक्ष यानुसार नुकसान भरपाई भरणा करण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिनांक २५.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेने कळविले आहे. तसेच राष्ट्रीय हरीत लवादाकडे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र. ३२/२०२१ मध्ये दिलेल्या दिनांक १२.०७.२०२१ रोजी दिलेल्या आदेशान्वये सदर प्रकरणी स्वच्छ पर्यावरणाचे मापदंड पालन न केल्याने, याबाबत महानगरपालिकेकडून होणाऱ्या उपाययोजनांवर देखरेखीसाठी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी, पालघर यांच्या संयुक्त समिती गठित करण्याचे निर्देश दिले आहेत. तथापि, सदर समितीने त्यांचा अहवाल राष्ट्रीय हरित लवादाकडे दाखल केला आहे.

दरम्यान राष्ट्रीय हरित लवादाच्या दिनांक १२.०७.२०२१ च्या आदेशास अनुसरुन, महाराष्ट्र नियंत्रण मंडळाने दिनांक २८.०१.२०२२ रोजीच्या पत्राद्वारे वसई-विरार शहर महानगरपालिकेस दिनांक ०१.०७.२०२० ते दिनांक २७.०१.२०२२ या कालावधीत ७५ द.ल.लि सांडपाण्यावर प्रक्रिया होत नसल्याने रु. ११३.५८ कोटी व दिनांक ०१.०४.२०२० पासून घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील तरतुदीनुसार रु. १० लक्ष प्रति महिना नुकसान भरपाई भरणा करण्यास कळविले आहे, ही वस्तुस्थिती आहे. उपरोक्त नुकसान भरपाईच्या विरोधात वसई-विरार शहर महानगरपालिकेने न्यायालयीन याचिका दाखल केली असता महानगरपालिकेने काही प्रशासकीय कारणास्तव सदरची याचिका मागे घेतली आहे.

राष्ट्रीय हरीत लवादाकडे दाखल करण्यात आलेल्या याचिका क्र. ३२/२०२१ मध्ये सदर प्रकरणात यापूर्वी गठीत करण्यात आलेल्या संयुक्त समितीचे निरीक्षणे व शिफारसी विचारात घेऊन दिनांक ०३.०५.२०२३ रोजी राष्ट्रीय हरित लवादाने नव्याने आदेश निर्गमित केले असून त्या अन्वये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास यापूर्वी महानगरपालिकेस मलनि:स्सारण प्रक्रिया केंद्राची उभारणी न केल्याबद्दल ठोठावण्यात आलेल्या दंडाची रक्कम रु. ११३.५८ कोटी उक्त आदेशाच्या दिनांकापर्यंत नव्याने परिगणित करावी व घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार नुकसान भरपाईची रक्कम देखील आजतागायत प्रतिमहिना रु. १० लक्ष या नुसार मोजणी करण्याचे आदेश दिले आहेत. उपरोक्त आदेशाचे अनुपालन न झाल्यास महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याबाबत नमूद करण्यात आले आहे. तथापि, सदर प्रकरणी संबंधित प्राधिकरणाकडून नव्याने परिगणना केलेले सुधारित आदेश अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याचे महानगरपालिकेने नमूद केले आहे. सदर आदेश प्राप्त झाल्यावर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती व कायदेशीर सल्ला मसलत करुन पुढील कार्यवाही करण्याची तजविज महानगरपालिकेने ठेवली आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात मलनि:स्सारण प्रकल्पाकरीता १० जागांवर आरक्षण ठेवण्यात आले आहे. तथापि, सद्यस्थितीत अमृत-२ अंतर्गत मलनि:स्सारण प्रकल्पाचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी आचोळे, नालासोपारा, पुर्व झोन-३ (१०३.५ द.ल.लि. क्षमता) रु. ४३१.२८ कोटीच्या सविस्तर प्रकल्प अहवालास दिनांक ०६.०३.२०२३ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सद्यस्थितीत निविदा राबविण्यात आली आहे. तसेच अन्य २ प्रकल्प प्रस्तावाची छाननी शासन स्तरावर सुरु आहे.

तसेच वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मौजे भोयदा पाडा, गोखीवरे क्षेपणभूमीवर पडून राहीलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता रु. ८२.५० कोटींचा प्रकल्प उभारण्याचे महानगरपालिकेने प्रस्तावित केले असून दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे अंतर्गत रु. १७८.०० कोटीच्या प्रकल्पाची सद्य:स्थितीत निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून आगामी काळात त्याचे कार्यादेश महानगरपालिका स्तरावर निर्गमित करण्यात येणार आहेत. अशा प्रकारे महानगरपालिका क्षेत्रात सांडपाण्यावर प्रक्रिया करणे व घनकचरा व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.

****

लक्षवेधी सूचना क्र.६०२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे दुसरे पावसाळी अधिवेशन

श्री. किशोर पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"तिन्ही विज कंपनीतील तांत्रिक कामगारांना आर्थिक भार नसलेली स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करणेबाबत प्रधान सचिव (उर्जा) यांना सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी माहे मार्च, २०२३ रोजीच्या सुमारास आदेश देऊन कोणतीच कार्यवाही अद्यापपर्यंत करण्यात न येणे, त्यानंतरही स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. प्रधान सचिव, कामगार, उदयोग व उर्जा विभाग, महाराष्ट्र राज्य यांना दि.१.६.२०२३ रोजीच्या सुमारास निवेदन देण्यात येणे, परंतु अद्यापही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने कामगारांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने अहवाल सादर करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

महावितरण,महानिर्मिती व महापारेषण या तिन्ही विज कंपनीतील तांत्रिक कामगारांना आर्थिक भार नसलेले स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचे मा. श्री. किशोर अप्पा पाटील, विधानसभा सदस्य यांनी दि.१६.०१.२०२३ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली होती. सदर पत्रावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी **"प्रधान सचिव (ऊर्जा) सदर प्रकरणात संबंधितांची तात्काळ बैठक घेऊन सविस्तर अहवाल सादर करावा"** असे निर्देश दिले होते. सदर निर्देशास अनुसरुन मा. प्रधान सचिव (ऊर्जा) यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दि. ०२.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. त्यांच्या मंत्रालयीन दालनात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस तिन्ही कंपन्यांचे व्यवस्थापन प्रतिनिधी व संघटनेचे पदधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत मा.प्रधान सचिव (ऊर्जा) यांनी संचालक (मा.स.) महावितरण, महापारेषण व कार्यकारी संचालक (मा.सं.) महानिर्मिती यांच्या अभिप्रायासह अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. सदर निर्देशास अनुसरुन दि.२३.०३.२०२३ च्या पत्रान्वये तिन्ही विज कंपनीतील तांत्रिक कामगारांना आर्थिक भार नसलेले स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची सविस्तर वस्तुस्थिती संचालक (मा.स.) महावितरण, महापारेषण व कार्यकारी संचालक (मा.सं.) महानिर्मिती यांनी अहवालामध्ये सादर केली असून ती खालीलप्रमाणे आहे :-

तांत्रिक कामगारांच्या मागणीनुसार तांत्रिक कामगारांचे कामाचे तास जास्त असून आणि कामातील धोक्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे सन २००५ मध्ये तांत्रिक कर्मचाऱ्यांना सा.आ.क्र.१६६ दि.२१.०७.२००५ मध्ये नमुद केल्यानुसार दोन अतिरिक्त वेतनवाढी लागू करण्यात आलेल्या आहेत.महाराष्ट्र राज्य विज मंडळ सेवा व भरती विनिमय अंतर्गत जे कर्मचारी आय. टी. आय उत्तीर्ण झालेले असून त्यांचा तांत्रिक वर्गवारी समावेश होतो व अपेन्डिक्स अ मध्ये नमुद केलेले तांत्रिक कर्मचारी ज्यांचे ड्युटीचे ८ तास आहे आणि ज्यांना दुसरा व चौथा शनिवार सार्वजनिक सुट्टी स्थानिक सुट्टी मिळत नाही (फक्त ६ भरपगारी सुट्या मिळतात) असे कर्मचारी पात्र आहेत. तांत्रिक वर्गवारी मधील अभियांत्रिकी वर्गवारीतील पदे जी ओ.११३ (पी) दि.२९.०६.१९९२ मध्ये नमुद असलेल्या कर्मचारी पात्र नाहीत. तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या दि.०१.०७.२००५ मध्ये अस्तित्वात असलेल्या मुळ वेतनामध्ये दोन अतिरिक्त वेतनवाढी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सद्यस्थितीत अस्तित्वात असलेले वेतनश्रेणीच्या मुळ वेतनात दोन अतिरिक्त वेतनवाढी समाविष्ट करण्यात येतात. सन २०१८-२३ मधील वेतन निर्धारणमध्ये तांत्रिक कर्मचाऱ्यांना रु.५००/- प्रतिमहा वेतनात अतिरिक्त रक्कम नव्याने समाविष्ट करण्यात आलेली आहे. सन २०१८-२३ वेतन पुर्ननिर्धारणमध्ये सदर विषय वेतन पुर्ननिर्धारण समितीपुढे मांडण्यात आला होता. परंतु महावितरण कंपनीमध्ये वर्ग-१ ते वर्ग-४ पर्यंत एकूण २२ वेतनश्रेणी अस्तित्वात आहेत त्यामुळे दोन वेतनवाढी मुळ वेतनात सामाविष्ठ करुन पुन्हा स्वतंत्र वेतनश्रेणी निर्माण करणे संयुक्तीक होणार नाही असा निर्णय तत्कालीन वेतन पुर्ननिर्धारण समितीव्दारे घेण्यात आला होता. सन २०१९ मध्ये संघटनांनी पुनश्चः तांत्रिक कर्मचाऱ्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढी मंजूर करीत असताना वेतन निश्चितीवेळी निर्माण होणारी तफावत व इतर बाबींच्या अनुषंगाने स्पष्टीकरण देण्यासाठी प्रशासकीय परिपत्रक क्र. २०९२३ दि.२६.०७.२०१९ अन्वये मार्गदर्शक सुचना पारीत केलेल्या आहेत. वेतनश्रेणीमध्ये बदल फक्त वेतन पुर्ननिर्धारण काळात करण्याची प्रथा आहे. वेतनश्रेणी निश्चिती कराररनामानुसार सर्व संघटनांबरोबर व्यवस्थापनामार्फत वाटाघाटी करण्यात येते. सदर करारनामाची कालमर्यादा ०५ वर्षाची असते. करारनामाच्या कालावधीमध्ये कोणत्याही कारणास्तव फेरबदल करणे संयुक्तिक नाही जेणे करुन करारनामाचे उल्लंघन होणार नाही. सदर बाब पुनश्चः सन २०२३ २०२८ या वेतन पुर्ननिर्धारण करारनामा कालावधीमध्ये चर्चा करता येईल.

३. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता संचालक (मा.स.) महावितरण, महापारेषण व कार्यकारी संचालक (मा.सं.) महानिर्मिती यांनी तिन्ही विज कंपनीतील तांत्रिक कामगारांना आर्थिक भार नसलेले स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करण्याबाबत खालीलप्रमाणे निष्कर्ष नमूद केले आहे.

३.१. उपरोक्तप्रमाणे संघटनेमार्फत मागणी केल्यानुसार वेतनश्रेणी निर्माण केल्यास अतिरिक्त सहा वेतनश्रेण्या निर्माण होतील.

३.२. समकक्ष वेतनश्रेणीतील अतांत्रिक कर्मचाऱ्यांमध्ये रोष उत्पन्न होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३.३. अतांत्रिक कर्मचारी व संघटना याबाबत आक्षेप घेतील व विवाद उत्पन्न होईल.

३.४. तांत्रिक कर्मचाऱ्यांना दोन अतिरिक्त वेतनवाढी मुळ वेतनात समाविष्ट करुन वेतन निश्चिती करण्यात येत असल्यामुळे त्यांचे कोणतेही आर्थिक नुकसान होत नाही.

३.५. याबाबत तफावत निर्माण झाल्यास मुख्य कार्यालयांमार्फत परिपत्रक काढण्यात येते व मार्गदर्शक सुचना पारित करण्यात येतात.

३.६. *सध्या अस्तित्वात आलेल्या वेतनश्रेणी तिन्ही कंपनीमध्ये समान आहेत त्यामुळे पुन्हा यामध्ये बदल करून, विस्कळीत करुन स्वतंत्र वेतनश्रेणी निर्माण करणे संयुक्तिक वाटत नाही.*

३.७. सदर प्रकरणी सर्वकष अमलबजावणीकरिता तिन्ही कंपनी त्यांच्या, ERP SAP प्रणालीमध्ये उपरोक्त बाब अंतर्भूत करून याबाबत सर्व क्षेत्रीयप्रशासकीय अधिकारी यांना योग्य कार्यवाही करण्याबाबत निर्देशीत करण्यात येईल.

४. वरील तीनही कंपन्यांच्या संचालक (मासं) यांच्या मान्यतेने सादर केलेल्या निष्कर्षाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, ६ तांत्रिक पदांच्या वेतनश्रेणी व ०६ अतांत्रिक पदांची वेतनश्रेणी समकक्ष आहेत. तांत्रिक कर्मचाऱ्यांना त्यांचे मागणी प्रमाणे ०६ स्वतंत्र वेतन श्रेणी निर्माण केल्यास, अतांत्रिक पदांवरील कर्मचाऱ्यांकडूनही अशी मागणी येऊ शकते. तांत्रिक कर्मचाऱ्यांचे कामाचे स्वरूप व कामाचे तास पाहता दि. ०१.०७.२००५ पासून अतिरिक्त दोन वेतनवाढी मूळ वेतनामध्ये समाविष्ट करुन वेतन निश्चित करण्यात येते. तसेच २०१८- २३ मधील वेतन पुर्ननिर्धारणाच्या वेळी तांत्रिक कर्मचाऱ्यांना रु. ५०० प्रतिमहा वेतनात अतिरिक्त रक्कम देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कर्मचारी संघटना व व्यवस्थापन यांच्यामध्ये दर पाच वर्षांनी वेतन पुर्ननिर्धारण करार करण्यात येतो. त्यानुसार सर्व संघटनासोबत चर्चा करुन वेतन निश्चितीचा आढावा घेऊन वेतन पुर्ननिर्धारण करण्यात येते. सदरहु मागणी ही वेतन पुर्ननिर्धारणाशी निगडीत असल्याने सदर तांत्रिक कर्मचाऱ्यांना स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करण्याच्या मागणीची बाब सन २०२३-२८ या कालावधीसाठी तिनही कंपन्यांच्या गठीत वेतन पुर्ननिर्धारण समितीसमोर पुनःश्च विचारार्थ ठेवण्यात येईल.

*********************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. विश्वजित कदम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९२१ पुढीलप्रमाणे आहे:-**

"महावितरणाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मनमानीपणामुळे सांगली जिल्हयात भारनियम नसतानाही भारनियमांचे खोटी कारणे देवुन कधीही व कोणत्याही क्षणी वीज पुरवठा खंडीत करण्यात येत असल्याच्या घटना वारंवार घडत असणे, अपुरा आणि कमी क्षमतेने वीज पुरवठा होत असल्याने कृषिपंप चालत नसणे, विद्युत पंप खराब होणे, ट्रान्सफार्मर नादुरुस्त होवून जळणे,असे प्रकार सुरु असल्यामुळे शेतीला पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे पिक वाळून मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, यामुळे शेतकरी यांच्यावर मोठे संकट कोसळणे, पाणी पुरवठा व्यवस्थित सुरळीत होण्यासाठी विद्युत पुरवठा नियमिती व सुरळीत होण्यासाठी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत असलेली मागणी, वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असतांना वीज बिल मात्र नेहमीच वाढत असणे, यामुळे ग्रामस्था व शेतकरी यांच्यात निर्माण होत असलेला असंतोष, वारंवार खंडीत होत असलेला वीज पुरवठा, सुरळीत व नियमीत सुरु करण्याबाबत तसेच वारंवार होत असलेली वीज बिलात वाढ थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

सांगली जिल्हयाअंतर्गत शेतीकरीता महावितरणच्या नियमाप्रमाणे दिवसा ८ तास व रात्री ८ तास चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा केला जातो. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत ३३/११ के.व्ही. वालेखिंडी, उपकेंद्राअंतर्गत ११ के.व्ही. वालेखिंडी, ११ के.व्ही. बेवनूर ए.जी., ३३/११ के.व्ही. नागेवाडी उपकेंद्रातुन ११ के.व्ही. गवान ए.जी. व ११ के.व्ही. वडगाव ए.जी. या ४ कृषी वाहिनींना सर्व दिवस पूर्ण वेळ दिवसा वीज पुरवठा करण्यात येतो.

सांगली जिल्हयामध्ये ११ के.व्ही. च्या एकूण १०१० उच्चदाब वाहिन्या आहेत, त्यापैकी शेती पंपाकरीता ११ के.व्ही. च्या ३८७ उच्चदाब वाहिन्या आहेत. सांगली जिल्हयाअंतर्गत तासगाव, आटपाडी, खानापुर, जत व कवठेमहांकाळ या तालुक्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी मुबलक प्रमाणात टेम्भू, म्हैसाळ व ताकारी योजनेचे पाणी उपलब्ध झाल्यामुळे, सदर गावामध्ये शेतीकरीता वीज मागणीमध्ये वाढ झाली. सांगली जिल्हयाअंतर्गत या वाढलेल्या मागणीमुळे या भागातील काही वीज वाहिन्यांवरील भार २०० Amp. पेक्षा जास्त वाढल्यामुळे अतिभारीत झाल्या. सदर वाहिन्या अतिरीक्त भारीत झाल्यामुळे तांत्रिकदृष्टया वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले. याशिवाय कोणत्याही सबळ व तातडीच्या कारणाशिवाय भारनियमन केले जात नाही.

तथापि,महापारेषणच्या ४००/२२० के.व्ही. अलकुड (M) या उपकेंद्रातील ICT अतिभारीत होत असल्यामुळे माहे एप्रिल २०२३ मध्ये एकूण ५७ वीज वाहिन्यावर एकूण ९२ तासाचे सक्तीचे भारनियमन करण्यात आले होते.

सांगली जिल्हयातील ११ के.व्ही. एकूण ६२३ अकृषी वीज वाहिन्यापैकी २४२ वीज वाहिन्यावर माहे एप्रिल २०२३ मध्ये प्रति वाहिनी सरासरी ५ तास १८ मिनिट वीज पुरवठा खंडीत झाला होता. तसेच माहे मे २०२३ मध्ये ११ के.व्ही. एकूण ६२३ अकृषी वीज वाहिन्यापैकी २४६ वाहिन्यावर सरासरी ६ तास व माहे जून २०२३ मध्ये २५१ वाहिन्यावर सरासरी ४ तास ०६ मिनिट वीज पुरवठा खंडित झाला होता.

सदर वाहिन्यावर मान्सुनपूर्व वादळ वारे व पाऊस या नैसर्गिक आपत्तीमुळे तसेच इतर तांत्रिक कारणास्तव वीज पुरवठा खंडीत झाला होता. परंतु महावितरणचे कर्मचारी व सूचिबध्द कंत्राटदारांमार्फत वीज वाहिनीवरील बिघाड तात्काळ दुरुस्त करुन कमीत कमी वेळेत वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

सांगली जिल्हयाअंतर्गत वीज वाहिन्यावर होणारे बिघाड व त्यामुळे खंडीत होणारा वीज पुरवठयाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने देखभाल दुरुस्तीच्या अंतर्गत ७२८ वितरण पेटी बदलणे, २०३०६ स्पेसर्स बसविणे, १२९ कि.मी. कंडक्टर बदलणे व २६४६ इन्सुलेटर बदलणे अशी विविध कामे करण्यात आली आहेत. सदर केलेल्या कामामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

तसेच शेतीपंप रोहित्रावरील भार वाढल्यामुळे रोहित्र अतिभारीत होऊन दि.०१.०४.२०२३ ते १५.०७.२०२३ या कालावधीत १२७३ रोहित्र नादुरुस्त झाले. नादुरुस्त झालेले सर्व ट्रान्सफॉर्मर लगेच बदलून देण्यात येतात व आजअखेर सर्व नादुरुस्त झालेली रोहित्रे बदलण्यात आली आहेत.

अतिरिक्त भारीत झालेल्या वाहिन्यावरील वीज भार कमी करुन पुर्ण क्षमतेने वीज पुरवठा करण्याच्या हेतुने व वाढीव वीजेची मागणी पूर्ण करण्याकरीता कृषी पंप वीज जोडणी धोरण -२०२० अंतर्गत ३३/११ के.व्ही. चे ११ नविन उपकेंद्र व ३ उपकेंद्रांमध्ये अतिरीक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर बसविण्याची कामे मंजूर असून सदर काम प्रगतीपथावर आहेत. तसेच योग्य दाबाने वीज पुरवठा करणेसाठी विविध योजनेतंर्गत ११ के.व्ही. लिंक लाईन टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सांगली जिल्हयाअंतर्गत विविध योजनेअंतर्गत २८७७ नविन रोहित्र उभारणीची कामे करण्यात आली आहेत व उच्चदाब वितरण प्रणाली अंतर्गत २६१४ नविन रोहित्र उभारणीची कामे करण्यात आली आहेत.

विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदीनुसार मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास राज्यातील वितरण कंपनीसह अन्य वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. महावितरणला विद्युत अधिनियम २००३ व सदर विनियमातील तरतुदीनुसार मा. आयोगाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे अनिवार्य आहे. ग्राहकांनी उपस्थित केलेले सूचना/हरकती/अभिप्राय विचारात घेऊन व संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा. आयोगातर्फे वीजदर आदेश निर्गमित करण्यात येतात. मा. आयोगाच्या वीजदर आदेशानुसार प्रत्येक ग्राहकांकडून त्यांच्या वर्गवारीप्रमाणे वीज दराची आकारणी करण्यात येते.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (MERC) मंजुर केलेल्या पध्दती नुसार महावितरणच्या मीटर असलेल्या कृषी ग्राहकांना मीटर वरील नोंदी प्रमाणे व मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांना त्यांच्या जोडभारा प्रमाणे बिलिंग केली जाते. ज्या ग्राहकांचे मिटररिडींग उपलब्ध होत नाही अशा ग्राहकांना मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे त्यांच्या मागील सरासरी वीज वापरानुसार वीज देयक आकारण्यात येते. ग्राहकांना वीज देयकाबावत शंका असल्यास ते महावितरणच्या स्थानिक कार्यालयाशी संपर्क साधून अथवा महावितरणच्या ऑनलाईन संपर्क माध्यमाद्वारे (Call centers, Mobile app, WSS किंवा Missed call facility) आपली तक्रार नोंद करू शकतात. सदर तक्रारीचे निरसन करुन देयकांमध्ये काही त्रुटी आढळल्यास त्या त्वरीत दुरुस्त करण्यात येतात.

सांगली जिल्हयामध्ये २,५२,९८३ लघुदाब कृषी वीज ग्राहक असून सन २०२२-२३ मध्ये एकूण १०,११,९३२ वीज देयके वितरीत करण्यात आली. त्यापैकी फक्त ११,५६४ (१.१४%) ग्राहकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या व त्यांचे निवारण करण्यात आले. त्यापैकी १०,५२८ कृषी ग्राहकांची वीज देयके दुरुस्ती करण्यात आली.

सांगली जिल्हयामध्ये लघुदाब कृषी वीज ग्राहकांची सन २०२२-२३ मध्ये मागणी (विनाअनुदानित) रु. २९८.०५ कोटी इतकी असून वसुली रु. ३७.१९ कोटी असून वसूलीचे प्रमाण १२.४८% इतके अल्प आहे. मार्च २०२३ अखेर थकबाकी रु. १७२९.९६ कोटी इतकी आहे.

*******************

एच-१२८७ -१अ.

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री. सचिन कल्याणशेट्टी , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७२० पुढीलप्रमाणे आहे:-**

" सोलापूर जिल्हयात कृषी आकस्मित निधीतून शेतकऱ्यांसाठी मंजुरी मिळालेल्या रोहित्राच्या कामांबाबत सर्व प्रशासकीय प्रक्रिया होऊन कार्यादेश देणे, परंतु मागील तीन वर्षापासून त्यावर ठेकेदाराकडून अद्यापही काम सुरु केलेले नसणे, सदर ठेकेदार हा रोहीत्रांची कामे विहित कालावधीत पूर्ण करत नसल्याने व संबंधित विभागाचे अधिकारी त्यांना पाठीशी घालत असल्याचे दिसून येणे, ठेकेदाराचा मनमानी कारभार सुरु असून त्याच्यांकडून कामे विहीत कालावधीत होत नसतानाही पुन्हा त्याच ठेकेदाराला इतरही कामे देण्यात येणे, एकूणच या सर्व गैरकारभाराची सखोल चौकशी करुन शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन

राज्य शासनाच्या कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० नुसार कृषीपंप ग्राहकांकडून माहे सप्टेंबर, २०२० पर्यंत असणाऱ्या थकबाकीपैकी, थकबाकीवसुली योजनेअंतर्गत जमा रकमेच्या ३३% रक्कम संबंधीत ग्रामपंचायतीमध्ये, ३३% रक्कम जिल्हास्तरीय कामासाठी, उर्वरित निधी महावितरणच्या मुख्यालय स्तरावरील मंजूर कामासाठी विविध स्तरावरील सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने वापरण्यात येतो. हा निधी कृषी ग्राहकांच्या वीजेच्या पायाभुत सुविधा (नविन तसेच सक्षमीकरण) तसेच सेवा सुधारण्यासाठी वापरण्यात येतो.

सोलापूर जिल्हयामध्ये कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत कृषी ग्राहकांकडून माहे सप्टेंबर-२०२० पर्यंतच्या थकबाकीपोटी रू. ६१.०२ कोटीची वसुली झाली आहे. त्यापैकी रू. २०.१३ कोटी इतका निधी ग्रामपंचायत स्तरावरील कामे करण्यासाठी कृषी आकस्मिकता निधी (Agriculture Contingency Fund) उपलब्ध असून सदर निधीमधून एकुण मंजूर १३१२ वितरण रोहित्रांपैकी १२६५ वितरण रोहित्रांची कामे करण्याकरीता विभागीय स्तरावर निविदा प्रक्रियाद्वारे निवडलेल्या सुचिबध्द (Empanelled) ७२ कंत्राटदारांना कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत. त्यापैकी ७६८ वितरण रोहित्रांची कामे पूर्ण करण्यात आली असून ४९७ वितरण रोहित्रांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ४७ वितरण रोहित्रांची कामे कृषी आकस्मिकता निधीच्या उपलब्धतेनुसार करण्याचे नियोजित आहे.

याशिवाय जिल्हास्तरीय कृषी आकस्मिकता निधी मधुन सोलापूर जिल्हयामध्ये १० नवीन उपकेंद्र, १९ उपकेद्रातील रोहीत्रांची क्षमता वाढ व ०४ उपकेंद्रांमध्ये अतिरीक्त रोहीत्र आस्थापित करणे इत्यादी कामांना मंजुरी देण्यात आली असून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून दि. १५.०५.२०२३ रोजीच्या पत्रान्वये मे. सोनु सर्व्हिसेस, सोलापूर या एजन्सीसंदर्भात डीपीडीसी, एसीएफ व एचव्हीडीएस योजनेंतर्गत करण्यात येणारी कामे प्रलंबित असून जी कामे करण्यात आलेली आहेत ती निकृष्ट दर्जाची असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे व वारंवार पाठपुरावा करुन देखील कामे होत नसल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने अधिक्षक अभियंता, सोलापूर यांचेतर्फे दि. २४.०५.२०२३ रोजी चौकशी समिती गठीत करण्यात आली.

सदर समितीने मे. सोनु सर्व्हिसेस, सोलापूर या एजन्सीने केलेल्या कामांची स्थळतपासणी केली. अहवालातील निष्कर्ष पाहता ठेकेदाराने वेळेत कामे केलेली असल्याचे व निकृष्ट दर्जाची कामे केल्याचे

आढळून आले नाही परंतू कामामध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. त्याअनुषंगाने मे. सोनू सर्व्हिसेस यांनी विविध योजनेत केलेल्या कामात आढळलेल्या त्रुटीप्रमाणे महावितरण कंपनीच्या नियमानुसार सदर ठेकेदाराच्या सुरक्षा ठेव रक्कमेतून रू. ९०,६६०/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

जे कंत्राटदार रोहित्रांची कामे विहित कालावधीत पूर्ण करत नाहीत अशा कंत्राटदारांची कामे काढून त्या भागातील इतर कंत्राटदारांना कामे देण्यात येऊन, सदर कामे पूर्ण करण्यात येत आहेत. मे. दत्तगुरु इलेक्ट्रिकल्स, कुर्डुवाडी यांच्याकडील एका रोहित्राचे काम काढून मे. धनंजय स्वयंरोजगार विद्युत सहकारी यांना देण्यात आलेले आहे. मे. दत्तगुरु इलेक्ट्रिकल्स, कुर्डुवाडी या कंत्राटदारास पुढील कामे देण्यात आलेली नाहीत. परंतू, कंत्राटदार काळया यादीत नसल्यास व निविदा प्रक्रियाव्दारे पात्र झाल्यास त्यांना इतर कामे मिळू शकतात.

याशिवाय RDSS योजने अंतर्गत सोलापूर मंडळामध्ये "वितरण प्रणालीतील हानी कमी करणे" या घटकांतर्गत रु. ४७५.१३ कोटी व स्मार्ट मीटरसाठी रु. ४४३.८८ कोटी अशी एकुण ९१९.०१ कोटी रुपयांची कामे प्रस्तावित आहेत. त्याकरिता निविदा प्रसिद्ध केल्या असून कार्यादेश देण्याचे काम सुरु आहे. तसेच कृषी व अकृषी वाहिनी विलगीकरणाच्या कामांमध्ये सोलापूर जिल्हयातील २०१ वाहिन्यांच्या रु.२७७.२३ कोटींच्या कामांचा समावेश असून, याबाबतचे कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

"वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण व आधुनिकीकरण" या घटकांतर्गत सोलापूर जिल्हयामध्ये २५ नवीन उपकेंद्र, ०१ पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ, १२ अतिरीक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर, १३९३ नवीन वितरण रोहित्र, व ३५२ रोहित्रांची क्षमतावाढ इत्यादी रु. ३९५.२४ कोटीची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. सदर घटकास सन २०२३-२४ मध्ये केंद्र शासनाची संमती मिळणे अपेक्षित आहे व संमती प्राप्त झाल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार व तांत्रिक प्राधान्यक्रमानुसार सदर कामे पुर्ण करण्याचे नियोजित आहे.

******************************



D/Urja-५/मार्च- २०२२/लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. १००२ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

श्री. सुनिल कांबळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत हुक्कापार्लरचा प्रश्न ऐरणीवर आला असणे, या हुक्कापार्लरमुळे काही दिवसापूर्वी मुंबईत लागलेल्या आगीप्रमाणे पुण्यातही आग लागण्याची घटना घडू शकते, त्यामुळे वेळीच अशा बेकायदा हुक्कापार्लरवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात असणे, पुणे शहरात कोरेगांव पार्क, मुंढवा, हडपसर, कोंढवा या परिसरात अनेक नामांकित हॉटेल्स व पबमध्ये हुक्कापार्लर चालू असणे, पोलिसांकडून काही प्रमाणात कारवाई केली जाणे, मात्र, त्यानंतर ही हुक्कापार्लर पुन्हा सुरू झाल्याचे दिसून येणे, काही ठिकाणी छुप्या तर कुठे उघड पद्धतीने ही हुक्कापार्लर सुरू असणे, त्यामुळे अशा हुक्कापार्लरवर वेळीच कारवाई करण्याची आवश्यकता असणे, तरुणाईमध्ये हुक्क्यांचा मोठा क्रेझ असणे, पुणे शहरातही हुक्कापार्लरमध्ये तरुणाईची मोठी गर्दी असणे, तरुणांकडून तंबाखूच्या सेवनासाठी हुक्क्याचा आधार घेतला जाणे, त्यात वेगवेगळ्या फ्लेवर उपलब्ध करून देण्यात येणे, पुण्यात हुक्क्यासाठीचे 52 प्रकारचे फ्लेवर मिळत असून, तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची माहिती समोर आली असणे, त्यामुळे पालकांसाठी हुक्का पार्लर ही मोठी डोकेदुखी ठरत असणे, हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिला जाणे, दुर्दैवाने त्या ठिकाणी आगीसारखा प्रकार घडला तर मोठी दुर्घटना घडू शकते, त्यामुळे पोलिसांनी वेळीच जागे होऊन त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी मागणी नागिरकांकडून केली जात असणे, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

केंद्र शासनाच्या सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादन (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये राज्य शासनाने सुधारणा करुन सदर अधिनियमात हुक्का पार्लरचा समावेश केला आहे. सदर (सुधारित) अधिनियम, २०१८ दिनांक ०४.१०.२०१८ पासून अस्तित्वात आला असून, राज्यामध्ये हुक्का पार्लरवर बंदी लागू करण्यात आली आहे. पुणे शहर व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत पोलिसांमार्फत हुक्का पार्लर चालविण्यासाठीचा परवाना देण्यात येत नाही. पुणे शहर व व पिंपरी चिंचवड आयुक्तालयांतर्गत अनधिकृत हुक्का पार्लरबाबत पोलीस ठाणे स्तरावर तसेच गुन्हे शाखा यांचेकडून माहिती घेण्यात येते. तसेच नागरिकांकडून व गुप्त बातमीदारांकडून प्राप्त माहितीची खातरजमा करून हुक्का पार्लरवर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात येतात. आस्थापनेच्या ठिकाणी आगीसारख्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हॉटेल मालक / चालक यांच्या बैठका घेऊन दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शन करून सूचना देण्यात येतात.

पुणे शहरातील बंडगार्डन, डेक्कन, कोरेगांव पार्क, हडपसर, मुंढवा, कोंढवा या परिसरात तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये हॉटेल्स, पब किंवा ढाबे या ठिकाणी अनधिकृतपणे ग्राहक तंबाखूजन्य पदार्थ वा हुक्काजन्य पदार्थांचे सेवन करताना आढळल्यास सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ (सुधारित) अधिनियम, २०१८ चे कलम ४, २१ नुसार हुक्का पार्लर चालक,

सेवन करणारे, हुक्का पुरविणारे, बनविणारे, विक्री करणारे यांचेविरूध्द गुन्हे दाखल करून, त्यांना गुन्ह्यात अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात येते. राज्यात काही भागांमध्ये सर्रास अंमली पदार्थ / तंबाखूजन्य पदार्थ / हुक्का पार्लरचा धंदा वा सेवन करीत असल्याचे आढळल्यास किंवा तसे धंदे चालत असल्यास संबंधित ठिकाणच्या पोलिस अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल आणि त्या भागामध्ये त्या पोलिस स्टेशनच्या अंतर्गत जर अशा पध्दतीने गैर व अवैध व्यवसाय चालत असेल तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशा सूचना राज्यातील सर्व पोलिस घटक प्रमुखांना दिनांक १८.०३.२०२१ व दिनांक १५.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

कोटपा सुधारित अधिनियम, २०१८ मधील कलम ४ क नुसार "कोणतीही व्यक्ती स्वत:हून किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या वतीने, खाद्यगृहाच्या जागेसह कोणत्याही जागी हुक्का बार सुरु करणार नाही किंवा चालवणार नाही" तसेच, २१-क नुसार कलम ४ क च्या तरतुदीचे उल्लंघन करणाऱ्यास एक ते तीन वर्षे पर्यंत कारावासाची आणि रुपये पन्नास हजार ते एक लाख रुपयांपर्यंत एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेची तसेच, कलम २७- क नुसार कलम ४-क खालील अपराध दखलपात्र असतील, अशा प्रावधानांची तरतूद करण्यात आली आहे. सदर कायद्यानुसार कारवाई करण्यासाठी सहायक पोलिस निरीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यक्षेत्राकरिता प्राधिकृत करण्यात आले आहे.

सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ व सुधारणा अधिनियम, २०१८ मधील तरतुदीनुसार पुणे शहर व पिपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयांतर्गत सन २०२२ व जून-२०२३ अखेरपर्यंत अवैधरित्या सुरु असलेल्या हुक्का पार्लरवर करण्यात आलेल्या कारवाईचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

**पोलीस आयुक्त, पुणे शहर आयुक्तालय**

| सन | दाखल गुन्हे | आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२२ | ३७ | ९८ | ६,८०,८९०/- |
| जानेवारी २०२३ ते जून २०२३ | २८ | ५३ | ८,३४,०००/- |

**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आयुक्तालय**

| सन | दाखल गुन्हे | आरोपी | जप्त मुद्देमाल |
|---|---|---|---|
| २०२२ | १५ | ४० | ५,०७,०१५/- |
| जानेवारी २०२३ ते जून २०२३ | ०३ | ०६ | ५४,२३६/- |

पुण्यात हुक्क्यासाठीचे ५२ प्रकारचे फ्लेवर मिळत असल्याची व तरुणांकडून या फ्लेवर्सना अधिक मागणी असल्याची बाब निर्दशनास आलेली नाही. नमूद गुन्ह्यांमध्ये पुण्यात हुक्यासाठीचे १० प्रकारचे फ्लेवर्स मिळून आल्याने ते जप्त करुन आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे. हॉटेलच्या बंद खोल्यांमध्ये हुक्का ओढण्यास उपलब्ध करून दिल्याची बाब निर्दशनास आलेली नसून अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नाहीत. सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ मध्ये

सुधारणा करून सुधारित अधिनियम २०१८ अन्वये संपूर्ण राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घातली असल्याने सदर तरतुदीचे उल्लंघन होत असल्यास वा तसे निष्पन्न झाल्यास हुक्का चालक/मालक व संबंधित ग्राहकांवर योग्य कलमांद्वारे पोलिस यंत्रणेमार्फत वेळीच कारवाई करण्यात येते आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यादृष्टीने पोलिस प्रशासनाकडून जनजागृती करणे, यापदार्थांच्या व्यसनाचे शरीरावर होणारे दुष्परिणाम याबद्दल मार्गदर्शन करणे, शाळा कॉलेज परिसरात, सोसायट्या अशा ठिकाणी प्रबोधन करणे, पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांची बैठक आयोजित करून हुक्का सेवनाच्या दुष्परिणामांबाबत माहिती देऊन त्यापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सूचना दिल्या जातात व त्याद्वारे व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्तींचे समुपदेशन, जनजागृती केली जाते. तंबाखूजन्य व हुक्का यासारख्या व्यसनांना बळी न पडण्याचे आवाहन करून आवश्यक अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

-------------------

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**मा. श्री. रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"समाज माध्यमांवर विशिष्ट समाजाच्या लोकांनी टाकलेल्या आक्षेपार्ह संवादामुळे १३ मे २०२३ रोजी अकोला शहरात रात्रीचे वेळी दंगल उसळणे, या सर्व पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाचा गाफीलपणा व अकार्यक्षमता असल्याची सामान्य नागरिकांमध्ये जनभावना निर्माण होणे, सदर दंगली दरम्यान शहरातील नागरीवस्तीवर समाज कंटकांकडून दगडफेक होऊन निरपराध लोक जखमी होणे, दंगल आटोक्यात आणण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून अश्रूधुराच्या कांड्या फोडणे तसेच हवेत गोळीबार करणे, गोळीबारामध्ये एकागरीब मजुरी करणाऱ्या व्यक्तीचा बळी जाणे, दंगली दरम्यान मोठ्या प्रमाणात वाहनांची तसेच घरांची जाळपोळ झाल्याने कोट्यावधी रुपयाचे नुकसान होणे दंगलीमुळे संचारबंदी लागू केल्याने जनजीवन विस्कळीत होणे, पोलीस प्रशासनाच्या गाफीलपणामुळेच अशा दंगली उद्भवून जनजीवन विस्कळीत होते, अशी सर्वसाधारणपणे निर्माण झालेली भावना, दहशतीचे वातावरण पोलीस यंत्रणे कडून कायदा व व्यवस्था मजबूत व्हावी अशी जनमाणसाकडून व व्ववक्त होत असलेली अपेक्षा तसेच दोषींवर कडक कार्यवाही व्हावी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

*****************************************************************

**मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

अकोला शहरात दि. १३/०५/२०२३ रोजी रात्री समीर अनिल सोनोने, वय २१ वर्षे याने XYZZZZ९९९८८ या बनावट इन्स्टाग्राम अकाउंट वरून फिर्यादी अरबाज नासीरखान याच्या इन्स्टाग्राम आयडीवर मुस्लिम धर्माविषयी अत्यंत अश्लिल भाषेत आक्षेपार्ह तसेच वादग्रस्त मॅसेज पोस्ट केले. त्याने हे सदरचे कृत्य बुध्दी परस्सर व दूष्ट उद्देशाने केले होते त्यामुळे सदर आरोपीविरूद्ध दि. १४/०५/२०२३ रोजी ००.१५ वा. पो.स्टे. रामदासपेठ अकोला येथे कलम २९५ अ व १५३ अ भादंवि अन्वये गु.र.क्र. १९२/२०२३ दाखल करण्यातआला. वादग्रस्त पोस्ट मुळे मुस्लीमांच्या धार्मिक भावना दुखावल्यामूळे अकोला शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था भंग झाली व अकोला शहरामध्ये जातीय दंगल उसळून आली. सदर दंगलीमध्ये समाज कंटकांनी रोडच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांची तोडफोड करून जाळपोळ केली तसेच शासकीय वाहनांची जाळपोळ करून दगडफेक करून नुकसान केले व दुकाने व घरे जाळण्याचा प्रयत्न केला तसेच दंगली दरम्यान समाज कंटकानी विलास महादेव गायकवाड, वय ४० वर्ष, रा. हरीहर पेठ यास लाठी, लोखंडी पाईप व दगडाने मारहाण करून जिवानिशी ठार केले. सदर दंगल आटोक्यात आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने सौम्य लाठी चार्ज करून जमाव पांगविण्याचा प्रयत्न केला परंतु जमावाने उग्र स्वरूप धारण केल्यामुळे पोलीसांनी गॅसगन मधुन १२ सेल फायर केले तसेच गॅस ग्रेनेडचे ०५ सेल फेकण्यात आले तरीही जमाव हा पांगत नसल्याने ०३ प्लास्टीक राउंड हवेत फायर करण्यात आले. पोलीसांकडून बळाचा वापर करतांना कोणताही इसम जखमी झाला नाही. मात्र या दरम्यान आपले कर्तव्य बजावताना ०७ पोलीस, ०१ होमगार्ड व ०८ अग्नी शामक जवान जखमी झाले. तसेच जमावाने केलेल्या जाळपोळीत रू. २५.३५ लाख रूपयांचे नुकसान झाले. दंगलीत

सहभागी दंगलखोरांची सीसीटीव्ही फुटेज व प्रत्यक्षदर्शी पुराव्यांच्या आधारे ओळख पटवून सर्व दोषीवर तात्काळ खालील प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले १) जुने शहर पो. स्टे. येथे कलम ३०२, १४३,१४७,१४८,१४९ भादंवि अन्वये गु.र.क्र. १५२/२०२३ दाखल. २) पो. स्टे. रामदास पेठ येथे कलम १४३, १४५, १२० (ब) १५३ अ, ५०५ (२), १८८ भादंवि सह १३५ मपोका अन्वये गु.र.क्र. १९४/२३ दाखल ३)जुने शहर पो. स्टे. येथे कलम ३०७, ३५३, ४३५, ४३६, ३३८, ४२७, १४३, १४७, १४८, १४९ भादंवि सह कलम ७ क्रिमिनल लॉ अमेन्डमेंट ॲक्ट व कलम ३,४ सार्वजनिक नुकसानीस प्रतिबंध कायदा अन्वये गु.र.क्र. १५०/२०२३ दाखल ४) जुने शहर पो. स्टे. येथे कलम १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ३३७, ४३६, ४२७, भादंवि सह कलम ४, २५ आर्म्स ॲक्ट कलम ७ क्रिमिनल लॉ अमेन्डमेंट ॲक्ट कलम ३,४ सार्वजनिक नुकसानीस प्रतिबंध कायदा अन्वये गु.र.क्र. १५१/२०२३ दाखल ५) जुने शहर पो. स्टे. येथे कलम १४३, १४७, १४८, १४९, ४३५, ४२७, भादंवि सह १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सह कलम ७ क्रिमिनल लॉ अमेन्डमेंट ॲक्ट अन्वये गु.र.क्र. १५३/२०२३ दाखल करण्यात आले.

तसेच सदर दंगलग्रस्त परिसरात शांतता रहावी म्हणुन दुस-याच दिवशी १४/०५/२०२३ च्या मध्य रात्री पासून रामदास पेठ, सिटी कोतवाली, व जुने शहर हद्दी मध्ये संचारबंदी लागू करण्यात आली. व त्यानंतर दिनांक २०/०५/२०२३ पर्यन्त संचारबंदी लागू करण्यात आली होती त्यापैकी दि. २०/०५/२०२३ रोजी डाबकी रोड हद्दीत संचार बंदी हटविण्यात आली व त्यानंतर पो.स्टे. जुने शहर हद्दीतील हरीहर पेठ, हमजा प्लॉट, भगतवाडी, गाडगे नगर भागात संचारबंदी कायम ठेवण्यात आली. त्यानंतर अकोला शहरातील जनजीवन पूर्व पदावर आणणे तसेच जीवनावश्यक वस्तू व सेवा सुरळीत करणे आवश्यक असल्याने दिनांक २१/०५/२०२३ रोजी रात्री ०८.०० वाजता पासून सकाळी ०८.०० पर्यंत लावण्यात आलेले आदेश रद्द करण्यात आले व दिनांक २५/०५/२०२३ रोजी जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशाने अकोला शहरातील जुने शहर भागातील संचारबंदी हटविण्यात आली. संचारबंदी दरम्यान सिसिटीव्ही फुटेजवरून दंगलखोर जमावात सामील असलेल्या ९३ आरोपींना कायदेशीररीत्या अटक करण्यात आली त्यानंतर उर्वरीत ५१ आरोपींना अटक करण्यात आली. असे एकूण १४४ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी ९० आरोपीविरुद्ध प्रतिबंधक कार्यवाही करून त्यांचेकडुन शांतता राखणेबाबत बाँड (शपथपत्र) घेण्यात आले. नमुद गुन्ह्यांमधील आरोपींवर कायदेशीररीत्या कार्यवाही करण्यात आली व पो.स्टे. रामदास पेठ गु.र.क्र. १९२/२०२३ कलम २९५ अ व १५३ अ भादंवि गुन्ह्यांमध्ये आरोपींविरुद्ध सबळ पुरावा उपलब्ध झाल्याने मा. न्यायालयात RCC No. ७८०/२३ दि.१३/०७/२०२३ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. तसेच पो.स्टे. रामदास पेठ येथे गु.र.क्र. १९४/२३ कलम १४३, १४५, १२० (ब) १५३ अ. ५०५ (२), १८८ भादंवि १३५ मपोका अन्वये आरोपींविरुद्ध सबळ पुरावे उपलब्ध झाल्याने मा. न्यायालयात RCC No. ७९२/२३ दि १८/०७/२०२३ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

दंगलीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, अकोला यांच्या कार्यालयाकडून केलेल्या उपाययोजनांतर्गत पुढील प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. १) शहर उपविभाग विभाजन करणे. २)अकोला शहरात CCTV कॅमेरे लावणे, ३) अतिरिक्त मनुष्यबळ पोलीस दलास मिळणे,४) SRPF ची तुकडी फिक्स पॉईंट म्हणून नेमणे.

-----****------

लक्षवेधी सूचना क्र. १६९४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. दिलीप लांडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६९४ पुढीलप्रमाणे आहे –**

" दि. १६ एप्रिल २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, पवई येथे भारतरत्न, भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव, कायदेतज्ञ, अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी गेलेल्या भिमसेनिक दलित कार्यकर्त्यांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केलेले असणे, तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी जागा मुंबई महानगरपालिकेतर्फे मिळावी, सदरहू गुन्हे मागे घेण्यात यावे म्हणून यापूर्वी सातत्याने लोकप्रतिनिधीनी मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री आदीकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केलेली असणे, अशाप्रकारचे राजकीय आंदोलन केल्यानंतर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्याबाबत विनंती केली असता, यापूर्वी अनेकांवरील गुन्हे राज्य सरकारकडून मागे घेण्यात आलेले आहे, त्याचं धर्तीवर सदर गुन्हे विनाविलंब मागे घेण्याबाबत, शासनाकडून योग्य ती कारवाई होणे अपेक्षित असतानाही शासनाकडून या गुन्ह्याप्रकरणी आजमितीस कोणतीही कारवाई झालेली नसल्यामुळे दलित समाजात नाराजीचे वातावरण निर्माण झालेले असणे, सबब शासनाने सदर प्रकरणासंदर्भात दाखल करण्यात आलेले गुन्हे विनाविलंब मागे घेण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने विनाविलंब करावयाची कार्यवाही, केलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया".

---

## मा.उप मुख्यमंत्री यांचे निवेदन

दिनांक १४/०४/२०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, पवई, मुंबई या ठिकाणी सुमारे ७०० ते ८०० लोकांनी बेकायदेशीर प्रवेश करून, कर्तव्यावरील सुरक्षा रक्षकांना दमदाटी करून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा जबरदस्तीने उभा केला. मा. सर्वोच्च न्यायालयाने याचिका क्र. एसएलपी क्र. ८५१९/२००६ मध्ये दिनांक १८/०१/२०१३ रोजी कोणत्याही सार्वजनिक वापर असलेल्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, पदपथावर कोणाचाही पुतळा उभारण्यासाठी तसेच कोणतीही वास्तु बांधकामासाठी/ उभारण्यासाठी राज्य सरकारने परवानगी देवू नये, असे आदेश दिले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, पवई, मुंबई या ठिकाणी पुर्णाकृती पुतळा जबरदस्तीने उभारल्याने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या सदर आदेशाचे उल्लंघन झाले. त्यामुळे बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या उद्यान विभागाच्या उद्यान विद्या सहाय्यक यांनी आरोपींविरूध्द फिर्याद दिली.

फिर्यादीनुसार बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील पवई पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्र. २१०/२०१६, भादंवि कलम १४३,१४५,४४७,५०६ अन्वये आरोपींविरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा प्राप्त झाल्याने मा. महानगर दंडाधिकारी, ६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे. त्याचा कोर्ट केस क्र. २२९६ / पीएस/२०२०, दिनांक १९/०७/२०२० असा असून सदरचा गुन्हा सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

मा. लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री व मा. उप मुख्यमंत्री यांना दिलेल्या लेखी निवेदनाच्या अनुषंगाने सदर घटनेतील गुन्हे मागे घेण्याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना उचित कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.

याअनुषंगाने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अध्यक्षतेखालील राजकीय व सामाजिक आंदोलन/खटले निर्गती समितीने सदर गुन्ह्यातील कार्यकर्त्यांवर दाखल खटला मागे घेण्याबाबतची शिफारस नाकारली आहे.

---

रोटा/एच-१२५२[७५०-९-२०२३].

लक्षवेधी सूचना क्र. १६३५

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

ॲड.श्री. आकाश फुंडकर, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६३५.

"ज्याअर्थी, निम्न ज्ञानगंगा- २ बृहत लघु पाटबंधारे योजना ता. खामगांव जि. बुलढाणा या प्रकल्पास मा.ना.श्री देवेंद्रजी फडणवीस हे मुख्यमंत्री असतांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन १६७ कोटी रु. मान्यता देऊन सदर धरणाचे काम पुर्ण करण्यात आले असणे, परंतु त्यानंतर आजुबाजुच्या गावातील तसेच रोहणा गावातील काही शेतकऱ्यांनी सदर भिंती मधून पाणी झीरपत असल्याचे लक्षात आले असणे व या पाण्यामुळे त्यांच्या शेतातील पिकाचे दरवर्षी नुकसान होत असणे, याबाबत त्यांनी वारंवार कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांच्याकडे व जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार देखील केल्या असणे, सदरची भिंत तयार करीत असतांना धरणाच्या भितीसाठी पाया खोदण्याची आवश्यकता असणे, परंतु अशा प्रकारे पाया खोदलेला नसल्याची माहिती पुढे आली असणे, त्यामुळे धरण १०० टक्के भरल्यावर या धरणातील पाणी भिंती खालून पाझरुन शेतीचे मोठे नुकसान होत असणे, अशा निकृष्ठ दर्जाच्या कामामुळे उपरोक्त धरणाची भिंत फुटून जिवीत हानी होण्याची शक्यता असणे, सर्व बाबी लक्षात घेता व शेतकऱ्यांनी वारंवार केलेल्या तक्रारीची कुठलीही दखल न घेतल्यामुळे आणि शेतकऱ्यांच्या तक्रारीत सत्यता जाणवत असल्यामुळे शेतकऱ्यामध्ये शासनाबाबत रोष निर्माण झाला असणे, त्यामुळे या संपुर्ण कामाची पाटबंधारे विभागातील गुण नियंत्रण मंडळाकडून उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाची भूमिका, शासनाची प्रतिक्रया व करावयाची कार्यवाही".

---

मा.उप मुख्यमंत्री ( जलसंपदा) यांचे निवेदन :-

---

निम्न ज्ञानगंगा-II बृहत ल.पा.योजना ता. खामगाव,जि. बुलढाणा हा प्रकल्प निमकवळा गावाजवळ असून सदर प्रकल्पाची मुळ प्रशासकीय मान्यता दि. १२/०२/२००९ रोजी रू. ३०४५.३८ लक्ष रक्कमेची असून सुधारीत प्रशासकीय मान्यता दि. २९/०३/२०१६ रोजी रू. १५,९५५.३८ लक्ष इतक्या रक्कमेस प्राप्त आहे. सदर प्रकल्पाच्या कामाकरिता दि. १७ /०८/२००९ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. धरणाच्या भिंतीच्या पायाचे खोदकाम करतेवेळी पायाची संकल्पीत पायापातळी जलस्तंभाच्या १२५ टक्के उंचीपर्यंत घेऊन पायाभरणी करण्यात आलेली आहे. सदर कामाची गुणनियंत्रण विभागाकडून वेळोवेळी पाहणी करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पाचे काम सन २०१९ मध्ये पुर्ण करून प्रथम पाणीसाठा निर्माण करण्यात आलेला होता. धरणाखालील जमिनीच्या पाणी पातळीत वाढ होऊन पिकांचे नुकसानीकरिता कास्तकांराकडून विनंती अर्ज दि.१२/१०/२०२१ ला प्राप्त झालेले आहेत. त्यानंतर पिक नुकसानीचे पंचनामे करून सदर नुकसानीचे कृषी विभागामार्फत मुल्यांकन करण्यात आलेले आहे. सदर मुल्यांकनास सक्षम स्तरावर मंजुरी करिता सादर करण्यात आलेले आहेत.

धरण साखळी क्र. २८२० मी. ते ३०९० मी. व साखळी क्र. १८९० मी. या भागातील धरणाखाली जवळपास १० हेक्टर क्षेत्रामध्ये भूजल पाणी पातळी वाढत असल्याचे निर्दशनास आले आहे. सदर

रोटा H/1268 (750-9-23)  
ED.मा.प.

धरणाखाली दलदल झालेल्या क्षेत्राची दखल घेवून क्षेत्राची पाहणी अधिक्षक अभियंता, बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, बुलढाणा यांच्याकडून दि.१३/१२/२०२१ रोजी करण्यात आली होती. तसेच संकल्प चित्र संघटना, नाशिक यांचे अधिपत्याखालील धरण सुरक्षा विभाग कार्यालयाचे कार्यकारी अभियंता यांनी दि.०२/१२/२०२१ रोजी प्रकल्पस्थळी भेट देऊन सदर गटातील जमिनीची व विहीरींची पाणी पातळी यांची पाहणी केली होती. त्यांचे निरीक्षण टिप्पणीत त्यांनी पुढील कालावधीमध्ये धरण पाणी पातळी व विहीर पाणी पातळी यांची नोंद ठेवण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार दिनांक ०३/१२/२०२१ ते ०२/११/२०२२ या कालावधीत या नोंदी घेण्यात आल्या आहेत. सदर नोंदीवरून असे दिसून येते, की धरणातील पाणी पातळी कमी होत असताना विहीरींची पाणी पातळीसुध्दा काही प्रमाणात कमी होत जाते व धरणाची पाणी पातळी वाढत असताना विहरींची पाणी पातळीसुध्दा वाढत जाते.

त्यामुळे बाधित क्षेत्रातील जमीनीतील पाणी पातळी कमी करण्याकरिता तीन पर्याय सुचविण्यात आलेले आहेत.

पर्याय क्र. १) पाणी झिरपत असलेल्या भागात धरण भिंतीच्या वरील बाजुस संकल्पानापेक्षा जास्त खोल रोधीचर (cut off trench) करणे.

पर्याय क्र. २) धरणाच्या खालील बाजूस असलेल्या विहीरींची पाणी पातळी कमी करण्याकरिता उप पृष्ठभाग उपचार (Sub-Surface treatment) चा वापर करणे.

पर्याय क्र. ३) दलदल झालेली जमीन खरेदी करणे.

वरील तीनही पर्यायांवर तांत्रिक अभ्यास करून त्यापैकी व्यवहार्य पर्यायास सक्षम स्तरावरून मान्यता घेऊन कामे करण्याचे नियोजित आहे. सदर धरण सन २०१९ ते २०२२ मध्ये पुर्ण संचय पातळीपर्यंत जलसाठा निर्माण झालेला होता. तथापि आज रोजी या पाझरामुळे धरणास कोणताही धोका संभवत नाही.

*****************

लक्षवेधी सूचना क्र.१२६७

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे-माजिवडा येथे माजिवावडा को. ऑप. टेनेन्ट फार्मिंग सोसायटी लि. यांना शासनाने सन १९५५ साली खरेदी खताने आकारीपड जमिन दिली होती, सदर शेतकरी समूहाचे सातबा-यावरती नाव सन १९५७ ते २००० पर्यंत कायम होते परंतु तत्कालिन उपविभागीय अधिकारी यांनी तेथील विकासकाच्या फायद्यासाठी नोंदणीकृत जमिन गहाण खताने सोसायटीच्या नावे झालेले शेतकरी समूहाचे नाव सरकारी अभिलेखाची छेडछाड करुन व बनावट कागदपत्रान्वये शेतक-यांची नावे कमी करण्यात आल्याबाबत दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी रोहिदास पाटील यांनी ठाणे महानगरपालिका जिल्हाधिकारी ठाणे व पोलिस आयुक्त ठाणे यांना रितसर तक्रार केली होती, शेतक-यांच्या जमिन मिळकत प्रकरणी अनियमितता बनावट कागदपत्रे सरकारी अभिलेखात झालेली छेडछाड आदि पाहता संबंधित विकासकाला गैरलाभ पोहोचावा म्हणून तत्कालिन महसूल अधिका-यांनी केलेला खटाटोप, याबाबत कायदा व सुव्यवस्था निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी बिनधास्तीपणे हडपले जात असल्यामुळे शासनाने सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

सदर लक्षवेधीमधील विषयांकित मिळकती मौजे बाळकूम आणि मौजे माजिवडे या महसूली गावातील आहेत.

**अ) मौजे 'बाळकूम ' येथील मिळकतीचा तपशील.**

मौजे बाळकुम, ता. जि. ठाणे येथील स.नं. २७८, २७९अ, २७९ ब, २८०, २८१, २९५, २९६अ, २९६ब, २९७अ, २९७ब, २९८, २९८अ, २९९, ३००, ३०१, ३०२ व ३०३ या मिळकती खार जमीन असल्याने सन १९२८ पूर्वी साखरलाल जमनादास यांना लिजने देण्यात आलेली होती. परंतू त्यांनी शर्तभंग केल्याने जिल्हा हुकुम, दिनांक २५/०७/२८ अन्वये सदर मिळकती खालसा आकारी पडीत म्हणून नोंद करण्यात आली.

मोजे बाळकुम, ता. जि. ठाणे येथील स.नं. २७८, २९६ब, २९७अ ,२९९ब, २७९अ, २८०, २८१, २९५, २९८, ३००, ३०१, ३०२, ३०३, २९६अ, २९७ब व २९९अ या जमिनी चेअरमन माजीवडे को. ऑ. टेनंट फार्मींग सोसायटी लि. बाळकूम यांचे नावे जिल्हे हुकुम दि. २६/०७/५७ अन्वये दाखल करण्यात आल्या आहेत

माजिवडे को. ऑ. टेनंट फार्मींग सो.लि. यांना ज्या प्रयोजनासाठी जमीन प्रदान करणेत आली त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर केलेला नसल्यामुळे उपविभागीय अधिकारी ठाणे, विभाग ठाणे यांनी सदर जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे दाखल करणेबाबत दिनांक ०३/१२/१९९९ अन्वये आदेश पारित केले आहेत. त्याबाबत गाव नमुना नंबर ७/१२ चे भोगवटादार सदरी "महाराष्ट्र शासन" अशी नोंद घेण्यात आलेली आहे.

उक्त आदेशाविरुद्ध अपर जिल्हाधिकारी, ठाणे तसेच अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचे कोर्टात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम २५७ अन्वये पुनरिक्षण अर्ज केला असता अपर जिल्हाधिकारी, ठाणे व मा. अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांनी उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे दिनांक ०३/१२/१९९९ रोजीचे आदेश कायम केले आहेत. ते आजरोजी देखील कायम असून गाव नमुना नंबर ७/१२ सदरी "महाराष्ट्र शासन" नोंद कायम आहे.

**ब)मौजे माजिवडे येथील मिळकतीचा तपशील.**

मौजे माजिवडे येथील स.नं. १२/१, १३/१, १५/१/३, १६/१, १७/१, १८/१, १९/१, २०/१, २२/१, ३५/१, ३६/१, ३७/१/२, ३८/२, ४१/१, ४२/५,४३/१/३, ४४/१, ४५/१/४, ४६/१, ४७/२, ४८/२, ४९/१, ५०/१, ५१/१,

५४/१, ५५/१, ८४/१, ८९/१, ३४५/१, ३२९/१, व ३५६/१ या आर.एस.वर्मा यांच्या नावे असलेल्या मिळकती सन १९५८ मध्ये सेक्शन ६५ नी खालसा करुन माजीवडे टेनंट फार्मींग सोसायटी यांस १० वर्षाचे कराराने लागवडीस देऊन सोसायटीचे नाव कुळ म्हणून इतर हक्कात दाखल केले व कब्जेदार सदरी सरकार नाव दाखल करुन इतर हक्कात आर. एस. वर्मा यांचे नाव दाखल केले.

त्यानंतर ॲडिशनल कलेक्टर यांचे दिनांक २१/०९/५९ रोजीच्या आदेशानुसार सरकार म्हणून दाखल केलेले नाव क्रमी करुन, आर. एस. वर्मा यांचे नाव कब्जेदार सदरी फेरफार क्रं. १२४०, दिनांक २५/१०/१९६३ दाखल केले आहे. तसेच फेरफार क्रं. १३९९, दिनांक ०५/१२/१९६६ अन्वये माजीवडे ग्राम विकास फार्मींग सोसायटी यांचे इतर हक्कातील कुळ म्हणून असलेली नोंद कमी केली. त्यानुसार सोसायटीचे नाव सदर मिळकतीस सन १९५८ ते १९६६ या कालावधीपुरते दिसून येते.

आर.एस. वर्मा यांचे वारस श्री. अशोक उदयसिंग वर्मा व इतर यांचेपासून विकासक मे. कॅप्स्टोन कन्सट्रक्शन प्रा. लि. यांनी दुय्यम निबंधक ठाणे-५ यांचेकडील दि. ३१/०३/२००६ रोजीचा विकास करारनामानुसार विकासक मे. कॅप्स्टोन कन्सट्रक्शन प्रा. लि. यांचे नावाची नोंद गाव *नमुना* नंबर ७/१२ चे इतर हक्कात ठेवण्यात आलेली आहे. (फे.क्रं. २४८८, दिनांक ०५/०८/२००६)

वरील मुद्दे पाहता, मौजे माजिवडा व बाळकूम येथील माजिवडा को. ऑ. टेनन्ट फार्मींग सोसायटी यांच्या नावे असलेल्या मिळकतीबाबत सरकारी अभिलेखाची छेडछाड केलेली प्रथमदर्शनी दिसून येत नाही, तथापि श्री. रोहिदास पाटील यांनी दिनांक १७/०७/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेल्या अर्जातील प्रत्येक मुद्यांबाबत सर्वे नंबर निहाय अधिकार अभिलेखातील नोंदी तपासून अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी ठाणे यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**मा. श्री. रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"अकोला जिल्ह्यात मौजे आलेगाव ता पातुर येथे १९ वर्षीय हिंदू तरुणाचे बळजबरीने धर्मांतरण करण्याचा धक्कादायक प्रकार घडणे, शेजारीच राहणाऱ्या विशिष्ट समाजाचे ३-४ लोकांनी सदर तरुणास नोकरी व पैसे देण्याचे आमिष तसेच दबाव तंत्र वापरून धर्मांतरण करून घेणे, धर्मांतरित केलेल्या युवकाचे आईने दिनांक १० जुलै, २०२३ रोजी पोलीस स्टेशन चान्नी ता. पातुर येथे फिर्याद दाखल करणे, फिर्याद दाखल करून गुन्हा नोंदणीकरीता पोलीस स्टेशनकडून वेळ काढूपणा करून चाल ढकल करणे, दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी एफ.आय.आर नोंदणे, धर्मांतरण करण्यात येणाऱ्या टोळी कडून जादू टोणा व संमोहन विद्याद्वारे आकर्षित करून जबरदस्तीने धर्म परिवर्तन करण्यास बाध्य करणे, याच गावातील ३ ते ४ लोकांचे अशा प्रकारे धर्मांतरण केल्या गेल्याचा संशय व्यक्त होणे, धर्मांतरित केलेल्या तरुणाला हैदराबाद येथे नेल्याची बतावणी करणे, तथापि प्रत्यक्षात सदर तरुण उंड्री जिल्हा बुलढाणा येथील मदरशां मध्ये आढळून येणे, राज्यात असे धर्मांतरणाचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचा संशय असणे, धर्मांतरित केलेल्या तरुणाचे आईला धर्मांतरण करून घेण्यास बाध्य करणाऱ्या विशिष्ट जातीच्या लोकांनी धर्मांतरणासाठी जातीवाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देणे, सदर पिडीत परिवार दहशती खाली वावरणे, परिवराला संरक्षण देण्याची आवश्यकता असणे, जिल्ह्यात समाज कंटकांवर पोलीस प्रशासनाचा धाक नसल्याने जिल्ह्यात कायदा व सुव्यस्था बिघडल्याचे दिसून येणे, धर्मांतरणासाठी दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

******************************************************************

**मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

अकोला जिल्ह्यात मौजे आलेगाव ता. पातुर येथे एका युवकास आरोपीने संमोहीत करुन त्यास मुस्लीम धर्म स्विकारण्यास उत्तेजीत करुन फिर्यादीस व तिच्या पतीस पैशाचे आमिष दाखवुन मुस्लीम धर्म स्वीकारण्यास सांगीतले व तसे न केल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या फिर्यादीवरुन पो. स्टे. चान्नी येथे गु.र.क्र. १९७/२३ कलम ५०६,३४ भादंवि सह कलम ३ (२) (va) अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयात चार आरोपीस अटक करण्यात आली असुन सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर प्रकरणी तपास केला असता, या गुन्हयात फिर्यादीच्या मुलाने मुस्लिम धर्म त्याच्या स्वेच्छेने स्वीकारला असल्याचे तसेच, न्यायालयात कलम १६४ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दिलेल्या जबानीत स्पष्ट झाले आहे. या प्रकरणामध्ये शेजारी राहणाऱ्या विशिष्ट समाजाच्या लोकांनी त्याला कोणतेही आमिष दाखविलेले नाही, असे तपासात व चौकशीत दिसून आले आहे. या तरुणाने स्वमर्जीने धर्मांतर केले आहे. याच गावातील तीन ते चार लोकांनी गेल्या १० ते १२ वर्षापूर्वी स्वेच्छेने धर्मातरण केल्याचे सांगितले जाते. परंतु त्याबाबत आतापर्यन्त कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. धर्मांतरीत केलेला तरुण हा बुलढाणा येथील मदरशात स्वतःहून गेला होता. आता घटना घडलेल्या स्थळी सतत गस्त सुरु असून पोलीस अधिकारी या परिवाराच्या संपर्कात आहेत. सदर घटनेच्या अनुषंगाने फिर्यादीच्या परिवाराच्या स्थळी सतत पेट्रोलिंग सुरु आहे. सदर प्रकरणी फिर्यादीच्या गावामध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

-----****------

लक्षवेधी सूचना क्र.१४६०

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

सर्वश्री.संग्राम थोपटे, विजय वडेट्टीवार, संजय जगताप, ॲड.राहूल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४६० पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्हयात रिंग रोड होत असून पश्चिम भागातील भोर, मुळशी व हवेली येथे संपादीत जमीनीचे मुल्यांकन जाहीर होणे, परंतु या मुल्यांकनात बेकायदेशीरपणा आलेला असणे, मुल्यांकनाच्या अंतीम नोंदीमध्ये सरसकट जिराईती क्षेत्र दर्शविण्यात येणे, याशिवाय कायद्यानुसार २०१८, २०१९ व २०२० या वर्षातील खरेदी खतांमधील ५० टक्के उच्चतम खरेदी खते विचारात घेण्यात येणे, त्यामुळे बाधितांना अत्यंत कमी मोबदला मिळालेला असणे, याशिवाय बाधित क्षेत्रातील निवासी व व्यावसायिक बांधकमाचे योग्य मुल्यांकन न होणे, तसेच विहीरी, बोअरवेल इ. चाही योग्य मोबदला मिळालेला नसणे, त्यामुळे येथील बाधितांना योग्य मोबदला मिळावा यासठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील बाधितांमध्ये निर्माण झलेली असंतोषाचे वातावरण व निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही राज्य शसनाची प्रतिक्रिया."

---

## श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

पुणे चक्राकार मार्ग प्रकल्प (रिंग रोड) हा पुणे जिल्ह्यात १७७ कि.मी. लांबीचा प्रकल्प राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये भूसंपादन करण्यात येत आहे. सदर रिंगरोड मावळ, मुळशी, हवेली, भोर, पुरंदर व खेड ह्या तालुक्यातुन जात आहे. सदर प्रकल्पाचे पुणे (पश्चिम) रिंगरोड व पुणे (पूर्व) रिंगरोड असे दोन भाग करण्यात आलेले आहेत. पुणे (पश्चिम) रिंगरोडसाठी मावळ, मुळशी, हवेली व भोर या तालुक्यातील एकूण ३४ गावातील अंदाजे ५९८.१३ हे.आर खाजगी जमिनी संपादन करण्यात येत आहेत. तसेच पुणे (पूर्व) रिंगरोडसाठी मावळ, खेड, हवेली, पुरंदर व भोर या तालुक्यातील एकूण ४८ गावातील अंदाजे ८६९.६१ हे.आर खाजगी जमिनी संपादन करण्यात येत आहेत.

०२. जरी सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ अन्वये, भूसंपादन करण्यात येत असले तरी, भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम (महाराष्ट्र सुधारणा) २०१८, कलम १०५ क (२) नुसार भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचीत भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २६ ते ३० व अनुसूची -१ अन्वये जमिनीचा व निगडीत घटकांचा मोबदला निश्चित करणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्पाकरीता महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ (सुधारीत २०१८) चे कलम १५(२) अन्वये भूसंपादनाची प्राथमिक अधिसूचना दि.०४.०१.२०२१ रोजी व पुरवणी अधिसूचना दि.०४.०५.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रस्तुत भूसंपादन प्रकरणी प्राथमिक अधिसूचनेचा

दिनांक हा मुल्यांकन दिनांक म्हणून भूसंपादन मोबदला निश्चितीसाठी विचारात घेण्यात आला आहे. महसूल व वन विभाग, परिपत्रक दि.२४.०१.२०२३ अन्वये प्राथमिक अधिसूचनेच्या लगत पूर्वीचे एक वर्ष वगळून त्यालगतच्या तीन वर्षातील खरेदी-विक्री व्यवहार विचारात घेण्यात आले आहेत. त्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम २६ अन्वये प्राथमिक मूळ अधिसूचनेसाठी दि.०४.०१.२०१७ ते ०३.०१.२०२० व पुरवणी अधिसूचनेसाठी दि.०४.०५.२०१८ ते ०३.०५.२०२१ या तीन वर्षाच्या कालावधीतील संपादन क्षेत्राशी तुलनायोग्य असलेल्या खरेदी-विक्री व्यवहारांची प्रती हेक्टरी दरानुसार उतरत्या क्रमाने मांडणी केली. त्यापैकी उच्चतम प्रती हेक्टर दर असलेल्या निम्म्या (५० टक्के) व्यवहारांची सरासरी काढून येणाऱ्या दराची तुलना मुल्यांकन दिनांकास लागू असलेल्या वर्षाच्या शिघ्रसिध्दगणकातील सदर संपादित होणाऱ्या जमीन गटासाठी नमूद जमीन दराशी तुलना करून, त्यापैकी जास्त असलेला प्रती हेक्टरी जिरायत जमीन दर मुल्यांकन तज्ञ म्हणून सहाय्यक संचालक, नगर रचना तथा मुल्यनिर्धारण विभागाकडील अभिप्राय विचारात घेऊन भूसंपादन मोबदल्यासाठी अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

०३. तसेच, प्रकल्पाच्या आखणीत बाधीत होणाऱ्या जमिनीशी निगडीत बाबी जसे, फळझाडांचे मुल्यांकन कृषी विभागाकडून, वनझाडांचे मुल्यांकन वन विभागाकडून, बांधकामाचे मुल्यांकन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तसेच विहीर, बोअरवेल मुल्यांकन जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा, जलसंधारण विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या विभागातील सदर विषयातील तज्ञ अधिकारी यांचेकडून मुल्यांकने करून घेण्यात आली आहेत.

०४. उपरोक्त प्रमाणे जमिनीचे व निगडीत घटकांचे मुल्यांकन विचारात घेऊन, सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय दि.२९ मे, २०१८ अन्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील व सदस्य म्हणून मुल्यांकनाशी संबंधित विविध विभागांचे प्रतिनिधी असलेल्या "जिल्हास्तरीय मोबदला निश्चितीकरण समिती" ने दि. ०७.०६.२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये पुणे (पश्चिम) रिंगरोड मधील ३४ पैकी ३१ गावातील ६९७.३१ हे.आर जमिनींचे भूसंपादन अधिनियम २०१३, कलम २६ ते ३० व अनुसूची-१ अन्वये परिगणित होणारा मोबदला तसेच भूसंपादनास संमती देणाऱ्या भूधारकांसाठी एकूण मोबदल्यावर २५ टक्के वाढीव मोबदला मंजुर केला आहे. त्यानुसार भूधारकांना संमतीचा विकल्प देण्यासाठी जाहीर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द करून वैयक्तिक नोटीसा भूधारकांना देण्यात आल्या आहेत. जे भूधारक नोटीसीनुसार संमती देणार नाहीत, त्या प्रकरणी २५ टक्के वाढीव मोबदला वजा करून भूसंपादनाच्या अंतिम निवाड्यानुसार नुकसानभरपाई मोबदला अदा करण्यात येईल.

०५. सदर भूसंपादन प्रक्रियेमध्ये अधिनियम, नियम आणि शासन धोरण यामधील तरतूदीनुसार, भूधारकांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वेळोवेळी वाजवी संधी देण्यात आली आहे. जमिनीचे प्रकार, जमिनीचे दर व मोबदला निश्चिती करण्यात आलेली आहे. अशा रितीने मूल्यांकन दिनांकास लागू असणाऱ्या शिघ्रसिध्दगणकात सदर संपादित होणाऱ्या क्षेत्रास नमूद असलेल्या जमीन दरापेक्षा समतुल्य खरेदी-विक्री व्यवहारानुसार आलेला अधिकचा असलेला दर अनुज्ञेय करण्यात आलेला आहे.

******************

म।१०१ - १८

लक्षवेधी सूचना क्र.१४६४

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**मा. श्री. मोहनराव हंबर्डे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे महानगरपालिका हद्दीतील मौजे-माजिवाडा गाव येथे माजिवाडा को. ऑप. टेनेन्ट फॉमींग सोसायटी लिमिटेड यांना शासनाने सन १९५५ साली खरेदीखताने आकारीपड जमिन दिली होती. सदर शेतकरी समुहाचे सातबा-यावरती नाव सन १९५७ ते २००० पर्यंत कायम होते, परंतु तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी तेथील विकासकाच्या फायद्यासाठी नोंदणीकृत जमिन गहाण खताने सोसायटीच्या नावे झालेले शेतकरी समुहाचे नाव सरकारी अभिलेखाची छेडछाड करुन व बनावट कागदपत्रान्वये शेतक-यांची नावे कमी करण्यात आलेबाबत दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी रोहिदास पाटील यांनी ठाणे महानगरपालिका जिल्हाधिकारी ठाणे व पोलिस आयुक्त ठाणे यांना रीतसर तक्रार केली होती. शेतक-यांच्या जमिन मिळकत प्रकरणी अनियमितता बनावट कागदपत्रे सरकारी अभिलेखात झालेली छेडछाड आदि पाहता संबंधित विकासकाला गैरलाभ पोहोचावा म्हणुन तत्कालिन महसूल अधिका-यांनी केलेला खटाटोप, याबाबत कायदा व सुव्यवस्था निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी बिनधास्तपणे हडपले जात असल्यामुळे शासनाने सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

सदर लक्षवेधीमधील विषयांकित मिळकती मौजे बाळकूम आणि मौजे माजिवडे या महसूली गावातील आहेत.

**अ) मौजे 'बाळकूम ' येथील मिळकतीचा तपशील.**

मौजे बाळकुम, ता. जि. ठाणे येथील स.नं. २७८, २७९अ, २७९ ब, २८०, २८१, २९५, २९६अ, २९६ब, २९७अ, २९७ब, २९८, २९८अ, २९९, ३००, ३०१, ३०२ व ३०३ या मिळकती खार जमीन असल्याने सन १९२८ पूर्वी साखरलाल जमनादास यांना लिजने देण्यात आलेली होती. परंतू त्यांनी शर्तभंग केल्याने जिल्हा हुकुम, दिनांक २५/०७/२८ अन्वये सदर मिळकती खालसा आकारी पडीत म्हणून नोंद करण्यात आली.

मोजे बाळकुम, ता. जि. ठाणे येथील स.नं. २७८, २९६ब, २९७अ ,२९९ब, २७९अ, २८०, २८१, २९५, २९८, ३००, ३०१, ३०२, ३०३, २९६अ, २९७ब व २९९अ या जमिनी चेअरमन माजीवडे को. ऑ. टेनंट फार्मींग सोसायटी लि. बाळकूम यांचे नावे जिल्हे हुकुम दि. २६/०७/५७ अन्वये दाखल करण्यात आल्या आहेत

माजिवडे को. ऑ. टेनंट फार्मींग सो.लि. यांना ज्या प्रयोजनासाठी जमीन प्रदान करणेत आली त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर केलेला नसल्यामुळे उपविभागीय अधिकारी ठाणे, विभाग ठाणे यांनी सदर जमीन महाराष्ट्र शासनाचे नावे दाखल करणेबाबत दिनांक ०३/१२/१९९९ अन्वये आदेश पारित केले आहेत. त्याबाबत गाव नमुना नंबर ७/१२ चे भोगवटादार सदरी "महाराष्ट्र शासन" अशी नोंद घेण्यात आलेली आहे.

उक्त आदेशाविरुद्ध अपर जिल्हाधिकारी, ठाणे तसेच अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांचे कोर्टात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम २५७ अन्वये पुनरिक्षण अर्ज केला असता अपर जिल्हाधिकारी, ठाणे व मा. अपर आयुक्त, कोंकण विभाग, मुंबई यांनी उपविभागीय अधिकारी ठाणे यांचे दिनांक ०३/१२/१९९९ रोजीचे आदेश कायम केले आहेत. ते आजरोजी देखील कायम असून गाव नमुना नंबर ७/१२ सदरी "महाराष्ट्र शासन" नोंद कायम आहे.

**ब)मौजे माजिवडे येथील मिळकतीचा तपशील.**

**मौजे माजिवडे येथील** स.नं. १२/१, १३/१, १५/१/३, १६/१, १७/१, १८/१, १९/१, २०/१, २२/१, ३५/१, ३६/१, ३७/१/२, ३८/२, ४१/१, ४२/५,४३/१/३, ४४/१, ४५/१/४, ४६/१, ४७/२, ४८/२, ४९/१, ५०/१, ५१/१, ५४/१, ५५/१, ८४/१, ८९/१, ३४५/१, ३२९/१, व ३५६/१ या आर.एस.वर्मा यांच्या नावे असलेल्या **मिळकती सन** १९५८ मध्ये सेक्शन ६५ नी खालसा करुन माजीवडे टेनंट फार्मींग सोसायटी यांस १० वर्षाचे कराराने लागवडीस देऊन सोसायटीचे नाव कुळ म्हणून इतर हक्कात दाखल केले व कब्जेदार सदरी सरकार नाव दाखल करुन इतर हक्कात आर. एस. वर्मा यांचे नाव दाखल केले.

त्यानंतर ॲडिशनल कलेक्टर यांचे दिनांक २१/०९/५९ रोजीच्या आदेशानुसार सरकार म्हणून दाखल केलेले नाव कमी करुन, आर. एस. वर्मा यांचे नाव कब्जेदार सदरी फेरफार क्रं. १२४०, **दिनांक** २५/१०/१९६३ **दाखल केले आहे.** तसेच फेरफार क्रं. १३९९, **दिनांक** ०५/१२/१९६६ अन्वये माजीवडे ग्राम विकास फार्मींग सोसायटी यांचे इतर हक्कातील कुळ म्हणून असलेली नोंद कमी केली. त्यानुसार सोसायटीचे **नाव** सदर **मिळकतीस सन** १९५८ ते १९६६ **या कालावधीपुरते** दिसून येते.

आर.एस. वर्मा यांचे वारस श्री. अशोक उदयसिंग वर्मा व इतर यांचेपासून विकासक मे. कॅप्स्टोन **कन्सट्रक्शन प्रा. लि.** यांनी दुय्यम निबंधक ठाणे-५ **यांचेकडील दि.** ३१/०३/२००६ **रोजीचा विकास करारनामानुसार** विकासक मे. कॅप्स्टोन कन्सट्रक्शन प्रा. लि. यांचे नावाची नोंद गाव ***नमुना*** नंबर ७/१२ चे इतर हक्कात ठेवण्यात आलेली आहे. (फे.क्रं. २४८८, **दिनांक** ०५/०८/२००६)

वरील मुद्दे पाहता, मौजे माजिवडा व बाळकूम येथील माजिवडा को. ऑ. टेनन्ट फार्मींग सोसायटी यांच्या नावे असलेल्या मिळकतीबाबत सरकारी अभिलेखाची छेडछाड केलेली प्रथमदर्शनी दिसून येत नाही, तथापी श्री. रोहिदास पाटील यांनी दिनांक १७/०७/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केलेल्या अर्जातील प्रत्येक मुद्यांबाबत सर्वे नंबर निहाय अधिकार अभिलेखातील नोंदी तपासून अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी ठाणे यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे.

*******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्री. किशोर पाटील, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"महाराष्ट्र धारण जमिनचे तुकडे करण्यास प्रतिबंधाबाबत व त्यांच्या एकत्रिकरणाबाबत अधिनियम, १९४७ मध्ये दुरूस्ती कररुन जमिनीचे किमान प्रमाणभूत क्षेत्रात जिरायत जमिनीचे २० आर व बागायत जमिनीसाठी १० आर करण्याचे शासनाने ठरविणे, त्यानुसार महसूल व वन विभागाने दिनांक ५ मे, २०२२ रोजी याबाबत अधिसूचना जारी करून प्रारूप प्रसिध्द केले व त्यावर ९० दिवसांच्या आत जनतेच्या हरकती मागविण्यात येणे, परंतु आजतागायत त्यावर एक वर्षाचा कालावधी उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्या न येणे, राज्यात सर्व शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रमाणभूत क्षेत्र जास्त असल्याकारणाने खरेदी व विक्री तसेच जमिनीचे वाटप याबाबत मोठया प्रमाणावर अडचणी निर्माण होणे, ही बाब लक्षात घेउन वेळोवेळी लोकप्रतिनिधी आणि शासनाकडे मागणी केल्यामुळे उपरोक्त प्रारूप दिनांक ५ मे, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात येणे, परंतु सदर प्रारूप प्रसिध्द होउन अंतिम अधिसूचना जारी होउन प्रमाणभूत क्षेत्रात बदल करण्यात आलेला नसणे, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

---

### श्री.राधाकृष्ण विखे पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनिय, १९४७ मधील कलम- ८ नुसार जमीनीचा तुकडा करुन हस्तांतरण किंवा विभाजनावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यामुळे, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे यांनी निर्गमित केलेल्या दिनांक १२.०७.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार दस्त नोंदणीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असलेल्या क्षेत्राच्या हस्तांतरणावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

सदर परिपत्रकानुसार दस्त नोंदणीवर निर्बंध आल्याने राज्यभरातून अनेक तक्रार अर्ज व निवेदने शासनास प्राप्त होत आहेत. तसेच प्रमाणभूत क्षेत्र घोषित झाल्यापासून बराच कालावधी उलटून गेला आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये शासनाच्या विविध कृषी विषयक योजना तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे , कृषी सिंचनाच्या सोयीमध्ये वाढ झाल्याने बऱ्याच प्रमाणात जिरायती/वरकस क्षेत्र लागवडीखाली आले आहे. विविध पिकांच्या अधिक उत्पन्न देणाऱ्या जाती, उत्पादन पध्दतीमध्ये सुधारणा इत्यादी कारणांमुळे शेतीची उत्पादकता सुध्दा वाढली आहे. त्यामुळे किफायतशीर शेतीसाठी लागणारे आकारमान कमी झाले आहे. त्याचबरोबर कुटुंबांच्या विस्तारामुळे जमीनीची विभागणी झाली असल्याने प्रमाणभूत क्षेत्रात सुधारणा करण्याची मागणी होत आहे.

महाराष्ट्र धारण जमीनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ मधील प्रकरण-२, कलम ४ (१), (२) व कलम ५ (१) , (२) व (३) मध्ये प्रमाणक्षेत्राचे निर्धारण व त्यात सुधारणा करणे बाबत खालीलप्रमाणे तरतुद आहे-

(१) कलम ४ (१ ) (राज्य) शासनास त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, व त्याने नेमलेल्या जिल्हा सल्लागार समितीशी (किंवा इतर कोणत्याही संस्थेशी) विचार विनीमय केल्यानंतर, कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील जमिनीच्या कोणत्याही वर्गासाठी स्वतंत्र भुखंड म्हणून ज्यात फायदेशीर लागवड करता येईल असे किमान क्षेत्र तात्पुरते ठरविता येईल.

(२) (राज्य) शासनाने , शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेव्दारे, आणि विहीत करण्यात येईल अशा रीतीने, पोट-कलम (१) अन्वये तात्पुरती ठरविलेली किमान क्षेत्रे जाहीर केली पाहिजेत व त्यासंबंधी आक्षेप मागविले पाहिजेत.

(३) कलम ५ (१) (राज्य) शासनाने, संबंधित गावात, कलम ४, पोट-कलम (२) अन्वये अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत जे कोणतेही आक्षेप आले असतील त्यांचा विचार केल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, अशा स्थानिक क्षेत्रातील जमीनीच्या प्रत्येक वर्गासाठी प्रमाणक्षेत्र ठरविले पाहीजे. तसेच, कलम ५ (२) शासनास, तसे करणे इष्ट वाटले तर , पोट-कलम (१) अन्वये ठरविलेल्या प्रमाण क्षेत्रात कोणत्याही वेळी सुधारणा करता येईल. अशी सुधारणा कलम ४ मध्ये व पोट-कलम मध्ये ठरवून दिलेल्या रीतीने केली पाहीजे.

(४) कलम ५(३) नूसार (राज्य) शासनाने, शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेद्वारे व विहित करण्यात येईल अशा रितीने, पोट-कलम (१) अन्वये ठरविलेल्या व पोट-कलम (२) अन्वये फेरफार केलेल्या कोणत्याही प्रमाणक्षेत्राची जाहीर नोटीस दिली पाहिजे.

राज्यात साधारणपणे सन १९४९ ते १९७० पर्यंत बहुतांश जिल्हयांमध्ये प्रमाणभूत क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. प्रमाणभूत क्षेत्रामध्ये जिरायती, बागायती, तरी व वरकस या जमीनींच्या प्रकारानुसार जिल्हानिहाय /तालुकानिहाय क्षेत्र प्रचलित आहे.

राज्यात किमान प्रमाणभूत क्षेत्रात सुधारणा करण्याबाबत दिनांक ५.५.२०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार जनतेकडून हरकती व आक्षेप मागविण्यात आले होते. यासंदर्भात प्राप्त आक्षेप व सूचना यांस अनुसरून राज्यातील ३२ जिल्हयांकरीता जिरायत क्षेत्राकरीता २० आर व बागायत क्षेत्राकरीता १० आर इतके प्रमाणभूत क्षेत्र अंतीम करण्यात आले असून त्याबाबतची अधिसूचना दिनांक ८.८.२०२३ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र.१७३९

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

श्री. गणपत गायकवाड, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१७३९ पुढीलप्रमाणे आहे:-

"ठाणे जिल्ह्यातील मौजे पिसवली ता. कल्याण येथील सुमारे ५-४७-४० एकर जमीन नियोजित विमानतळासाठी संपादित केलेले असल्याबाबत फ्लॅग ऑफीसर कमार्डिंग इन चिफ, वेस्टर्न नेव्हल कमांड यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८मार्च, १९८४ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना जमिन दिनांक २२ ऑगस्ट, १९८१ रोजी नौदलास हस्तांतरीत करण्यात आलेली असल्याचे कळविण्यात आलेले असणे, तथापि सदर हस्तांतरणाची नोंद ७/१२ सदरी फेरफार घालून झालेली नसणे, सदर जमिनींवर १९५४-५५ सालाच्या आसपास फेरफार नोंदी घेण्यात आलेल्या असणे, सदर फेरफारप्रमाणे खाजगी व्यक्तींची नावे कमी करण्यात येऊन विमानतळ, नेवाळी विमानतळ एरोड्रम, नेवाळी एरोड्रम, अशी नावे दाखल करण्यात आली असणे, सदर गावच्या ७/१२ सदरी भारतीय विमानपतन असे नाव मा. तहसिलदार, कल्याण यांनी त्यांचेकडील फेरफार क्र. ४८४, ३२९, ९६२, २९१, ११९ अन्वये दाखल केलेले असणे, परंतु अद्याप पूर्णपणे नोंदी झालेल्या नसणे, असे दस्तावेज पाहता स्पष्ट होणे, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांचेकडील दिनांक ११ जानेवारी, २०१० चे पत्र पहाता, जमिनी National Airport Authority Act, 1985 The Airports Authority प्रस्तुत भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (Airport Authority Of India) यांचेकडील पत्र क्र. File No. 18059/ C&AS/Nevali-ADC/LM Dated 11/01/2010 अन्वये प्रस्तुत: जमिनी National Airport Authority Act, 1985 व The Airports Authority Of India Act 1994 मधिल Chapter IV Clause 13[1] [a] अन्वये Airport Authority Of India यांच्या नावे करण्याबाबत विनंती करण्यात आलेली असणे, National Airport Authority Act, 1984 मधील कलम 13 (1) (a) प्रमाणे- "all properties and other assets including the equipment and navigational and ground aids relating to air traffic services and vested in the Central Government for the purposes of any Aerodrome, Civil enclave and Aero-nautical communication station and administered by the Director General of Civil Aviation immediately before such date shall vest in the Authority". अशी तरतूद करण्यात आलेली असणे, मा. तहसिलदार, कल्याण व मा. तहसिलदार, अंबरनाथ यांनी वरील पत्राच्या अनुषंगाने सदर जमिनीवर दाखल असलेले विमानतळ, नेवाळी विमानतळ, एरोड्रम, नेवाळी, एरोड्रम यांच्या ऐवजी Airport Authority Of India असे नाव दाखल केलेले असणे, परंतु १७/२/अ/१, ३३/१/अ, ३३/२, ३३/४/२, ३३/६/५, ३३/१४, ३३/९, ३३/१०, ३३/१५, ५५/४/३, ५५/४/अ ५५/५/१, ५५/६/२, ५५/६/३, ५५/६/ब/२, या सर्वे नंबरचे अवलोकन करता सदरहू मिळकती केंद्र सरकारच्या नावावर नसून त्रयस्थ इसमाच्या नावे असण्याचे दिसून येत

असणे, व त्या व्यक्तीना महानगरपालिकेमार्फत बांधकाम परवानगी देण्यात आलेल्या असणे, केंद्र सरकाच्या मालकीच्या मिळकतीवर विकासक यांच्याकडून बेकायदेशीर इमारती उभारून मोठ्या प्रमाणात शासन तसेच गोरगरीब जनतेची फार मोठी आर्थिक फसवणूक होणार असणे, स्थानिक नागरिकांमध्ये वेगवेगळे मत प्रवाह निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

ठाणे जिल्ह्यातील मौजे पिसवली, ता. कल्याण येथील जमिनीबाबत आदेश क्रमांक LAQ-३९७ मध्ये नमूद जमीन संरक्षण विभागाचे नावे दाखल करणेबाबत रक्षा संपदा अधिकारी, रक्षा मंत्रालय, भारत सरकार, मुंबई सर्कल, कुलाबा, मुंबई यांनी दि.०६/०४/२०१९ व दि.१९/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना विनंती केली आहे.

कल्याण तालुक्यातील मौजे पिसवली, मौजे नांदिवली तर्फे अंबरनाथ, खोणी वडवली बु. भामटण, व तिसगांव गावामधील जमीन जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि.२३/०२/१९४३ रोजीचे आदेशानुसार व Defence of India Rules, Rule 75 A (1) अन्वये तसेच Defence Coordination Dept यांचेकडील अधिसूचना क्र.१३५८/०२/१/१४२, दिनांक २५/०४/१९४२ व इतर नुसार विमानतळासाठी अधिग्रहित (Requisition) संपादित करण्यात आलेल्या आहेत.

सदर Requisition झालेल्या जमिनी पैकी मौजे पिसवली, नेतिवली, तिसगांव, नांदिवली तर्फे अंबरनाथ येथील गावातील जमीन मिळकती संदर्भात जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडील आदेश LAQ-३९७ दि.२०/१२/१९४८ व LAQ- ३१७ दि.०१/०३/१९५५ अन्वये De-Requisition करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत प्रकरणी जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडील दि. २३/०२/१९४३ रोजीचे आदेशानुसार व Defence of India Rules, Rule 75 A (१) अन्वये तसेच Defence Coordination Dept. यांचेकडील अधिसूचना क्र.१३५८/५/१४२ दिनांक २५/०४/१९४२ व इतर नुसार विमानतळासाठी Requisition करण्यात आलेल्या जमीन मिळकतीचे अधिकार अभिलेखाची तपासणीनुसार मौजे पिसवली, नेतिवली, तिसंगाव व नांदिवली तर्फे अंबरनाथ, ता. कल्याण येथील जमीन मिळकती हया नेवाळी एरोड्रम यांचे नावे नसून खाजगी खातेदारांचे नावे गाव नमुना नं. ७/१२ सदरी दाखल आहेत.

ज्या जमीन मिळकतीवर खातेदारांचे नावे दाखल आहेत, त्या जमीन मिळकती रक्षा संपदा अधिकारी, रक्षा मंत्रालय, भारत सरकार, मुंबई सर्कल, कुलाबा, मुंबई यांनी संरक्षण विभागाचे नावे दाखल करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयास कळविले आहे.

तथापि, जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडील दि.२३/०२/१९४३ रोजीचे आदेशानुसार व Defence of India: Rules, Rule (१) अन्वये तसेच Defence Coordination Dept. यांचेकडील अधिसूचना क्र. १३५८/OR/१/१४२, दि.

२५/०४/१९४२ नुसार विमानतळासाठी Requisition करण्यात आलेल्या मिळकती शासन आदेश LAQ ३९०, दि.२०/१२/१९४८ व LAQ ३९७, दि.०१/०३/१९५५ अन्वये De-Requisition करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत जमीन मिळकत ही आजतागायत खाजगी खातेदारांचे नावे दाखल आहेत. सदर जमीन मिळकतीची पाहणी नुसार आजरोजी मोठया प्रमाणामध्ये वेगवेगळया विभागाकडून परवानगी प्राप्त करुन बांधकामे झालेली असून सदर जागेचा वापर रहिवास तसेच इतर प्रयोजनासाठी होत असल्याची सद्यस्थिती दिसून येत आहे.

सदर लक्षवेधी सुचनेमध्ये नमूद मौजे पिसवली येथील फेरफार क्र. ४८४, ३२९, ९६२, २९१ व ११९ यांचा उल्लेख आहे. परंतु सदर फेरफार हे मौजे पिसवली येथील नमुद स.नं. १७/२/अ/१, ३३/१/अ, ३३/२, ३३/४/२, ३३/६/५ ३३/१४, ३३/९, ३३/१०, ३३/१५, ५५/४/३, ५५/४/अ, ५५/५/१, ५५/६/२, ५५/६/३, ५५/६/ब/२ शी संबंधित दिसुन येत नाही. लक्षवेधी सुचनेमध्ये नमूद फेरफार क्र. ४८४, ३२९, ९६२, २९१ व ११९ हे अनुक्रमे मौजे-नेतिवली, नांदीवली तर्फे पाचानंद, खोणी, वडवली बु., व धामटण या महसुली गावातील आहे. सदर फेरफार हे तत्कालीन उपविभागीय अधिकारी, ठाणे यांचेकडील आदेश दि.२९/०९/२०१० अन्वये रद्द करणेत आलेले आहे. त्यानुसार उपरोक्त फेरफारान्वये दाखल असलेले "भारतीय विमानपत्तन प्राधिकरण" हे नाव कमी करुन "नेवाळी विमानतळ" असे नाव पुर्ववत करणेत आले आहे.

***************************

**लक्षवेधी सूचना क्र.१७६९**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री.बळवंत वानखडे, श्री.मोहनराव हंबर्डे, श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"मौजे-भरोडी व मौजे-कोलिवली तालुका भिवंडी जिल्हा ठाणे येथील शेतकऱ्यांच्या काही जमिन मिळकतीमध्ये पूर्वज मयत झाल्याने संबंधित शेतकरी भरत कदम म्हात्रे व किसन भास्कर भोईर यांनी दिवाणी न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र मिळवले असतांना वारसांची नावे तलाठी सजा भरोडी व तलाठी सजा कोलिवली यामधील संबंधीत तलाठी अधिकाऱ्यांनी वारस दाखल करणेकामी चालढकल करुन मा.न्यायालयाचे अवमान केलेले आहे. मा. दिवाणी न्यायालयाने कायदेशीर पुरावे पाहुन व कायदेशीर प्रक्रिया राबवून मौजे - भरोडी व मौजे - कोलिवली या ठिकाणच्या शेतकऱ्यांना वारसप्रमाणपत्र जाहिर केलेले आहे. तरीसुध्दा तेथील तलाठी व मंडळ अधिकारी यांनी वारस दाखल करण्यास चालढकल करुन मा.न्यायालयाची दिशाभूल व अवमान केल्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्रवाई करुन कडक ती कडक कार्रवाई होणे आवश्यक आहे व न्यायालयाने जाहिर केलेले वारसप्रमाणपत्राची तात्काळ अंमलबजावणी म्हणुन वारसाची नावे दाखल होणेकामी शासनाने तात्काळ करावयाची कार्रवाई शासनाची प्रतिक्रिया व त्याबाबत शासनाची कठोर भूमिका."

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्री. किसन भास्कर भोईर, रा. भरोडी गाव तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे यांनी दिनांक २७/७/२०२३ रोजी दोन अर्ज केलेले आहेत, त्यापैकी पहिल्या अर्जात अर्जदार यांनी मौजे भरोडी येथील सर्वे नंबर १२१/७, १५२/२, १५४/६, १५५/२, १५५/७, १५६/१, १५६/६, १५७/२, १६२/१/अ, १६२/१/ब, २२८/३, ७०/४, ७४/२, ७४/४, ७४/७, ७८/१६, ९०/३, ९९/७, १०३/३, १६१/३, १२७/१/अ या सर्व नंबरच्या जमिनीस १) तुकाराम दुंद्या पाटील २) कृष्णा दुंद्या पाटील ३) बाळू दुंद्या पाटील व ४) भागीबाई भास्कर भोईर असे वारस होते. परंतु फेरफार क्रमांक ६२८३ दिनांक २६/८/१९९३ या फेरफाराने केवळ तुकाराम दुंद्या पाटील व कृष्णा दुंद्या पाटील यांच्या नावाची नोंद झाल्याने फेरफार क्रमांक ६२८३ व त्यापुढील फेरफार रद्द करण्याची कारवाई करण्याकरिता अर्ज केला आहे.

फेरफार ६२८३ सन १९९३ मध्ये झालेला असल्याने सदर फेरफार त्यांना मान्य नसल्यास सक्षम न्यायालयात अपील दाखल करुन दाद मागणे योग्य होईल असे अर्जदार यांना तलाठी यांनी कळविले आहे.

तसेच दुस-या अर्जान्वये अर्जदार यांनी उंद्रया नाना भोईर यांना कुळाने प्राप्त झालेल्या मौजे भरोडी, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. ९२, ८/४, ४/९/ब, ३९/३/क, ३९/४, ३७/७/ब, ४३/१३, ५६/१७/ब या जमिनीस मा.दिवाणी न्यायालयाने वारस घोषित केले असल्याने अधिकार अभिलेखात नाव लावणे करीता अर्ज केलेला आहे.

त्याअनुषंगाने अभिलेख पाहता स.नं. ८/४ (जुना स.नं. १६२/४), ४/९/ब (जुना स.नं. १६८/९/२), ३९/३/क (जुना स.नं. १७९/३/३), ३९/४ (जुना स.नं. १७९/४), ३९/७/ब (जुना स.नं. १७९/७/२), ४३/१३ (जुना स.नं. १८३/१३), ५६/१७/ब (जुना स.नं. १९०/१७/२) हे कुळाने प्राप्त झालेले नसून मालकी हक्काने प्राप्त झालेले आहेत. सदर स.नं. बाबत फेरफार क्र. ९६४ दि. २९ डिसेंबर १९३६ नुसार नाना रामा भोईर हे मयत झाल्याने उंद्रया नाना भोईर यांचे नावाची नोंद झालेली आहे. त्यानंतर फेरफार क्र.१२८५ दिनांक १२/२/१९४६ पाहता उंद्रया नाना भोईर यांनी वल्लभदास शंकरभाई पटेल, रा. मुंबई यांना दि. ३१/१२/१९४५ रोजी खरेदीखताने विक्री केलेली आहे. त्यामुळे उंद्रया नाना भोईर यांनी सदरची जमीन त्यांच्या हयातीत दि. ३१/१२/४५ रोजी विक्री केलेली आहे. त्यामुळे वारसांची नावे लावण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

त्याचप्रमाणे स.नं. ९२ (जुना स.नं. २२८) ह्या जमिनीबाबत फेरफार क्रं. २१४९ दि.८/५/१९५७ पाहता महमद हुसेन आघाडी यांचे जमिनीस नाना रामा भोईर यांचे नाव साधे कुळ म्हणून दाखल झालेले आहे. त्यानंतर फेरफार क्रं. ६३२२ दि.७/३/१९९४ पाहता त्यामध्ये नाना रामा भोईर हे मयत झाल्याने त्यांचे वारस उंद्रया नाना भोईर (मुलगा) व आत्माराम अर्जुन पाटील (मुलीचा मुलगा) अशी दोन नावांची नोंद दिसते. तद्नंतर फेरफार क्रं. १२७२ दि.१२/५/२०२२ नुसार आत्माराम अर्जुन म्हात्रे (पाटील) मयत झाल्याने आजरोजी त्यांचे वारसांची नावे दाखल झालेली आहेत.

त्यानंतर फेरफार क्रं. १४०५ दि. २१/२/२०२३ पाहता उंद्रया नाना भोईर हे दि. ४/५/२००२ रोजी अविवाहीत मयत झाल्याने विश्वनाथ आत्माराम म्हात्रे यांनी वारस अर्ज केल्याने व सदरचे वारस यापुर्वीच फेरफार क्रं. १२७२ दि.१२/५/२०२२ ने नावे लागलेली असल्याने उंद्रया नाना भोईर यांचे नाव कमी केलेचे दिसुन येत आहे.

स.नं. ९२ (जुना २२८) बाबतचा फेरफार क्रमांक १४०५ हा पुर्नविलोकनामध्ये घेऊन उंद्रया नाना भोईर यांचे नाव पुर्ववत करुन अर्जदार यांनी मा.न्यायालयाकडील सादर केलेल्या वारस दाखल्यानुसार कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांना कळविणेत आले आहे.

तसेच मौजे कोलवली येथील फेरफार क्रमांक ५२५ दि. १२/४/१९८२ अन्वये मयत भागीबाई मंगळ्या म्हात्रे यांना वारस मुलगा/मुलगी नसलेने केवळ त्यांच्या भावांची नावे लावलेली आहेत. मात्र स.नं. १०६/५ या स.नं.ला फेरफार क्रमांक ५२५ चा अंमल दिला नसलेने भागीबाई मंगळया म्हात्रे यांचे वारसांची नावे फेरफार क्रमांक १००५ दि.६/३/२०१३ अन्वये ७/१२ ला दाखल करणेत आलेली आहेत.

भागीबाई मंगळया म्हात्रे यांचे वारस मा. दिवाणी न्यायालयाने निश्चित करुन वारस प्रमाणपत्र दिलेले असल्याचे दिसून येते आहे. त्यामुळे त्यांना वारस मुलगा/मुलगी कोणीही नाही, म्हणून फक्त भावांची नावे दाखल केलेला फेरफार क्रमांक ५२५ हा अयोग्य आहे, असे दिसून येते. त्यामुळे मा.न्यायालयाच्या वारसाबाबतच्या आदेशाप्रमाणे वारसांची नावे ७/१२ वर घेऊन चुकीचा फेरफार पुर्नविलोकनात घेणेची कार्यवाही करण्याबाबत उपविभागीय अधिकारी भिवंडी यांना कळविण्यात आलेले आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.१७७१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.बळवंत वानखडे, श्री.मोहनराव हंबर्डे, श्री.राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" मौजे- टेमघर (तालुका भिवंडी जिल्हा ठाणे) येथील सर्व्हे क्रमांक १२० व इतर सरकारी जमिन मिळकतीचे तहसिलदार यांनी कुठलेही कागदपत्र न तपासता शासकीय जमिनीचे विकासकास विनिश्चिती प्रमाणपत्र अकृषिक परवानगी दिल्याने व सरकारी मोजणीची तफावत भूअभिलेखात गैरव्यवहाराच्या माध्यमातून छेडछाड केल्याचे तक्रारदार वैशाली कुंभार यांनी पोलिस आयुक्त ठाणे जिल्हाधिकारी ठाणे आयुक्त भिवंडी महानगरपालिका व जमाबंदी आयुक्त पुणे यांना दिनांक ३ जुलै, २०२३ रोजी रीतसर कागदोपत्री पुराव्यासह तक्रार देऊनही कुठलीही कार्रवाई न झाल्याने संबंधीत विकासकाने शासकीय जमिन पोस्ट ऑफीससाठी आरक्षीत असलेली जमिन परस्पर हडपल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी गैरव्यवहारातून सदर शासनाची जमिन विनामोबदला बहाल केलेली आहे याप्रकरणी मोठा जमिन घोटाळा झाला असून टोलेजंग ईमारत बांधण्यात आली असल्या कारणाने अशा विकासकांनी शासकीय अधिकाऱ्यांना खिशात ठेवले असल्याने हे अधिकारी गैरव्यवहाराच्या माध्यमातून कुठलीही कार्यवाही करत नसल्याने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

---

## श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

मौजे टेमघर येथील स.नं. १२० या जमिनीचे अधिकार अभिलेख पाहता, स.नं. १२०/१, १२०/३, १२०/२/अ, १२०/२/ब, १२०/२/क, १२०/२/ड, १२०/२/इ, १२०/२/ई, १२०/२/अ/७ व १२०/२/अ/८ असे एकूण १० पोटहिस्से आहेत. तसेच सदरचे सर्व सर्व्हे नंबर हे खाजगी मालकीचे असल्याचे दिसून येते. सदरहू जमिनीपैकी स.नं. १२०/२/अ, १२०/२/अ/८ व १२०/२/ड या जमिनीस तहसीलदार, भिवंडी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ अ (१) (अ) प्रमाणे वर्ग, भोगवटा व विनिश्चितीबाबत प्रमाणपत्र दिले आहे.

मौ. टेमघर ता. भिवंडी येथील स.नं. १२० व इतर या जमिनीची मोजणी रजिस्टर नंबर १००७८/२०१८, दि. ०६/०३/२०१८, मोजणी रजिस्टर नंबर १००७८/२०१८, दि. ०६/०३/२०१८, मोजणी रजिस्टर नंबर २१६/२०२०, दि.११/०१/२०२० अन्वये मोजणी करण्यांत येऊन मोजणी आलेखाची 'क' प्रत संबंधीत अर्जदार यांना उप अधीक्षक भूमि अभिलेख, भिवंडी यांनी उपलब्ध करून दिली आहे. उपरोक्त तिन्ही हद्दकायम मोजणी आलेख यांचे अवलोकन केले असता, सदरच्या प्रकरणांमधील मोजणी आलेखामध्ये कोणतीही छेडछाड अथवा खाडाखोड झाल्याचे सकृतदर्शनी दिसुन आलेले नाही, असे उप अधीक्षक भूमि अभिलेख, भिवंडी यांनी कळविले आहे.

मौजे टेमघर, ता. भिवंडी येथील स.नं. १२०/२, ३ व स.नं. १२३/९/ब, क, ड या जमिनीमध्ये बांधकाम परवानगी मंजूर करताना उपअधिक्षक, भूमि अभिलेख, भिवंडी कार्यालयाचा मोजणी नकाशा मोजणी रजिस्टर नंबर २१६/ २०२० विचारात घेतला आहे. सदर मोजणी नकाशामध्ये मंजुर करण्यांत आलेल्या बांधकाम परवानगी प्रस्तावामध्ये २ इमारती व रस्ता दर्शविण्यात आलेला आहे. सदरचा रस्ता हा पुढे स.नं. १२४ मधून विद्यमान भिवंडी कल्याण रस्त्याला मिळत आहे. तक्रार अर्जामध्ये ऑरनेट प्रकल्पामधील २ विद्यमान इमारती व जागेवरील रस्ता हा महानगरपालिकेसाठी शासनाने नियुक्त केलेल्या विकास योजना विशेष घटक कार्यालयामार्फत तयार करण्यात आला असून आयुक्त, भिवंडी मनपा यांचेकडे सादर करण्यात आलेल्या विद्यमान जमीन वापर नकाशामध्ये दिसून येत आहे. मात्र भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या अहवालानुसार ऑरनेट प्रकल्पाकडे जाणारा विद्यमान रस्ता हा मंजूर विकास योजनेत दर्शविण्यात आलेल्या विकास आराखडयातील आरक्षण क्र. १६९ (पोस्ट ऑफिस) या आरक्षणातून जात नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. पोस्ट ऑफिससाठी आरक्षीत जागा खाजगी आहे. त्यामुळे शासकीय जमीन हडपली गेली हे तक्रारदारांचे म्हणणे वस्तुस्थितीशी विसंगत आहे. महानगरपालीकेने मंजूर केलेले बांधकाम परवानगीचे प्रस्ताव हे नियमानुसार असून त्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही, असे आयुक्त, भिवंडी शहर महानगरपालीका यांनी कळविले आहे.

ROTA- H-1301-1(750-10-2023) *******

लक्षवेधी सूचना क्रमांक-१०४६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक-१०४६

श्री.समीर कुणावार, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १०४६ पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्रात ग्रामीण व शहरी भागात अनेक गोरगरीब कुटुंब गेल्या २० ते ३० वर्षापासुन अतिक्रमण करून राहात असणे, देशाचे पंतप्रधान यांनी देशात पंतप्रधान आवास योजना सुरू करणे त्या अंतर्गत "सर्वांसाठी घरे" हा उपक्रम देशात सुरु असणे महाराष्ट्रात अनेक गावात ग्रामपंचायत हद्दीमध्ये तसेच शहरी भागातील वार्डामध्ये सदर गरिब कुटुंब २०-३० वर्ष राहात असणे, परंतु सदर जागा वन विभाग तसेच महाराष्ट्र शासन यांच्या मालकीची असणे, त्यामुळे त्यांना जमीनीचे स्थायी पट्टे न मिळणे शासनाने २०११ पुर्वीचे अतिक्रमण नियमाकुल करून त्यांना स्थायी पट्टे देण्याकरीता आदेश काढणे, परंतु ग्रामपंचायत, नगरपरिषद, नगरपंचायत हद्दीमध्ये असुन सुध्दा त्यांना अद्यापही स्थायी पट्टी न मिळणे महाराष्ट्रातील लाखो कुटुंब स्थायी पट्ट्याची वाट पाहत असणे सदर कुटुंबाचे नावे ग्रामपंचायत मधील "ब" यादी व "ड" यादी यामध्ये त्यांचा समावेश असणे यादीनुसार घरकुल मंजुर होणे परंतु स्थायी पट्टा नसल्याने त्या घरकुलाचा लाभ कुटुंबाला न मिळणे तसेच शासनाने गेल्या अनेक वर्षामध्ये ग्रामीण भागातील हद्द वाढीसाठी पुर्वीप्रमाणे रहिवाशी क्षेत्राकरीता जागा अधिग्रहण बंद करणे तसेच अजुनही अनेक गावांतील राहत असलेल्या नागरिकांचे नावे 'ड' या प्रतिक्षा यादीमध्ये नसणे, प्रतिक्षा यादी 'ड' ची नव्याने सर्वेक्षण करण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे ग्रामीण भागातील लाखो कुटुंब घरकुलापासुन वंचित राहणे या सर्वांना स्थायी पट्टे देण्याची आवश्यकता असणे अतिशय कठीण परिस्थितीत सदर कुटुंब जगत असणे वारंवार या संदर्भात आंदोलन व मोर्चे होत असणे या संदर्भात जनतेची प्रचंड मागणी होत असणे त्यामुळे जनतेची तिव्र भावना व शासनाने करावयाची उपाययोजना."

---

मा.मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे निवेदन

राज्यातील ग्रामीण व शहरी भागात अतिक्रमण करुन रहात असलेल्या कुटुंबांनी केलेली काही अतिक्रमणे ही वन विभागाच्या जागेवरील असून, अशा कुटुंबांना वन विभागाच्या जमिनीचे स्थायी पट्टे देणे किंवा वन जमीनीवर करण्यात आलेली अतिक्रमणे नियमानुकुल करण्याची तरतूद प्रचलित वन कायद्यांमध्ये अंतर्भुत नाही.

केंद्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) जून,२०१५ मध्ये सुरु केली आहे. सद्य:स्थितीत गृहनिर्माण विभागाच्या दिनांक ०९.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ३९९ स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

ग्रामविकास विभागांतर्गत दिनांक १६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये, सर्वसाधारणपणे गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वनक्षेत्र तसेच ज्या जमिनींवर वास्तव्य करणे शक्य नाही, अशा जमिनी वगळून इतर शासकीय जमिनींवरील दिनांक ०१.०१.२०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण करुन राहणाऱ्या सर्व अतिक्रमणधारकांची अतिक्रमणे विहित कार्यपध्दती राबवून, ज्या विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण असेल, त्या-त्या संबंधित विभागाच्या मान्यतेने नियमानुकूल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२.०८.२०२२ च्या शासन निर्णयान्वये, इतर शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत.

त्यानुसार, ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील गावठाणातील एकूण ४१,६०८ मंजूर नोंदीपैकी १५,८६६ नोंदी विनाशुल्क मंजूर करण्यात आल्या आहेत व २५,७४२ नोंदी सशुल्क मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच, कायमस्वरुपी प्रतिक्षायादी (ब यादी) व आवास प्लस यादी (ड यादी) मध्ये राज्यात १,२१,५१६ इतके भूमीहिन लाभार्थी असून त्यापैकी ८२,५९७ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ऊर्वरित ३८,९१९ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत प्रपत्र 'ड' मध्ये तांत्रिक कारणामुळे अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांपैकी, पात्र असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी पुन्हा करण्याकरिता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१२४९.

श्री.सुभाष धोटे,श्री.नानाभाऊ पटोले, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.विकास ठाकरे, श्री.सुनिल केदार, श्री.कुणाल पाटील, ॲड यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.बळवंत वानखडे, श्री.अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री.अस्लम शेख, श्री.झीशान सिद्दिकी, प्रा.वर्षा गायकवाड, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.सुरेश वरपुडकर, वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

---

" राज्यातील चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी तालुक्यातील जानाळा-पोंभुर्णा-गोडपिपरी-घाया-पोडसा ते राज्यसिमा (रामा ३६९ ) या मार्गाची जड वाहतुक साधा परिस्थितीत गोंडपिपरी शहरातील मध्य भागातुन ३ मीटर रुंदीच्या रस्त्याने सुरु असणे, या राज्य मार्गाने मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्यांची आंतरराज्य वाहतुक होत असल्याने मोठया प्रमाणात वाहतुकीची वर्दळ असणे, राज्य मार्गाची वाहतुक शहरातील ३ मीटर रुदिच्या अरुंद रस्त्यानी होत असल्याने अनेकदा वाहतुक कोंडी होवुन अपघात होण्याची परिस्थिती निर्माण होत असते. सदरतु काम अतिशय आवश्यक असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाने काम प्रस्तावित केल्याने उपरोक्त दोन मार्गाचे कामाकरिता दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१ मध्ये रु.५०० लक्ष निधी मंजुर झालेला असणे, सदर निधीमध्ये फक्त ३५० किमी रस्त्याचे मातीकाम पुर्ण होऊ शकते, सदर रस्ता वन विभागाच्या हद्दीतुन जात असल्याने वन विभागाची जमीन हस्तांतरीत करण्यात आलेली असणे, सदर रस्ता एक वर्षाच आत पूर्ण करावे या अटीवर वन विभागाने नाहरकत दिले असल्याने सदर रस्त्याचे काम एक वर्ष कालावधीत पुर्ण करणे गरजेचे आहे. त्यासाठी १५०० लक्ष रक्कमेची आवश्यकता असणे, परंतु वारंवार लक्ष वेधूनही शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे विभागातील नागरिकांमध्ये शासनप्रति प्रसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. "

### मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून ) यांचे निवेदन.

चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी तालुक्यातील जानाळा पोंभुर्णा गोंडपिपरी धाबा पोडसा ते राज्यसिमा रस्ता (रा.मा-३६९) या मार्गाची जड वाहतूक सद्यस्थितीत गोंडपिपरी शहरातील मध्य भागातुन सुरू आहे. या राज्यमार्गाने मध्यप्रदेश, छत्तीसगढ, महाराष्ट्र, तेलंगाना व आंध्रप्रदेश या राज्यांची आंतरराज्य वाहतूक होत

असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूकीची वर्दळ असते. सदर राज्यमार्गावर गोंडपिपरी शहरातील मुख्य वस्तीतून साखळी क्रमांक कि.मी. ३९/५०० ते ४०/५०० मध्ये जवळपास १.०० किमी लांबीमध्ये ३.०० मी रूंदीच्या अरूंद रस्त्यातून वाहतुक होत असल्याने अनेकदा मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. यामुळे शहराच्या बाहेरून वळणमार्ग करणे अत्यंत आवश्यक असल्याने मार्च २०१६ मध्ये वळण मार्गाचे सर्वेक्षण करून आखणी नकाशाला मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी दिनांक १९-०३-२०१६ मंजुरी घेण्यात आली. सदर आखणी नकाशानुसार वळणमार्गाची एकूण लांबी ३.५६ कि.मी असून सदर वळणमार्ग खाजगी जमीनीतून जात असून भूसंपादन करणे आवश्यक आहे. भूसंपादनाकरिता मार्च २०२० च्या अर्थसंकल्पामध्ये रू. २५०.०० लक्ष रूपयांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे व भूसंपादनाची प्रक्रिया प्रगतीत असून दर निश्चितीकरिता विशेष भू-संपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, गोंडपिपरी यांच्या स्तरावर भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत आहे. सदर वळणमार्गाची एकूण लांबी मध्ये दोन ठिकाणी रस्ता मुख्य वनक्षेत्रातून जात आहे. त्या वन क्षेत्रातील रस्त्याची लांबी ४३०.०० मी एवढी असून सदर रस्त्याची वन विभागातर्फे मंजुरी प्राप्त झालेली आहे. यामध्ये वळती करण्यात आलेल्या वनक्षेत्रात प्रस्तावित काम वनक्षेत्र हस्तांतरीत करण्यात आलेल्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत सुरु न केल्यास सदर क्षेत्र परत वनविभागाच्या ताब्यात द्यावे लागणार आहे.

सदर वळणमार्ग रस्त्याचे बांधकाम करणेकरिता, भूसंपादनाची कार्यवाही लवकरच पूर्ण करुन वळणमार्गाचे बांधकाम करणेकरिता मंजूर कामांची निविदा प्रक्रिया हाती घेण्याचे नियोजन आहे.

**************************

(लक्षवेधी सूचना क्र.७४४)

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**डॉ. आकाश फुंडकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७४४ पुढीलप्रमाणे आहे :-**

""सामान्य रुग्णालय, खामगांव तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी सामान्य रुग्णालय खामगांव येथे तज्ञ डॉक्टर व परिचारिकांची पदे रिक्त असणे, खामगांव जि. बुलढाणा हे बुलढाणा जिल्हयातील सर्वात मोठे शहर असून शहरालगत दोन राष्ट्रीय महामार्ग व तीन राज्य मार्ग जात असणे, अनेक वेळा महामार्गावर झालेल्या अपघातातील रुग्णांना तातडीने खामगांव सामान्य रुग्णालय खामगांव येथे दाखल करण्यात येत असणे, यावेळी मोठ्या प्रमाणात डॉक्टर व अधिपरिचारीकांची आवश्यकता असणे, तसचे घाटाखालील समजल्या जाणाऱ्या ६ तालुक्यांमधून हजारो रुग्ण खामगांव येथे उपचारार्थ दाखल करण्यात येत असणे, त्यात मोठया प्रमाणात महिला प्रसुतीसाठी देखील दाखल होत असणे, त्यांच्यावर तज्ञ डॉक्टरांअभावी अनेक वेळा रुग्णांवर उपचार करण्यास अडचणी निर्माण होत असणे, त्यासाठी सामान्य रुग्णालय खामगांव जि. बुलढाणा येथे कंत्राटी डॉक्टर्स, कर्मचारी तथा परिचारिका यांची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ""

---

## मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

सामान्य रुग्णालय खामगाव जि.बुलढाणा या रुग्णालयामध्ये वैद्यकिय अधिकारी वर्ग-१ ची एकुण १६ पदे मंजुर असुन ४ पदे भरण्यात आलेली आहेत व १२ पदे रिक्त आहेत.तसेच वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ ची २४ पदे मंजुर असुन २४ पदे भरलेली असुन वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ चे एकही पद रिक्त नाहीत. तसेच वर्ग ३ अधिपरिचारीका हे ६४ पदे मंजुर असुन एकुण १२ पदे रिक्त आहेत.रुग्णालयातील वर्ग ३ चे कार्यालयीन कर्मचारी मिळुन असे १३१ पदे मंजुर असुन ९५ पदे भरलेली आहेत. तसेच वर्ग-४ ची एकुण ५९ पदे मंजुर असुन २६ पदे भरलेली असुन ३३ पदे रिक्त आहेत.

सामान्य रुग्णालय खामगाव जि.बुलढाणा येथील रिक्त पदांचा परिणाम रुग्ण सेवेवर होऊ नये याकरिता एएचएम अंतर्गत वैद्यकिय अधिकारी तसेच इतर आवश्यक पदाकरिता कंत्राटी सेवा घेण्यात येतात. सामान्य रुग्णालय खामगाव येथे नियमित मंजुर पदाबरोबरच एनयुएचएम अंतर्गत एकुण ६१ पदे मंजुर असुन त्यापैकी ५८ पदे भरलेली आहेत. नियमित कर्मचारीबरोबरच कंत्राटी कर्मचारी नेमण्यात आलेले असल्याने रुग्णसेवा सुरुळीतपणे पार पाडता येत आहे. तसेच रुग्णालयीन आंतररुगण,बाहयरुग्णांची संख्या पाहता सदर रुग्णालयामार्फत रुग्णांना वेळेवर उपचार देण्यात येत आहे.

**सामान्य रुग्णालय खामगाव येथील सन २०२०-२१ ते २०२२-२०२३ या कालावधीमधील आंतरुग्ण व बाह्यरुग्णाबाबतची माहीती खालीलप्रमाणे आहे.**

| Sr. No. | Parameter | 2020-2021 | 2021-2022 | 2022-2023 |
|---|---|---|---|---|
| 1 | OPD | 104349 | 136888 | 201040 |
| 2 | IPD | 14635 | 20379 | 24819 |

सामान्य रुग्णालय खामगाव मधील शासकीय योजनेबाबतचा अहवाल पाहिला असता रुग्णांस सर्व सोयीसुविधा पुरविण्यात येतात.अकोला अधिनस्थ् असलेल्या रुग्णालयामधील नियमीत वर्ग-३ व वर्ग-४ ची रिक्त पदे भरण्याकरिता जाहीरात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे तसेच वर्ग-१ मधील रिक्त पदे पदोन्नती व नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र. १७०५

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे दुसरे अधिवेशन
## मा. श्री. विनोद निकोले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १७०५

---

"राज्यात पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पालघर जिल्हा रुग्णालयासाठी सन २०१८-१९ मध्ये २०० कोटी, व प्राथमिक आरोग्य केंद्र वनई चंद्रनगर सन २०१५-१६ मध्ये आणि प्राथमिक आरोग्य केंद्र गंजाड सन २०१८-१९ मध्ये मंजुर या कामासाठी वेगळा निधी मंजूर झालेला असतानाही ही कामे मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्यामुळे सर्वसामान्य लोकांना व आदिवासींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणे, तसेच, आरोग्य सुविधा अभावी रुग्णांना गुजरात राज्यात उपचारासाठी घेऊन जावे लागणे. पालघर जिल्हा रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्र वनई चंद्रनगर, प्राथमिक आरोग्य केंद्र गंजाड तसेच, ग्रामीण रुग्णालय विक्रमगड येथे निवासस्थाने बांधणे हे काम सन २०१९-२० मध्ये मंजूर असून आजतागायत पूर्ण झालेले नसणे, पालघर जिल्हा ९० टक्के आदिवासी असुन येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान कोकण विभाग कार्यकारी अभियंता हे पद गेली अनेक वर्षांपासून रिक्त असून भरले गेलेल नसल्याने पालघर जिल्हातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सर्व बांधकामे वर्षानुवर्षे अपूर्ण असून रखडलेली असणे, सदर बांधकामे करताना अधिकाऱ्यांकडून मनमानी होत असणे, कार्यकारी अभियंता श्री अमर सोनवणे यांची दिनांक १२ डिसेंबर २०२२ रोजी तत्कालीन आयुक्त भा.प्र.से. श्री. तुकाराम मुंडे यांनी त्यांची सेवा समाप्त केली तरीही आज ते कार्यकारी अभियंता पदावर काम करत असणे, त्यांचे कार्यपालन अहवाल मागील ०३ वर्षांपासून मंजूर नसून सुद्धा त्यांना पुनर्नियुक्ती दिलेली असणे, त्यामुळे संबंधित अभियंत्यांवर कारवाई होणे गरजेचे असणे, पुनर्नियुक्ती दिलेल्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना..."

---

## मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांनी करावयाचे निवेदन

<u>जिल्हा रुग्णालय पालघर</u> :-राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (२०१८-१९) मध्ये पालघर येथे २०० खाटांचे जिल्हा रुग्णालय व कर्मचारी निवासस्थाने बांधकाम करणे याकरिता रु. १५५.३० कोटी निधी मंजूर झाला होता. सदरचे जिल्हा रुग्णालय हे IPHS ( भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके ) च्या निकषानुसार बांधावयाचे असल्याने सदर बांधकामाचे नकाशे हे सुधारित करण्यात आले होते. त्यानुसार सुधारित रक्कमेचा रु. २०९.११ कोटी निधीचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रकल्प अंमलबजावणी आराखडा सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये पुनश्चः प्रस्तावित करण्यात आला असून त्यास दि. २५/०४/२०१९ रोजी (२०१९-२०) सदरचे बांधकामास मंजुरी मिळाली. त्या अनुषंगाने शासनाकडून बांधकामाच्या ढोबळ अंदाज आराखड्यास सार्वजनिक आरोग्य विभागाच्या

शासन निर्णयानुसार दि. ०९/०८/२०१९ रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. प्रस्तावित बांधकामाचे नकाशे हे IPHS ( भारतीय सार्वजनिक आरोग्य मानके) नुसार केंद्राच्या NHSRC, New Delhiतज्ञाकडून मंजुरी मिळाल्यानंतर राज्यस्तरावरमुख्य वास्तुविशारद, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून त्यास मंजुरी घेण्यात आली. सदर मंजूर नकाशानुसार सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले, त्यानुसार प्रशासकीय मान्यतेमध्ये काही बाबींचे परिमाण बदल असल्याने त्यास दि. २१/१२/२०२० रोजी शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त घेण्यात आली होती.

प्रस्तावित बांधकामाची निविदा प्रक्रिया करण्यास झालेल्या विलंबाची कारणे :-

१) सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या आराखड्यांना दि. १८/०३/२०१९ रोजी मुख्य वास्तुविशारद सा.बा.विभाग यांच्याकडून मंजुरी प्राप्त झाली असून यासाठी ३ महिन्याचा कालावधी लागला.

२) इमारत बांधकामासाठी जागा हस्तांतरणाचा करार सिडको मार्फत दि. १०/०६/२०२० रोजी करण्यात आला. यासाठी ४ महिन्याचा कालावधी लागला.

३) सिडकोमार्फत अग्निशमन विभागाचे नाहरकत ११/०९/२०१९ रोजी प्राप्त झालेली असून यात ५ महिन्यांचा कालावधी लागला. बांधकाम परवानाही सिडकोमार्फत २५/०९/२०२० रोजी प्राप्त झालेली असून यासाठी १९ महिन्यांचा कालावधी लागला.

४) मुख्य अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून सदर कामासाठी बनविण्यात आलेल्या विद्युत अंदाजपत्रकास दि. २६/०२/२०२१ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून यासाठी १४ महिन्यांचा कालावधी लागला.

५) सचिव,पर्यावरण विभाग(SEIAA) यांचे कार्यालयाकडून पर्यावरण ना हरकत दाखला दि. २५/०३/२०२१ रोजी प्राप्त झाला असून, यासाठी ६ महिन्यांचा कालावधी लागला.

६) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडून सदर कामासाठी ·बनविण्यात आलेल्या (स्थापत्य) अंदाजपत्रकास दि. ०६/०४/२०२१ रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झालेली असून यात १६ महिन्यांचा कालावधी लागला.

तद्नंतर सदर बांधकामाची निविदा प्रारूपास दि. २७/०८/२०२१ मंजुरी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांच्याकडूनमिळाली व दि. ०४/११/२०२१ रोजी निविदा प्रसिद्धी करण्यात आली. सदर निविदा ही कंत्राटदाराचे दर १७.४६% जास्तीचे तसेच १०% Price Escalation अंतर्भूत असल्याने जवळपास २७.४६% अंदाजपत्रकापेक्षा वाढीव दराची निविदा असल्याने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत मंजूर प्रकल्प रक्कमेच्या अधीन राहून बांधकाम करणे अनिवार्य असल्यामुळे निविदा रद्द करून दि. ०३/०९/२०२२ रोजी पुनश्चः निविदा प्रसारित करण्यात आली.सदर निविदा प्रक्रियेस दि. ०७/१२/२०२२ रोजी मंजुरी घेऊन दि. १५/१२/२०२२ रोजी कार्यारंभ आदेश ठेकेदारास देण्यात आला. सद्यस्थितीत जिल्हा रूग्णालयाचे बांधकाम प्रगतीत असून जवळपास २५% पुर्ण झाले आहे.

<u>प्राथमिक आरोग्य केंद्र वनई चंद्रनगर</u>:-प्राथमिक आरोग्य केंद्र वनई चंद्रनगर ता. डहाणू जि. पालघर येथे मुख्य इमारत, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान बांधणे हे काम राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत संन २०१५-१६ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात मंजूर असून या कामास दि. २३/०८/२०१६ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असूनसदर बांधकामास पूनर्वसनाची जागा देण्याचे प्रस्तावित होते. परंतु सदर जागेसाठी पाठपुरावा करूनही जागा उपलब्ध न झाल्यामुळे प्रस्तावित बांधकाम हे जुन्या अस्तित्वात असलेल्या उपकेंद्राचे निर्लेखन करून बहुमजली इमारत बांधकाम

अधिकारी प्राथमिक आरोग्यकेंद्र गंजाड यांना दि. ०४/०३/२०२२ रोजी कळविले होते. त्याअनुषंगाने मुंबई-वडोदरा महामार्गाच्या अधिकाऱ्यासोबत सदर ठिकाणी संयुक्त भेट दिली असता प्राथमिक आरोग्यकेंद्र गंजाड येथे बांधकाम चालू असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थानाच्या ईमारतीचा काही भाग जात असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सदरच्या ठिकाणी संबंधित ठेकेदाराकडून काम बंद ठेवण्यात आले. त्यानंतर मुंबई-वडोदरा महामार्ग विभागाच्या प्रकल्प व्यवस्थापकासोबतचर्चा केली असता सदर चर्चेमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राचे व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थानाचे काम सुरु करण्यास हरकत नसल्याचे कळविण्यात आले. याबाबतठेकेदारास काम चालू करण्यास दि. ०२/११/२०२२ रोजी कळविण्यात आले होतेव सदर कामास दि. ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत रु. ५००/- प्रती दिन प्रमाणे दंड आकारून मुदतवाढ देण्यात आली होती.

दरम्यानच्या काळात कामाची प्रगती असमाधानकारक असल्याने दंडामध्ये दि. २१/०१/२०२३ पासून दि. ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत रु. १०००/- प्रती दिवस याप्रमाणे वाढ करण्यात आली होती. त्यावेळीवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान या इमारतीचे R.C.C. चे काम पूर्ण झाले होते. तसेच तळमजला व पहिल्या मजल्याचे बांधकाम सुरु होते व मुख्य इमारतीचे Plinth Level पर्यंत काम पूर्ण झाले होते. सदरचे काम अंदाजित दि. ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दि. १४/०४/२०२३ रोजी सदर ठिकाणी भेट दिली असता कामाची स्थिती पाहूनसंबंधित ठेकेदारास सुरु असलेल्या दंडामध्ये वाढ करून रु. २०००/- प्रती दिवस दंड आकारून सदरचे काम दि. ३०/०६/२०२३ रोजी पर्यंत पूर्ण करण्यास सूचित केले आहे.

सध्यस्थितीत मुख्य इमारतीच्या पहिल्या मजल्याचे Flooring चे काम पूर्ण झाले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान इमारतीचेFlooring चे काम सुरु आहे. सदरचे काम अंदाजित ३०/०८/२०२३ रोजीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.सद्यस्थितीत बांधकाम ८५% पुर्ण झाले आहे. तसेच अधीक्षक अभियंता याच्याकडे दि. ११/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर ठेकेदारास काळ्या यादीत नाव समाविष्ट करणेबाबत जिल्ह्यास सूचित केले आहे.

<u>ग्रामीण रुग्णालय विक्रमगड</u> :- ग्रामीण रुग्णालय विक्रमगड, ता. विक्रमगड जि. पालघर येथील निवासस्थाने बांधणे हे काम सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मध्ये अंजूर झाले असून सदर बांधकामांचे कार्यारंभ आदेश हे. दि .२६/०८/२०१९ रोजी ठेकेदार जिजाऊ कन्स्ट्रक्शन, विक्रमगड यांना -२५% कमी दराने देण्यात आले होते.

त्यानंतर तेथे बांधकाम सुरु करण्यात आले तेथील स्थानिक रहिवासी महिलेने सदर बांधकाम करणेस विरोध दर्शविला होता व सदर ठिकाणी दगडफेक करणे, कामे बंद पाडणे असा प्रकार केल्यामुळे बांधकाम Police Protection सुद्धा मागण्यात आले होते. सदर प्रकार हा सतत सुरु असल्याने तेथील ठेकेदाराने ग्रामस्थांना मध्यस्थी करून कामे सुरु केली ह्या प्रकारास ७ ते ८ महिने विलंब झाला. तद्नंतर बांधकामात ह्या ३ इमारतीप्रस्तावित होत्या. सध्यस्थितीत वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक या इमारतींचे Plaster चे काम पूर्ण झाले असून ANM quarter चे काम तळमजल्याचे काम Column पर्यंत झाले आहे. सदर ठेकेदारास झालेल्या विलंबनाबाबत करणे दाखवा नोटीस देण्यात आल्या असून सदर बाबतीत बांधकामाची प्रगती राखणे करिता वेळोवेळी आढावा बैठकी तसेच लेखी कळविले आहे. सदर ठेकेदारास रु. ५००/- प्रती दिन दंड आकारण्यात आला असून काम हे डिसेंबर २०२३ अखेर पूर्ण करावे असे कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत बांधकाम ६०% पुर्ण झाले

करण्याची मान्यता घेण्यात आली. या प्रक्रीयेकरिता जवळपास ३ वर्षाचा कालावधी गेला. जागा उपलब्धते नंतर निविदा प्रक्रिया करून दि. १४/०८/२०१९ रोजी ईशिताइन्फ्रास्ट्रक्चर,नाशिक यांना १३.९२% कमी दराने कार्यारंभ आदेश देण्यात आले. परंतु सदर ठिकाणी ग्रामस्थांचा विरोध असल्या कारणाने बांधकाम ६ महिने उशिराने सुरु झाले. माहे फेब्रुवारी २०२० रोजी काम सुरु केले असता कोविड-१९ या आलेल्या आजाराच्या प्रभावामुळे सन २०२० मध्ये काम सुरु ठेवण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या.

त्याअनुषंगाने वरील बाबीचा विचार करता व कामाची स्थिती पाहून ठेकेदारास काम पूर्ण करणेकरिता दि. ३०/०९/२०२१ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. असे असतानाही ठेकेदाराने सदरचे काम वेळेत पूर्ण केले नसल्याने ठेकेदारास दि. ०१/१०/२०२१ पासून रु. ५००/- प्रती दिवस प्रमाणे दंड आकारण्यात आला असून सदर कामासदि. ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत रु. ५००/- प्रती दिवस प्रमाणे दंड आकारून मुदतवाढ देण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांचेकडून यापूर्वी चालू असलेल्या दंडामध्ये दि. २१/०१/२०२३ पासून दि. ३१/०३/२०२३ रोजी पर्यंत रु. १०००/- प्रती दिवस याप्रमाणे वाढ करण्यात आली होती. त्यावेळी सदरच्या ठिकाणी सदर ईमारतीचे ३ rd Slab चे काम सुरु होते व पहिल्या मजल्याचे बांधकाम सुरु होते. सदरचे काम दि. ३०/०३/२०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी दि. १४/०४/२०२३ रोजी सदर ठिकाणी भेट दिली असता कामाची स्थिती पाहूनसंबंधित ठेकेदारास सुरु असलेल्या दंडामध्ये वाढ करून रु. २०००/- प्रती दिवस दंड आकारून सदरचे काम दि. ३०/०६/२०२३ रोजी पर्यंत पूर्ण करण्यास सूचित केले आहे. सध्यस्थितीत सदरच्या इमारतीचे तळमजला व पहिल्या मजल्याचे आतील प्लास्टर काम पूर्ण झाले असून दुसऱ्या मजल्याचे आतील प्लास्टर व इमारतीच्या बाहेरील बाजूस प्लास्टर तसेच तळमजल्याचे Flooring चे काम सुरु आहे. सदरचे काम अंदाजित ३०/०८/२०२३ रोजीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.सद्यस्थितीत बांधकाम ९०% पुर्ण झाले आहे. तसेच अधीक्षक अभियंता याच्याकडे दि. ११/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर ठेकेदारास काळ्या यादीत नाव समाविष्ट करणेबाबत जिल्ह्यास सूचित केले आहे.

<u>प्राथमिक आरोग्य केंद्र गंजाड</u>:-प्राथमिक आरोग्य केंद्र गंजाड,ता. डहाणू जि. पालघर येथे मुख्य इमारत, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी निवासस्थान बांधणे हे काम राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत संन २०१८-१९ च्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यात मंजूर असून या कामास दि. २१/०८/२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करून दि. १४/०८/२०१९ रोजी ईशिता इन्फ्रास्ट्रक्चर, नाशिकयांना १३.९२% कमी दराने कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. परंतु सदर ठिकाणी स्थानिक अडचणीमुळे ५ महिने काम उशिराने सुरु झाले. माहे फेब्रुवारी २०२० रोजी काम सुरु केले असता कोविड-१९ या आलेल्या आजाराच्या प्रभावामुळे सन २०२० मध्ये काम सुरु ठेवण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्याअनुषंगाने वरील बाबीचा विचार करता व कामाची स्थिती पाहून ठेकेदारास काम पूर्ण करणेकरिता दि. ३०/०९/२०२१ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. असे असतानाही ठेकेदाराने सदरचे काम वेळेत पूर्ण केले नसल्याने ठेकेदारास दि. ०१/१०/२०२१ पासून रु. ५००/- प्रती दिवस प्रमाणे दंड आकारण्यात आला आहे. परंतु सदर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आवारातून मुंबई-वडोदरा महामार्ग जात असल्याने मुंबई-वडोदरा महामार्ग विभागाने वैद्यकीय

आहे.तसेच अधीक्षक अभियंता याच्याकडे दि. ११/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर ठेकेदारास काळ्या यादीत नाव समाविष्ट करणेबाबत जिल्ह्यास सूचित केले आहे.

१). राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कार्यकारी अभियंता यांची परिमंडळस्तरावर एकूण ८ पदे मंजूर आहेत. कोकण विभागातील कार्यकारी अभियंता हे पद एकेरी पद असून त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई मुख्य कार्यालय व ठाणे या पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

२).दिनांक २९/११/२०२२ च्या शासनास सादर करण्यात केलेल्या पत्रान्वये श्री.सोनावणे, कंत्राटी कार्यकारी अभियंता यांना पुर्ननियुक्ती न देण्यात आल्याने दि.०८/१२/२०२० ते दि. ०७/११/२०२१ तसेच दि.०९/११/२०२१ ते दि. ०८/१०/२०२२ या कालावधीचा मुल्यांकन अहवाल (Performance Report ) तत्कालीन आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे मार्फत पुनर्विलोकीत करण्यात आलेला नाही. तथापी मौखिक सुचनान्वये श्री.सोनावणे कामकाज पाहत होते श्री अमर सोनावणे यांचे दि. ०८/१२/२०२० पासून मुल्यांकन अहवाल पुर्नर्विलोकीत झाले नसल्यामुळे त्यांना पुनर्नियुक्ती देण्यात आलीनव्हती. त्यामुळे श्री.सोनावणे यांची सेवा आपोआप समाप्त झालेली आहे,असे नमूद करण्यात आले होते.

परंतू त्या संदर्भात श्री.अमर सोनवणे, कंत्राटी कार्यकारी अभियंता यांना कार्यमुक्त केल्याचे दिसून येत नाही.

३). पुनर्विलोकन न झालेले Performance Report -

| अनु. क्र. | मुल्यांकन अहवाल(**Performance Report)** |
|---|---|
| १. | दि. ०८/१२/ २०२० to दि. ३१/०८/२०२१ |
| २. | दि. ०९/११/२०२१ to दि. ०८/ १०/२०२२ |

सदरचेPerformance Report प्रतिवेदीत करणेत आले असून पुनर्विलोकित करण्यात आलेले नाहीत.

४). श्री.सोनावणे यांनी दि. १०/१०/२०२२ व १०/०१/२०२३ रोजीचे पुनर्नियुक्ती विनंती अर्जा संदर्भात या कार्यालयाकडील दि. ०९/०३/२०२३ च्या मान्य टिप्पणी नुसार श्री.सोनावणे यांना कंत्राटी कार्यकारी अभियंता या पदावर दि.०९/११/२०२१ ते दि. ०८/१०/२०२२ आणि दि.१०/१०/२०२२ ते २९/०६/२०२३ या कालावधीत तांत्रिक सेवाखंड वगळून दि.१४/०३/२०२३ रोजी पुनर्नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

***********************************

२०९

लक्षवेधी सूचना क्रमांक-

सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

***महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणें आहे:-***

"परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरिप हंगाम २०२२ मध्ये पि कवलेला कांदा मार्च, २०२३ पर्यंत परभणी येथे असलेल्या खाजगी भाजीपाला विक्री मार्केटला विक्री करणे, कांदा अनुदान प्रस्ताव मार्केट कमिटी परभणी यांनी आजरोजी पर्यंत घेतलेला नसणे, परभणीत जे भाजीपाला खरेदी मार्केट आहे त्याला पणन चे लायसन नसणे, यामुळे शासनाच्या जी. आर. प्रमाणे खाजगी मार्केटच्या पावत्या जमत नसल्याचे कारण देत मार्केट कमिटी सचिवांनी परभणी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचे कांदा अनुदानाचे प्रस्ताव आजपर्यंत घेतलेले नसणे, परभणी जिल्ह्यातील दुसरे मार्केट नसणे, नाफेड कांदा खरेदी केंद्र नसणे, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांदा विकावे तरी कुठे असा प्रश्न जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पडलेला असणे, जो मार्केट परभणीत आहे तिथे सर्वांनी कांदा विक्री केलेला असणे, सन २०१६-१७ साली ही हेच मार्केट मनपाच्या जुन्या मोंढ्यात परभणी येथे असताना अशा परीस्थितीत त्याच्या पावत्या चालल्या गेल्या, आता हेच मार्केट पार्थी रोड येथे जाऊन बसल्याने त्याच्या पावत्या न चालणे, त्यामुळे शेतकरी संभ्रमात असणे, विशेषत: परभणी येथे भाजीपाला खरेदी विक्रीचे हे एकमेव मार्केट असणे, त्यामुळे परभणी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांची अडचन लक्षात घेता झालेलें नुकसान भरुन काढण्यासाठी शासनाने जी मदत जाहिर केलेली आहे ती कांदा उत्पादकांना देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. अब्दुल सत्तार, मा. मंत्री (पणन) यांचे निवेदन**

चालू वर्षी राज्यात फेब्रुवारी २०२३ च्या सुरुवातीस कांद्याच्या बाजारभावात मोठ्या प्रमाणात झालेली घसरण विचारात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने, राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये, खाजगी बाजार समित्यामध्ये, थेट पणन अनुज्ञप्तीधारकांकडे अथवा नाफेडकडे दिनांक १ फेब्रुवारी २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान शासन निर्णय, दिनांक २७/३/२०२३ मध्ये नमूद केलेल्या अटीस अधीन मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच या संदर्भात शासनपत्र दि. २०/०४/२०२३ व दि.२९/०५/२०२३ अन्वये अनुदानाच्या निकषांबाबत अतिरीक्त सुचना देण्यात आल्या आहेत.

२. परभणी जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ०८ जुलै, २०१६ रोजीच्या परिपत्रकानूसार बाजार आवारा बाहेरील भाजीपाला व फळफळावळ नियमन मुक्त

करण्यात आलेले असल्यामुळे बाजार समितीच्या मार्केट यार्डाबाहेरील भाजीपाला व फळ विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी बाजार समितीचा परवाना हस्तगत केलेला नाही.

३. सन २०१६-१७ मध्ये माहे जुलै २०१६ व ऑगस्ट २०१६ या महिन्यामध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रमाणे कांदा अनुदान दिनांक १५ एप्रिल २०१७ चे शासन निर्णयान्वये जाहिर केलेले होते. त्यावेळी परभणी येथील भाजी मार्केट हे मोंढ्यात असल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीकडे भाजी मार्केट मध्ये खरेदी विक्रीसाठी येणाऱ्या भाजीपाल्याच्या आवकेची माहिती पणन संचालनालयास सादर केलेली होती. त्यानूसार शासन निर्णय दिनांक २४/०१/२०२० अन्वये परभणी जिल्ह्यातील ६८९ शेतकऱ्यांना रु.८५०७८२१/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले होते.

४. परभणी जिल्हयामध्ये खाजगी बाजाराची संख्या ०४ असून थेट पणन अनुज्ञप्तीधारकांची संख्या २२ आहे. परंतु परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांनी खाजगी बाजार व थेट पणन परवानाधारक यांचेकडे कांदा विक्री न करता खाजगी व्यापा-यांना कांदा विक्री केला असल्याने दिनांक २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार सदरचे शेतकरी अनुदान मिळण्यास पात्र होत नाहीत.

****************

H/870-19

लक्षवेधी सूचना क्र.८३४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

मा. डॉ. विनय विलासराव कोरे (सावकर) विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम- १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.८३४ पुढीलप्रमाणे आहे :-

" शासनाच्या शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्वराज्य संस्था, शासकीय अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन दिले जात असणे, त्याचबरोबर पूरक आहारात बिस्किटे, केळे, शेंगदाणा चिक्की, कुरमुरे आणि राजगिरा लाडू देणे अपेक्षित असणे, सदर योजनेमार्फत राज्यातील २८२२ शाळेतील अंदाजे ३,४०,००० विद्यार्थ्यांना लाभ मिळत असणे, शालेय पोषण आहार योजनेत सध्याच्या देण्यात येणाऱ्या पूरक आहारात गुळाचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांची रोगप्रतिकारक शक्ती व स्मरणशक्ती वाढण्यास तसेच गूळ उत्पादित शेतकऱ्यांना चांगला दर मिळण्यास मदत होईल, गुळ राज्यातील मार्केट समितीकडून खरेदी करुन बचत गटांमार्फत १० ग्रॅम वजनाच्या वड्या / चॉकलेट बनवून पूरक आहारात त्याचा समावेश केलेस बचत गटांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन उत्पादक शेतकऱ्यांना ज्यादाचा दर मिळेल तसेच शालेय विद्यार्थ्यांना गुळामुळे रोगप्रतिकारक शक्ती व स्मरणशक्ती वाढण्यास मदत होईल, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

## (श्री. दिपक केसरकर, शालेय शिक्षण मंत्री)

केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (पूर्वीची शालेय पोषण आहार) योजनेंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित इ.१ ली ते इ.८ वी मध्ये शिकणाऱ्या राज्यातील ८५,६४८ शाळांमधील सुमारे १ कोटी ३ लाख विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे लाभ देण्यात येत आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत इ.१ ली ते ५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १०० ग्रॅम तसेच इ.५ वी ते इ.८ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना १५० ग्रॅम याप्रमाणे तांदूळ उपलब्ध करुन देण्यात येतो. सदर तांदूळापासून शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे विविध पाककृतींच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

ग्रामीण भागातील शाळांना जिल्हानिहाय पुरवठेदारामार्फत तांदुळ व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यात येतो. सदर धान्यादी मालापासून स्थानिक बचत गट/ स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्यामार्फत शाळांमध्ये आहार बनवून विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. यासाठी इंधन व भाजीपाल्याची रक्कम शाळांना देण्यात येते. तसेच, नागरी भागातील विद्यार्थ्यांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांव्दारे निवड केलेल्या महिला बचत गटांमार्फत केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीव्दारे तयार आहाराचा पुरवठा करण्यात येतो. यासाठी आहार खर्चाची रक्कम संबंधित बचत गटांना अदा केली जाते.

प्रस्तुत योजनेंतर्गत आहार शिजविणाऱ्या यंत्रणेमार्फत आठवड्यातून किमान एक दिवस विद्यार्थ्यांना फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे इ.च्या स्वरुपात पुरक आहार देण्यात येतो. यासाठी वेगळा निधी शासनामार्फत देण्यात येत नाही.

उपरोक्तप्रमाणे नियमित पोषण आहाराव्यतिरिक्त सध्यस्थितीत देण्यात येणाऱ्या पूरक आहाराचा लाभ काही प्रमाणात गुळाच्या स्वरुपातही देण्यात येत आहे. प्रस्तुत योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या आहारामध्ये स्थानिक उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करुन आहाराचा दर्जा व पौष्टिकता वृध्दीगत करण्याच्या दृष्टीने याबाबत शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी आरोग्य, आहार, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती शासन निर्णय दि.१५ मार्च, २०२३ अन्वये गठीत करण्यात आली आहे.

******************

महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.१७७८**

**श्री.संजग जगताप, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"" माहिम, मुंबई येथील जनसेवा रहिवासी संघ या एसआरए प्रकल्पातीलपुनर्वसन योजना सन २०१३ पासून राबविण्यात येत असुन या झोपडपट्टीचा सर्व्हे सन २०१३ मध्ये झाला व परिशिष्ठ २ मध्ये अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येणे, परंतू विकासकाने पुनर्वसन योजना राबवितांना रहिवाशांना विश्वासात घेण्याची आवश्यकता असताना विकासकाकडे वारंवार लेखी स्वरुपात मागणी करुनही त्यांना वैयक्तिक करारनामा/विकास करारनामा व विकास आराखडा देण्यात आलेला नसणे, सदर भुखंडावर ४०१ पैकी १५० राहती घरे असुन विकासकाने २७ राहत्या घरांना जाणीवपूर्वकरित्या विकासक व एसआरए प्राधिकरण यांच्या संगनमताने ३३/३८ ची १५ दिवसात घरे खाली करण्याची नोटीस बजावली असणे, सदर नोटीसीला संबंधित रहिवाशांनी एसआरए च्या हायपॉवर कमिटी यांच्याकडे अपिल दाखल केला असुन सदरचा अपिल सुनावणीसाठी अद्यापही प्रलंबित असून तसेच याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे प्रकरण असतानाही सदर बाबींचा विचार न करता विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अधिकाऱ्यांना हाताशी धरून चुकीच्या पध्दतीने आदेश देऊन रहिवाशांची घरे पोलीस बळाचा वापर करुन तोडण्यात येणे व त्यांच्यावर मानसिक, शारिरिक व आर्थिक नुकसान पोहचविण्याचे प्रकार विकासकांच्या गुंडाकरवी करणे, यात रहिवाशांचे चारित्रहनन करण्याचे प्रयत्नही होत असून तसेच जबरदस्तीने त्यांची राहती घरे खाली करण्यात आलेली असणे, त्यामुळे तेथील जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत विकासकांच्या माध्यमातुन स्थानिक कुटूंबावर केला जाणारा अन्याय व त्रास दूर करण्यासाठी सदर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची सखोल चौकशी करुन विकासक श्री नविद मोहम्मद सिध्दीकी व एस. एल. के. बिल्डकॉन प्रा.लि. या कंपनीवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

## मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

सी.एस.क्र.१४०८ (पै), १५०० (पै), २१६६ (पै), २१२४ (पै), विभाग माहिम येथील जनसेवा रहिवाशी संघ सह. गृह. निर्माण संस्था सदर योजना दिनांक २६.०६.२००९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात स्विकृत करण्यात आली होती. सदर योजनेचे विकासक एस. एल. के बिल्डकॉन प्रा.लि. व वास्तुविशारद श्रीमती सलोनी ए. देवधर, मे. देवधर असोसियेट हे आहेत. सदर योजनेला दिनांक २५.०७.२०१८ रोजी प्रथम आशयपत्र देण्यात आले असून सुधारित आशयपत्र दि.०९.११.२०२० रोजी

(250-9-2023) [कृ. मा. प.

देण्यात आले होते. त्यानुसार सदर योजनेचे दिनांक १२.११.२०२० रोजी आराखडे मंजूर (IOA) करण्यात आले आहेत.

माहिम विभाग येथील भूकर क्र.१५००(पै) या मिळकतीवरील जनसेवा रहिवाशी संघ सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परिशिष्ट-११ तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, धारावी विभाग यांनी दिनांक २१.०६.२०१० रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदर योजनेतील परिशिष्ट-२ मध्ये २१८ पात्र ७६ अपात्र /अनिर्णित असे एकूण २९४ झोपडीधारक आहेत.

भूकर क्र. २११६ (पै) व इतर या मिळकतीवरील आदिवासी कोळी रहिवाशी समाज संघ सहकारी गृहनिर्माण संस्थेचे परिशिष्ट II तत्कालीन उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, धारावी विभाग यांनी दिनांक १५.०६.२०१३ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. सदर योजनेतील परिशिष्ट II मध्ये ६४ पात्र, ४३ अपात्र अनिर्णित असे एकूण १०७ झोपडीधारक आहेत. सदर योजनेचे सुधारित आशयपत्र (LOI) दिनांक ०९.११.२०२० रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

विकासक एस. एल. के. बिल्डकॉन प्रा. लि. यांनी दिनांक १७.११.२०२० रोजी जनसेवा रहिवाशी संघ गृहनिर्माण संस्था व आदिवासी कोळी रहिवाशी समाज संघ सहकारी गृहनिर्माण संस्थेतील असहकार्य करणाऱ्या २७ झोपडीधारकांवर कलम ३३/३८अन्वये कार्यवाही करण्याकरिता प्रस्ताव प्राधिकरणात दाखल केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने झोपडीधारकांना दिनांक ०५.०२.२०२१, दि.०१.०३.२०२१ व दिनांक ०८.०३.२०२१ रोजी सुनावणीची पुरेशी संधी देवून दिनांक २५.०३.२०२१ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३३/३८ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानंतर कलम ३३/३८ अंतर्गत दिनांक १२.११.२०२१ रोजी १३ झोपडया निष्कासित करण्यात आल्या होत्या.

कलम ३३/३८ च्या आदेशाविरुध्द झोपडीधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय मध्ये रिट याचिका (L) क्र. २६३७१/२०२१ दाखल केली होती. मा. मुंबई उच्च न्यायालयाने सदर याचिकेचा निर्णय दिनांक १८.११.२०२१ रोजी दिला असून सदर निर्णयाने उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचा दिनांक २५.०३.२०२१ रोजीचा आदेश कायम करुन सदर रिट याचिका निकाली काढली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक १८.११.२०२१ च्या आदेशानंतर उर्वरित १४ झोपडयांचे निष्कासन दिनांक २५.११.२०२१ रोजी करण्यात आले होते.

तसेच सदर प्रकरणी झोपडीधारकांनी मा. शिखर तक्रार निवारण समितीकडे अपिल क्र.८५/२०२१ व ८६/२०२१ दाखल केले होते. मा. शिखर तक्रार निवारण समितीने दिनांक २८.०४.२०२३ रोजी आदेश पारित करुन उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचा दिनांक २५.०३.२०२१ रोजीचा आदेश कायम ठेवला असून अपिल निकाली काढले आहे.

********

H-1280-1A

लक्षवेधी सूचना क्र.१३८६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. नारायण कुचे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"केंद्र सरकार व राज्य सरकार प्रत्येक गरीबाला स्वत:चे हक्काचे घर मिळावे म्हणून महत्वाकांक्षी राबवित असणे, त्यात केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना सुरु करणे, तसेच त्याच धर्तीवर रमाबाई घरकुल योजना, तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना राज्य सरकारने सुरु केलेली असणे, या योजनांसाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना १ लक्ष २० हजार इतके अनुदान देण्यात येणे, शहरी भागासाठी प्रधानमंत्री आवास योजनेला व रमाबाई घरकुल योजनेला २ लक्ष ५० हजार इतके अनुदान देण्यात येणे, परंतु ग्रामीण भागामध्ये देण्यात येणारे १ लक्ष २० हजार अनुदान हे तुटपुंजे असल्याने ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घर पुर्ण न होता ते अर्धवट राहणे, त्या लाभार्थ्यांना पूर्ण घर बांधण्याकरीता अनुदान वाढवून देण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे रमाबाई घरकुल योजनेसाठी २ लक्ष ५० हजार व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत करीता २ लक्ष ५० हजार असे अनुदान वाढ करण्यात यावी, जेणेकरुन ग्रामीण भागातील नागरीकांच्या घरांचे स्वप्न पूर्ण होईल, सद्य परिस्थितीचा विचार केला असता लोखंड, सिमेंट, विटा, मजुरी व इतर साहित्याच्या किंमतीत वाढ झाली असल्याने २ लक्ष ५० हजार रुपये अनुदान शासनाने मंजूर करणे गरजेचे असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन अनुदान वाढविण्याकरीता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री (इतर मागास बहुजन कल्याण विभाग) यांचे निवेदन

राज्यातील ग्रामीण भागातील विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील समाजास विकासाच्या मुळ प्रवाहात आणून त्यांचे राहणीमान उंचावे, त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी तसेच त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनविण्याच्या उद्देशाने "रमाई आवास योजना" व "पंतप्रधान आवास योजनेच्या" धर्तीवर "यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना" सन २०११-१२ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आली आहे. सदरहू योजना शासन निर्णय दि.२४.०१.२०१८ अन्वये सुधारणांसह राबविण्यात येत आहे.

यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत ग्रामीण भागातील विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील घटकांना वैयक्तिक तसेच सामुहिकरित्या घरकुलांचा लाभ देण्यात येतो. विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गातील बेघर व भूमीहीन कुटुंबांसाठी शासकीय जमीन किंवा शासकीय

शेटा ९८९ (८०० - ८ - २३) [ क्र.ना.प.

जमीन उपलब्ध नसल्यास खाजगी जमीनीची खरेदी करुन १ हेक्टर जमिनीवर २० कुटुंबांसाठी किंवा तेथील स्थानिक परिस्थितीनुसार जमिनीची अट शिथील करण्यात येऊन १० कुटुंबांकरीताही वसाहत उभारली जाते. सदरहू योजनेंतर्गत १० कुटुंबांच्या सामुहिक वसाहतीतील घरकुल बांधकाम आणि सदरहू वसाहतीस पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सेफ्टीक टँक, गटारासह अंतर्गत रस्ते, समाजमंदिर इ. पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रति वसाहत रु.४४.३१ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

वैयक्तिक घरकुल लाभार्थ्यांकरीता शासन शुद्धीपत्रक दि.११.०९.२०१९ अन्वये, डोंगराळ / दुर्गम भागासाठी प्रति घरकुल रू.१.३० लक्ष व प्रशासकीय निधी रु.५४००/- तसेच सर्वसाधारण क्षेत्राकरीता प्रति घरकुल रू.१.२० लक्ष व प्रशासकीय निधी रु.४८००/- राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण यांना वर्ग करण्यात येतो.

"यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना"व "रमाई आवास योजना" ह्या दोन्हीही योजना "प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण" च्या धर्तीवर राबविण्यात येत आहेत. "प्रधानमंत्री आवास योजना-शहरी" च्या धर्तीवर "प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण" अंतर्गत अनुज्ञेय अनुदानामध्ये रु.१.२० लक्ष वरुन रु.२.५० लक्ष इतकी वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव ग्रामविकास विभागाने दि.२५.११.२०२० रोजी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे सादर केला असता, केंद्र शासनाने सद्य:स्थितीत कुठल्याही प्रकारची वाढ करता येणार नाही, असे दि.०२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये ग्रामविकास विभागास कळविले आहे. तसेच, ग्रामविकास विभागामार्फत दि.०१.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये पुन्हा केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे अनुदान वाढीची मागणी करण्यात आली आहे.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये एकसुत्रता रहावी याकरीता, राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना "प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण" च्या धर्तीवर राबविणे आवश्यक आहे. यास्तव, "प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण" योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ झाल्यास "रमाई आवास योजना" व "यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत" देय असलेल्या अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबतचा निर्णय घेणे शक्य होईल.

*********

## महाराष्ट्र विधानसभा जुलै, २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन.

**श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२८२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"जालना जिल्हयातील मंठा व परतुर शहरातील क्रीडा संकुलास दिनांक ०७/०४/२०१९ अन्वये रुपये १५ कोटीची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून मुदत संपूनही निधी अभावी क्रीडा संकुलाचे काम बंद असल्याचे निदर्शनास येणे, सदरील कामाला निधी प्राप्त होण्याकरीता मागणी करण्यात येणे, परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही झाली नसणे, सदरील दोन्ही क्रीडा संकुलाचे काम ३० टक्के पूर्ण झाले असून उर्वरित ७० टक्के कामासाठी प्रत्येकी १२ कोटी ५० लक्ष रुपये एवढा निधी आवश्यक असणे, वारंवार पत्रव्यवहार करुनही मंजूर असलेला निधी उपलब्ध करुन दिला जात नसणे, निधी अभावी प्रलंबित कामासाठी प्रत्येकी १० कोटी ५० लक्ष रुपये इतका निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### लक्षवेधी सूचना क्र. १२८२

### मा.मंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरणांतर्गत प्रत्येक प्रशासकीय विभागात, विभागीय क्रीडा संकुल, प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा क्रीडा संकुल व प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तालुका क्रीडा संकुले उभारण्याचे शासनाचे धोरण आहे. शासन निर्णय, दि.२३.०३.२०२२ अनुसार नवीन तालुका क्रीडा संकुलासाठीची विहित अनुदान मर्यादा रु.५००.०० लक्ष इतकी वाढविण्यात आलेली आहे. तसेच, पुर्ण/अपूर्ण/प्रगतीपथावर असलेल्या तालुका क्रीडा संकुलांची सुधारीत अनुदान मर्यादा रु.३००.०० लक्ष इतकी करण्यात आलेली आहे. त्यानुसार जालना जिल्हयातील तालुका क्रीडा संकुल, परतुर व तालुका क्रीडा संकुल, मंठा या संकुलांची सद्य:स्थिति पुढीलप्रमाणे आहे:-

अ) <u>तालुका क्रीडा संकुल, परतुर, जि. जालना</u> :-

तालुका क्रीडा संकुल, परतुर जि. जालना या क्रीडा संकुलाच्या रु.१६०१.५२ लक्ष रकमेच्या अंदाजत्रकास अनुज्ञेय शासन अनुदानाच्या मर्यादेशिवाय अतिरिक्त लागणारी तरतूद संबंधित तालुका क्रीडा संकुल समितीने स्वबळावर उभारण्याच्या अटीच्या अधिन राहून, प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर तालुका क्रीडा संकुलास शासन निर्णय, दिनांक २३.०३.२०२३ अनुसार रु.४००.०० लक्ष इतके एकूण शासन अनुदान अनुज्ञेय आहे. त्यापैकी अद्यापपर्यंत रु.३५०.०० लक्ष इतके अनुज्ञेय शासन अनुदान वितरीत करण्यात आले असून, त्यामधून संकुलामध्ये ४०० मी सिंथेटिक ट्रॅक, ऑलिपिक साईज जलतरण तलाव, मल्टीपरपज हॉल व इतर सुविधा विकसित करण्यात येत आहेत. सद्य:स्थितीत मल्टीपर्रपज हॉलचे काम हाती घेण्यात आलेले असून रु.३२५.०० लक्ष निधि खर्च करण्यात आला आहे. सदर संकुलामध्ये ४०० मी ऐवजी २०० मी सिंथेटीक ट्रॅक करण्याच्या प्रस्तावाबाबत राज्य क्रीडा विकास समितीच्या दि.२२.६.२०२३ च्या बैठकीत निर्णय होऊन, जागा व निधीच्या उपलब्धतेनुसार २०० मी मातीचा ट्रॅक तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ब) **<u>तालुका क्रीडा संकुल, मंठा, जि. जालना</u>** :-

तालुका क्रीडा संकुल, मंठा, जि. जालना या क्रीडा संकुलाच्या रु.१६.३० कोटी रकमेच्या अंदाजपत्रकास अनुज्ञेय शासन अनुदानाच्या मर्यादेशिवाय अतिरिक्त लागणारी तरतूद संबंधित तालुका क्रीडा संकुल समितीने स्वबळावर उभारण्याच्या अटीच्या अधिन राहून, प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तालुका क्रीडा संकुल, मंठा या संकुलासाठीची शासन अनुज्ञेय अनुदान मर्यादा रु.४.०० कोटी इतकी असून, संपूर्ण अनुज्ञेय शासन अनुदान निधी वितरीत करण्यात आला आहे. तालुका क्रीडा संकुलामध्ये २०० मी सिंथेटिक ट्रॅक,जलतरण तलाव, मल्टी परपज इनडोअर हॉल, इ सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत मल्टीपर्पज हॉलचे काम लिण्टल लेव्हलपर्यंत पुर्ण झाले आहे. टॉयलेट स्लॅबचे काम पुर्ण झाले आहे. जलतरण तलाव आरसीसी वर्क पुर्ण झाले आहे. सर्व्हीस बिल्डींग, फिल्टरेशन प्लॉट, २०० मी धावनपथ, जमिन सपाटीकरणाची कामे अपुर्ण आहेत. यासाठी रु. ३.५० कोटी खर्च करण्यात आला आहे. शासन अनुदान मर्यादेत अनुदान पूर्णत: वितरीत केले असून, उर्वरित आवश्यक निधी संकुल समितीने स्वबळावर उभारण्याबाबतची अट विचारात घेता संकुल समितीने अन्य स्त्रोताव्दारे बांधकामासाठी निधी उभारणे आवश्यक आहे.

ooooo

**लक्षवेधी सूचना क्र.३६०**
**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवशेन**

श्रीमती. श्वेता महाले, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र ३६० पुढील प्रमाणे आहे:-

**" राज्यात प्रकल्प कार्यान्वित करतांना बाधित लोकांचे पुनर्वसन करण्यात येणे, पुनर्वसन करतांना घरासोबतच तेथील नागरिकांना मूलभूत सोई सुविधा सुद्धा उपलब्ध करून देण्यात येणे, परंतू सदर बाधित नागरिकांना सदर जागेचा कब्जा हक्क देताना सदर जागेच्या मूल्यांकनानुसार काही ठराविक रक्कम भरून घेतल्या शिवाय जागेचा कब्जा हक्क दिल्या न जाणे, प्रकल्प राबविताना प्रकल्पामुळे सदर नागरीक अगोदरच बाधित झालेला असणे, शेतकऱ्यांची जमीन हेच त्यांचे सर्वस्व असून त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालणे, त्यामुळे सदर बाधीत नागरिक कब्जा हक्क रक्कम भरू शकत नसणे, पर्यायाने सदर बाधितास जमिनीचा किंवा मिळालेल्या घराचा हक्क न मिळणे, त्यामुळे राज्यभरातील अनेक प्रकल्प ग्रस्तांनी कब्जा हक्क रक्कम भरलेली नसल्याने त्यांना त्यांच्या हक्काचं घर मिळालेले नसणे, तसेच केवळ याच कारणामुळे अनेक पुनर्वसनाचे प्रकल्प रखडलेले असणे, उदा. माझ्या चिखली तालुक्यातील पेन टाकळी प्रकल्पातील घाणमोड, मानमोड, अंशतः बाधीत पांढर देव या पुनर्वसित गावातील नागरिकांना अजूनही त्यांच्या प्लॉटचा कब्जा हक्क दिलेला नसणे, कोणतेही पुनर्वसन करताना त्या ठिकाणी सर्व सुविधा शासनाकडुन उपलब्ध करून देत असताना केवळ कब्जा हक्क रक्कम बधिताकडून घेणे संयुक्तिक नसणे, यासाठी पुनर्वसीत गावातील लाभार्थींना प्लॉट किंवा घरे देताना कब्जा हक्क रक्कम न घेता देण्यात यावे किंवा कब्जा हक्क रक्कम शासनाने भरावी अशी होणारी मागणी, याकडे शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "**

---

**मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन:-**

महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ लागू असलेल्या पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित होणा-या बुडित क्षेत्रातील गावठाणामधील घरे संपादित करुन सदर घरांच्या जागेचे मुल्यांकन करुन संबंधीत बाधित कुटूंबास त्याचा मोबदला अदा करण्यात येतो. बाधित गावठाणातील भूधारकांचे पुनर्वसन पुनर्वसित गावठाणामध्ये रहिवासी प्रयोजानार्थ भूखंडाचे वाटप करुन करण्यात येते. पुनर्वसित गावठाणामध्ये १८ नागरी सुविद्या शासनाच्या वतीने कोणतेही मुल्य ने घेता पुरविण्यात येतात. तथापि, पुनर्वसन गावठाणामध्ये प्रकल्पबाधित कुटूंबास वाटप केलेले भुखांडाची कब्जेहक्कची रक्कम बाधित कुटूंबाकडुन वसुल करण्यात येते. पुनर्वसन अधिनियम, १९७६ पुर्वीही नविन गावठाणामध्ये प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्यात येत होती. शासन ठराव क्र आरपीए/१०७०/ॲक्युपन्सी-र-१, दि ४.९.७१ अन्वये पुनर्वसित गावठाणामध्ये वाटप केलेल्या प्लॉट्ची कब्जेहक्काची किंमत ठरविण्यात येते व ती मागणी केले पासुन तीस दिवसांचे आत बाधित कुटूंबाने भरली पाहिजे. सदर शासन निर्णयामध्ये मुद्या क्र (अ) येथे नमूद केले आहे की, नविन गावठाणातील भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम ज्या बाधित व्यक्तींना जुन्या गावठाणातील त्यांच्या संपादित भूखंडाचा/ घराचा मोबदला अदा केला आहे अशा बाधित व्यक्तींकडून त्यास वाटप केलेल्या नविन गावठाणातील भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्यात येते. मात्र

ज्या बाधित व्यक्तींना जुन्या गावठाणातील त्यांच्या संपादित भूखंडाचा/ घराचा मोबदला अदा केलेला नाही, अशा बाधित व्यक्तींकडून त्यास वाटप केलेल्या नविन गावठाणातील भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्यात येत नाही.

बाधित गावठाणातील घर/मालमत्ता संपादित केल्यानंतर त्याचा मोबदला बाधित व्यक्तीस अदा करण्यात येतो. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९७६ च्या कलम १८, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९८६ च्या कलम १६ (१) मधील (परंतु) (दोन), महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६ चा १ मधील (परंतु) ( चार) मध्ये नमूद तरतुदीनुसार पुनर्वसित गावठाणामध्ये प्रकल्पग्रस्तांना वाटप केलेल्या भूखंडाची निर्धारित केलेली अशी भोगवटामूल्याची रक्कम ज्या प्रकल्पग्रस्तांनी शासनास अदा केली आहे, अशा सर्व पात्र प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसित गावठाणामध्ये भूखंडाचे वाटप करण्यात येते. महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६(१) (ब) नुसार बाधित व्यक्तीस त्याने पुर्वीच धारण केलेल्या जमिनीच्या भोगवटाविषयक स्थितीसह नवीन गावठाणातील किंवा विद्यमान गावठाणाच्या विस्तारित भागातील भूखंड मंजूर करण्यात येतो. पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम १६(१) (ब) (चार) मध्ये नमूद तरतुदीनुसार बाधित व्यक्तीस वाटप केलेल्या भूखंडाची भोगवट्याची किंमत विहित करण्यात येईल अशारितीने निर्धारित व प्रदान करण्यात येते. पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम २, खंड (२) च्या उप खंड (ड) मध्ये नमूद केलेल्या बाधित परिमंडळातील भूमिहीन शेतमजूराकडुन त्यास वाटप केलेल्या भूखंडाची भोगवट्याची किंमत वसूल करण्यात येत नाही.

बाधित गावठाणामध्ये संपादित केलेल्या घराचा/ भूखंडाचा मोबदला संबंधीत कुटुंबास अदा करण्यात येतो. बाधित कुटूंबांना पुनर्वसित गावठाणामध्ये वाटप केलेल्या भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम प्रकल्पग्रस्ताकडुन वसूल न करण्याबाबत व सदर रक्कम शासनाने भरण्याबाबत महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६,१९८६,१९९९ मध्ये कोणतीही तरतुद नाही. राज्यामधे ६१४ पाटबंधारे प्रकल्प असून त्यामुळे या प्रकल्पाअंतर्गत जवळपास २,४५,४७८ प्रकल्प बाधित कुटुंबे आहेत. नविन गावठाणामध्ये बाधित कुटूंबांना रहिवासी प्रयोजानार्थ वाटप केलेल्या भूखंडाची कबजेहक्कची रक्कम अशा बाधित कुटूंबांनाकडुन वसूल न करण्याचा व सदर रक्कम शासनाने भरण्याचा निर्णय घेतल्यास शासनावर प्रचंड मोठ्या प्रमाणावर आर्थिक भार पडेल व सदर निर्णय शासनाच्या प्रचलित धोरणाशी व पुनर्वसन अधिनियम १९७६, १९८६ व १९९९ च्या तरतूदींशी विसंगत ठरेल. पुनर्वसित गाठाणामध्ये बाधित कुटूंबांना भूखंडाचे वाटप करण्यासाठी मोठया प्रमाणावर जमिनीची आवश्यकता असुन सदर जमीन संपादनासाठी प्रचिलीत बाजार भावानुसार संपादित जमिनीचा मोबदला खातेदारांना अदा करावा लागतो व त्यामुळे अशा पुनर्वसित गावठाणाकरिता येणारा संपादनाचा खर्च, सीमांकन, समतलन, मोजणी भूखंडांचे ले आऊट इत्यादि बाबींवर करण्यात येणार खर्च विचारात घेऊन नविन गावठाणामध्ये रहिवासी प्रयोजानार्थ भूखंडाचे वाटप करतांना अशा भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम निर्धारित करुन बाधित व्यक्तीकडुन वसूल करण्यात येते. तथापि, नविन गावठाणामध्ये वाटप करावयाच्या भूखंडाची कब्जेहकाची रक्कम बाधित व्यक्तीकडुन वसूल न करता सदर रक्कम शासनाने भरल्यास त्यामुळे पुर्नवसन खर्चामध्ये लक्षणीय वाढ होऊन शासनावर अतिरिक्त वित्तीय भार

पडणार असल्याने विकास कामांकरिता पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकणार नाही. पुनर्वसित गावठाणामध्ये प्रकल्पबाधित कुटुंबांना वाटप केलेल्या भूखंडाची कब्जेहक्काची रक्कम वसूल न करता शासनाने सदर कब्जेहक्काची रक्कम भरल्यास शासनावर प्रचंड मोठ्याप्रमाणावर वित्तियभार वाढणार आहे, ही बाब विचारात घेता कब्जेहक्काची रक्कम वसूल न करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरणार असल्याने त्याबाबत कोणतीही कार्यावाही करणे शक्य नाही.

----------------------------